# माणूस

शनिवार
२९ नोव्हेंबर १९७५
एक रुपया

सचिनदा
आपल्याबरोबर आणि नंतरही
आलेले रथी महारथी संगीतकार
एका मागून एक मागे पडत असता
तीस वर्षानंतरही
या क्षेत्रात
तुम्ही टिकून नव्हे
पाय रोवून होता ...
पृष्ठ २३......



सासाहिक माणूस

वर्ष पंधरावे – अंक : पंचविसावा

२९ नोव्हेंबर १९७५

मूल्य : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर यांनी** साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤

# सप्रेम नमस्कार

दि. ९ । ११ । ७५

दिवाळी अंकातला गॉर्कीवरील लेख अतिशय आवडला. एकदा लेख हातात घेतला नि मग काही अंक खाली ठेववेना. फारच छान ! मराठी वाचकांची फार मोठी सोय झाली. लेख ओघवत्या भाषेत, अभ्यासपूर्ण नि सखोल ज्ञान प्राप्त करून देणारा आहे. गॉर्की वाचता वाचता रशियन क्रांती, तिचे फलित, लेनिन, स्टालिन आदींवर टाकलेला झगझगीत प्रकाश अवलोकिला.आपण फार महत्त्वाचे कार्य केलेले आहे या योगे ! अनेकांचा भ्रमनिरास होणार आहे त्यामुळे !
स्तालिनच्या नि सध्याच्याही रशियातील या भयंकर दहशतवादाचा विचारही करवत नाही. एकदा इंग्रज-फ्रेंच-रशियन यांच्या आपल्या आयुष्यातील सर्वांत सुखद क्षणाबद्दल गप्पा चाललेल्या असतात. इंग्रज मनुष्य म्हणतो, खच्चून काम करावे नि शेगडी ठेवलेल्या ऊबदार खोलीत वाचन करीत पडावे हा माझ्या आयुष्यातला सर्वोच्च आनंदाचा क्षण !' तर फ्रेंच मनुष्य म्हणतो की, 'आपल्या प्रेयसीसह रिव्हिएरात सुखद काळ व्यतीत करणे याइतका आनंद नाही !' आता पाळी रशियनाची येते. तो म्हणतो, 'मध्यरात्र झालेली आहे. बाहेर कडक थंडी आहे. आपण अगदी ऊबदार पांघरुणात गुलाबी झोपेत मधुर स्वप्ने पाहात आहोत आणि एवढ्यात दारावर टकटक होते, आपण धडधडत्या अन्तःकरणाने जागे होतो. भीतभीत दार उघडतो आणि पाहातो तर काय ? 'चेका' चे गुप्तहेर बाहेर उभे ! रक्त गोठवून टाकणारा प्रसंग ! गुप्तहेर विचारतात, 'अलेक्झांडर डोस्टोव्हस्की आपणच ना ? आणि एकदम हायसे वाटून आपण उत्तर द्यावे " नाही तो मी नाही! तो शेजारच्या खोलीत राहतो...' हा माझ्या आयुष्यातील सर्वोच्च आनंदाचा क्षण....' अधिक भाष्य करण्याची आवश्यकताच नाही. असो. आपण गॉर्कीवर लिखाण प्रसिद्ध करून खूपच विचारमंथन घडविले आहे. त्यामुळे अपेक्षा वाढलेल्या आहेत. आता वाचकांना आपणाकडून हवे आहेत बोरीस पास्टरनाक, डॉ.झिवॅगो, सोल्झेनित्सिन, सारवारोव्ह, केरेन्स्की इत्यादी. कळावे, त्रासाबद्दल क्षमस्व.

सु. ह. जोशी, पुणे

# १९७५ १९७५

सुधा कुलकर्णी

इसवी सन एकोणिसशे पंचाहत्तर हे
आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष आहे.
ते आपण साजरे करू या।

त्या किंकाळ्यांकडे दुर्लक्ष करा।
अहो, त्या ऐकू येऊ नयेत म्हणून तर
आमचा हा आटाट सारा।
हा कोलाहल, या सभा, ती भाषणे.
ती स्त्रीची महत्ता
ती स्त्रीची थोरवी
ते तिचे एकमेवाद्वितीयत्व
त्याचेच वर्णन करा।

आठवते का वाचलेले तुम्हाला
इतिहासाच्या पुस्तकात।
पूर्वी आपल्याकडे स्त्री सती जात असे,
स्वखुषीने।

अहो! आर्यपतिव्रता ती–
तिने सती गेलेच पाहिजे हसतमुखाने।
तिच्या त्या किंकाळ्या ऐकू येऊ नयेत
म्हणून नव्हते का तेव्हाही ढोल, नगारे, ताशे–
वडविले जात।

परवा वर्तमानपत्रात आले
त्या अमुक गावच्या हरिजन स्त्रीचे
हाल्हाल झाले–

तिची वस्त्रे हिरावून
आधुनिक द्रौपदीवस्त्रहरण घडवले–
इतिहासाची पुनरावृत्ती हा नियम आहे ना,
त्यामुळे हे सारे घडले।
पण– मागच्यास लागलेल्या ठेचेने
पुढचा शहाणा होतो–
कौतुक हे की, त्यामुळे त्यांनी
त्या वस्त्राच्या व्यापाऱ्यास वगळले।

मध्यंतरी असेच झाले
रेल्वेमध्ये काही घडले
एक बाई भलत्या वेळी
एकटीच डब्यात बसली होती.
ते तरी विचारे काय करणार?
रंगभूमी, पात्रे, वेळ, सारीच कशी
जमली होती।
'बलात्कार' नाटक सिद्ध झाले
प्रयोगानंतर टीका नको म्हणून
लगेच सारे दडपले गेले।

हे सारे घडतेच हो!
आज इथे, उद्या तिथे–
कधी कशाची वाच्यता होते.
बाकी सारेच अंधारात लपते,
त्या किंकाळ्या, ते उसासे, ते विव्हळणे
सारे आपल्यापासून दूरच असते–

तर ते विसरा;–
तुम्ही आपले आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष साजरे
करा!
साजरे करण्यासाठी काही असल्याशिवाय
दिवसाला मजा येत नाही
आणि साजरे केलेले सारेच
कायम काही राहात नाही–
कायम काहीच राहात नाही
कालचे आज आठवत नाही
भाषण तेच, टाळ्या त्याच
श्रोते तेच, विषय मात्र नवा–
या वर्षी आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्षाची हवा–

हे समानतेचे युग
स्त्रीला समान लेखा!
हे कायद्याचे युग
स्त्रीला समान हक्क द्या!
हे वैचारिकतेचे युग
स्त्रीला विचारस्वातंत्र्य द्या.
हे मतदानाचे राज्य
स्त्रीला मताधिकार द्या.
तिला अर्थस्वातंत्र्य द्या, भाषणस्वातंत्र्य द्या,
जगात बोलताना तिला हवे ते ते द्या.
मात्र तिच्या स्वातंत्र्याची दोरी
तुमच्या हातीच पक्की आहे
हे पुन्हा एकदा पाहून घ्या!

कधी कुठे घाव पडतो
जखम पुन्हा उसवली जाते
लहान असो, मोठी असो
स्त्रीची जात एकच असते
संस्कृतिरक्षकांच्या साक्षीने
नवी कहाणी घडवली जाते.

आईबाप सगेसोयरे
सारी नाती खोटी असतात
संस्कृतिरक्षकांच्या साक्षीने
नजरा विवस्त्रच करीत असतात!

स्त्रीला जात नाही, स्त्रीला धर्म नाही
तिला नाव नाही, तिला गाव नाही.
देशकालाची बंधने तिच्यासाठी नसतात
तिच्या अनेक रूपांतून यांना फक्त
ती सनातन आवाहनेच दिसतात!

हे बदलणे कसे जमावे?
सामान्याने स्वतःस ओळखून झेपेल तेवढेच
करीत असावे

दोन घटका बऱ्या जातात
थोड्यात बरी करमणूक होते
रोज तेच केल्यानंतर मधून वेगळे हवेच असते

स्वतःला विसरणे आवश्यक असते
एरवी करमणूक कशी होणार?
आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्षात
तिचे गुणगान तरी कोण करणार?

□

# मुक्काम पुणे

प्रकाश जोशी

## झुणका–भाकर–योजना

बाजूला मंडईतील कोलाहल, गाडीवाल्यांची, लोकांची ही एकच गर्दी आणि तिथे पलीकडे लांबच लांब रांग लागली आहे. थकले. भागलेले चेहरे. उन्हात तळपत घामेजलेले. एखाद्दोन मध्यम वर्गीय, धुतलेल्या कपड्यातले. शेजारच्या शेडमध्ये किती तरी बायका धान्य निवडताहेत, पाखडताहेत. टेबलावर भाकऱ्यांची चवड लागलेली. मोठ्या भांड्यात झणझणीत झुणका. रांगेतला एकेकजण पुढे येतो. पन्नास पैशांची मुठीतली नाणी टेबलावरील माणसाच्या हातात देतो नि दुसऱ्या हातात झुणका-भाकर घेतो...प्रत्येकाचा चेहरा आता समाधानाने फुललेला. जणू इतक्या वेळची भूकच भागली सारी.

आणि हे सगळं गेलं वर्षभर अखंडपणे चाललंय. एकाहि दिवसाचा खाडा नाही. अखिल मंडईमंडळाची ही 'झुणका-भाकर' योजना. गेल्या वर्षी १९ नोव्हेंबरला ही योजना सुरू झाली. तेव्हा वाटलं, फार दिवस हे चालेल की नाही शंकाच आहे; पण मंडळी जिद्दीची! शहरी बायकांना शेकड्यांनी भाकऱ्या थापून भाजण्याची संवय नसते आणि तितका स्टॅमिनाहि नसतो. म्हणून त्यांनी बार्शी, सोलापूर भागातील खेडीपाड्यांतील गरजू बायकांना पुण्यात आणलं...या कामासाठी. सुरुवातीला फक्त १० चुली होत्या. आता ४१ चुली झाल्या आहेत. चूल तिथं भांडण हे ठरलेलं; पण इथं इतक्या चुली असूनहि भांडणतंटा कधीच नाही. पन्नास बायका नि पंचवीस पुरुष इथं पहाटेपासून रात्रीपर्यंत एकोप्याने राबत असतात. त्यांना महिन्याला प्रत्येकाला शंभर ते दीडशे रुपये मिळतात. इथं काम करणाऱ्या बायकांना वर्षातून तीन वेळा साड्या वाटल्यात. ह्यातली एकेक बाई दिवसाला दीडशे ते पावणेदोनशे भाकऱ्या भाजते.

सुरुवातीपासून झुणकाभाकरच ते करीत. चौथ्या महिन्यात त्यांनी कांदापोहे, खिचडी, पाव-पातळभाजी देण्यास सुरुवात केली. पहिले दोनचार महिने दिवसाला दोनशे-अडीचशे लोक येत. आता ही संख्या चारशे–साडेचारशेहून अधिक आहे. वर्षभरात दहा लाखाहून अधिक लोकांनी या योजनेतून झुणकाभाकर घेऊन खाल्ली. त्यामध्ये कामकरी, मजूर आहेत तसेच काही चांगले सुशिक्षित मध्यमवर्गीयहि आहेत. काही मंडळी चवीसाठी इथली झुणकाभाकर घेऊन जातात. महामहोपाध्याय श्री. दत्तो वामन पोतदारांनी वाईहून चवीसाठी इथली झुणकाभाकर मागवून घेतली आणि ती खाऊन मंडईमधील या योजनेच्या मंडळीचं त्यांनी पोटभर कौतुक केलं.

'झुणकाभाकर' वाटपासाठी मंडईतील सर्वच व्यापाऱ्यांनी व विक्रेत्यांनी आपापल्या परीने आतापर्यंत मदत केली आहे. त्यांनी आपल्यात काही गट करून दररोज एका गटाने वाटप करायचे, जमा झालेली रक्कम बँकेत भरायची, अशी कामं वाटून घेतलीत. सणासुदीला शहरातील काही दानशूर मंडळींच्या मदतीने ह्या योजनेतून काही गोडधोड पदार्थहि वाटले जातात. १९ तारखेला झुणकाभाकर-योजनेच्या पहिल्या वाढदिवसाला पंधरा ते सोळा हजार लाडू गोरगरिबांना वाटण्यात आले.

अखिल मंडईमंडळाची ही कल्पना पाहून फलटण, सांगली, इस्लामपूर आदी ठिकाणीहि अशा प्रकारच्या योजना सुरू झाल्या. या योजनेला आतापर्यंत ५४–५५ हजारांच्या देणग्या मिळाल्या; परंतु तसं पाहिलं तर हा सगळा आतबट्ट्याचाच व्यवहार. तोटाच जास्त. पण मंडईमंडळाला फायद्याची जरुरीहि वाटत नाही.

या मंडळींची जिद्द इतकी विलक्षण आणि उत्साह इतका भरपूर की, आहे त्याच जागी इमारत बांधून कायम स्वरूपात ही योजना राबविण्याची त्यांची इच्छा आहे. रोजच्या दहा हजार भाकरी द्याव्या लागल्या तरी देण्याची त्यांची तयारी आहे. पुण्याचे महापौर श्री. वसंतराव थोरात या योजनेकडे आस्थेने लक्ष पुरवितात. त्यांचे बंधू श्री. अप्पा थोरात यांची ही कल्पना.

मंडईमंडळाने या योजनेला प्रारंभीचे भांडवल पुरविले. सध्या रोजचा ३–४ हजारांचा व्यवहार चालतो. महाराष्ट्र शासनाने या योजनेला दोन हजारांची देणगी दिली आहे.

जागेअभावी मंडळाच्या अनेक कल्पना अद्याप अपुऱ्या आहेत; पण ही जिद्दीची मंडळी यासारख्या सगळ्या अडचणींवर मात करतील असा आत्मविश्वास त्यांच्या बोलण्यावरून दिसून आला.

☐ पत्रकार म्हटला की निवांतपणा नाहीच. सतत धावपळ. वेळेशीच स्पर्धा. कोणत्या वेळेला काय लागेल कोणत्या विषयाशी मुकाबला करावा लागेल ते सांगता येणार नाही. त्यात आपल्याकडे फारसे स्पेशलायझेशनही झालेले नाही.

त्यामुळे खुजगाव–नांदोलीवादापासून अणुस्फोट, आयात-निर्यात, माणूस चंद्रावर उतरला ते शहराचा पाणीपुरवठा अशा निरनिराळ्या विषयांवरील प्रश्नांशी आपल्या पत्रकाराला मुकाबला करावा लागतो. एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास केला तरी त्याचा काम करताना केव्हा उपयोग होईल किंवा होणारच नाही हेही निश्चित सांगता येत नसते.

या बाबतीत मार्ग काढण्याचा एक चांगला उपक्रम पुणे पत्रकारसंघाने पुण्यात घडवून आणला.

'संरक्षण' म्हटले की त्या बाबतीत आपल्याला फक्त युद्धाच्या वेळी आठवण येते. आपले लष्कर, त्यांचे प्रश्न, देशाचे संरक्षणविषयक धोरण, संरक्षणाच्या दृष्टिकोनातून आपले शत्रु व मित्र अशा विविध, मूलभूत अंगांची माहिती व्हावी म्हणून पुणे पत्रकारसंघाने पुणे विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण-योजना व वृत्तपत्रविद्याविभागाच्या सहाय्याने 'संरक्षण-प्रश्नांची ओळख' हा आठ दिवसांचा अभ्यासक्रम पार पाडला.

पत्रकारांना आपल्या व्यवसायात ज्या अनेक प्रश्नांविषयी लिहावे लागते त्या प्रश्नांची मूलभूत स्वरूपाची माहिती देणारे छोटे अभ्यासक्रम आयोजित करण्यात विद्यापीठाचे संपूर्ण सहकार्य असल्याबद्दल खात्री बाळगा असे कुलगुरू दाभोळकर यांनी संरक्षणप्रश्नांची ओळख' या अभ्यासक्रमाचे उद्-

घाटन करताना सांगितले. विद्यापीठाचे कार्य फक्त कॉलेजच्या, फक्त चार भिंतींत चालत नाही. सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवून त्यांना शिक्षित करण्याचे विद्यापीठाचे मूलभूत कार्य असल्याचे त्यांचे मत. सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी ज्या काही 'एजन्सीज' उपलब्ध आहेत. त्यात वर्तमानपत्राचे स्थान महत्त्वाचे. ज्ञानप्रसाराच्या कार्यात पत्रकार हा महत्त्वाचा दुवा असून त्याच्या प्रशिक्षणाचे कार्याकडे विद्यापीठ एक कर्तव्य म्हणून पाहील असे आश्वासन त्यांनी दिले. कोणता विषय कसा मांडावा, कोणत्या अँगलने मांडावा हे ज्याचे त्याने ठरवावे. विद्यापीठ फक्त त्या विषयाची मूलभूत माहिती तेवढी पुरवील.

संरक्षण हा सर्वव्यापी प्रश्न आहे. तो राष्ट्राच्या सर्व अंगांस स्पर्श करणारा आहे. पुणे विद्यापीठाच्या मिलिटरी स्टडीज विभागाचे प्रमुख लेफ्टनंट कर्नल एम. जी. अभ्यंकर यांनी त्याची तोंडओळख करून दिली. शत्रू जेव्हा सीमेवर चढाईच्या पवित्र्यात उभा ठाकतो त्या वेळी सर्वसामान्यांना देशाच्या संरक्षणाचे महत्त्व पटते हे दुर्दैव आहे असे ते म्हणाले.

संरक्षण कशाचे करावयाचे? राष्ट्राने जी जीवनपद्धती स्वीकारली असेल तिचे. म्हणजे जनता, भूमी व जनतेच्या आशाआकांक्षांचे मानबिंदू असलेली घटना यांचे संरक्षण करावयाचे असते. हे एकदा लक्षात आले की, देशाचे संरक्षण किती आघाड्यांवर करावे लागते हे लक्षात येईल. देशाच्या संरक्षणगरजांची योग्य कल्पना केवळ जनतेलाच नव्हे तर लोकप्रतिनिधींनाही करून देण्याची कामगिरी वृत्तपत्रे बजावू शकतात असे मत त्यांनी व्यक्त केले.

संरक्षणाच्या दृष्टिकोनातून देशाचा इतिहास, लष्करी डावपेचाच्या दृष्टिकोनातून देशाच्या सीमा, शेजारी राष्ट्रांची लष्करी तयारी, आपल्या लष्कराची रचना, युद्धशास्त्रातील नवीन घडामोडी, गुप्तहेर विभागाची कामकाजपद्धत यावावत लेफ्टनंट कर्नल अभ्यंकर यांनी आपल्या व्याख्यानात माहिती सांगितली. नौदलविकासाची योजना, नौदलावरील जबाबदारी, बंदरांचा विकास हे विषय रिअर ॲडमिरल बी. एन. लेले यांनी हाताळले.

मुंबईजवळ समुद्रात मोठ्या प्रमाणावर तेल सापडण्याची जी शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे या भागाचे संरक्षण करण्याची नौदलाची जबाबदारी वाढली असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

या अभ्यासक्रमाला पुणे-मुंबईतील पत्रकार, वृत्तविद्याविभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. या अभ्यासक्रमाचे यश लक्षात घेता जिल्हापातळीवरील पत्रकारांसाठीही पत्रकारितेचा 'कॉरस्पाँडन्स् कोर्स' सुरू करण्याची सूचना पुणे पत्रकारसंघाचे अध्यक्ष गो. कृ. पटवर्धन यांनी मांडली.

ग्रामीण भागातील सर्व स्तरांवरील माहिती पुरविण्याचे काम जिल्हापातळीवरील पत्रकारांचे. येत्या दहा वर्षांत विकासाची गती लक्षात घेता जिल्हापातळीवरील पत्रकार हा माहितीच्या देवाण-घेवाणीत महत्त्वाचा दुवा ठरणार असल्याने हा कॉरस्पाँडन्स–कोर्स महत्त्वाचा. त्याची आखणी व परीक्षा घेण्याचे काम वृत्तपत्र–विद्याविभागाने करावे व या उमेदवारांना प्रमाणपत्र देण्याचे काम जर विद्यापीठाच्या कक्षेत बसले नाही तर ती जबाबदारी पत्रकारसंघटनेने घ्यावी.

'संरक्षणप्रश्नाची ओळख' या अभ्यासक्रमाचा अनुभव लक्षात घेता अशा प्रकारच्या लहानलहान अभ्यासक्रमांची उपयुक्तता नाकारता येणार नाही.

☐ ग्रॅहम बेलने टेलिफोनचा शोध लावला त्या वेळी त्या शास्त्रज्ञाला. १९७५ मध्ये आपल्या या फोनसाठी एकट्या भारतात सहा लाख लोक फोनसाठी कागदावर क्यू लावून बसतील असे वाटले तरी असेल का?

रांग आणि प्रतीक्षा ही आपल्या जीवनाचे एक अंगच बनले आहे. माध्या सारसबागेतील गणपतीचे दर्शन घ्यायचे असले तरी रांग लावून उभे राहावे लागते; पण आता फोनसाठी नुसती प्रतीक्षा करून भागणार नाही. चांगली चार आकडी रक्कम फोन मिळण्याच्या आधीच मोजावी लागणार आहे. त्याशिवाय प्रतीक्षायादीवर उभे राहता येणार नाही. पूर्वी नुसता अर्ज केला की तुमचे नाव वेटिंग लिस्टवर लगेच दाखल व्हायचे. किरकोळ दहा रुपये भरले की झाले. त्यामुळे पुण्यात दर महिन्याला सरासरी ३५० अर्ज फोनसाठी करण्यात येतात हे सांगितल्यावर नवल वाटायला नको.

त्यात फोन लवकर मिळावा म्हणून कोण घाई. हार्ट पेशंट व सामाजिक कार्यकर्त्यांना त्यात प्राधान्य.

पुण्यातील फोनची प्रतीक्षायादी चाळली असता त्यात बहुसंख्य मंडळींनी आपल्याला हार्ट ट्रबल असल्याचे नमूद केले आहे. म्हणजे अख्ख्या पुणे शहराला हार्ट ट्रबल आहे काय असे वाटावे. उरलेसुरले तमाम लोक सार्वजनिक कार्यकर्ते आहेत. म्हणजे काय की कोणाच्या किराणादुकानात अमक्यातमक्या समाजाचे 'ऑफिस' आहे तर कोणाच्या घरी भटक्या जातीजमातींच्या कार्यालयाने ठाण मांडलेले असते. त्यामुळे पुण्यात हार्टपेशंट व सामाजिक कार्यकर्ते वगळता कोणालाच टेलिफोन नकोय असे ती वेटिंगलिस्ट पाहिल्यावर वाटावे.

तर मूळ मुद्दा असा की फोनला मागणी वाढली आहे; पण या नव्या डिपॉझिटप्रकारामुळे ही मागणी खरी आहे का असा प्रश्न पडावा. कारण सप्टेंबर महिन्यात फक्त ३५ नवे अर्ज डिपॉझिटसह दाखल झाले. पूर्वीचे दरमहा ३५० अर्ज कुठे आणि आताचे ३५ कुठे! म्हणजे ज्यांना टेलिफोनची खरोखरच आवश्यकता आहे असे फार थोडे लोक असल्याचं डिस्ट्रिक्ट टेलिफोन मॅनेजर श्री. टी. एच. चौधरी यांचे मत.

ओ. वाय. टी. साठी पाच हजारांचे व जनरल कॅटॅगरीसाठी एक हजाराचे डिपॉझिट सर्व फोन इच्छुक ग्राहकांना सक्तीचे केल्याचा परिणाम दोन प्रकारांनी होणार आहे. फक्त पुण्याचा विचार केला तर इथे प्रतीक्षायादीवर असलेल्या चौदा हजार लोकांपैकी आतापर्यंत सुमारे अठराशे लोकांनी डिपॉझिट भरले आहे. हा प्रतिसाद असाच अल्प प्रमाणात राहिला तर प्रतीक्षायादी एकदम रोडावेल व कदाचित याचा फायदा गरजू ग्राहकांना मिळू शकेल. त्यांना फोनसाठी फारशी वाट पाहावी लागणार नाही. तोटा म्हणाल तर टेलिफोन विस्ताराच्या योजना रोडावतील. या डिपॉझिट योजनेतून पुण्याला बारा कोटी व देशात एकूण दोनशे कोटी रुपयांचे भांडवल मिळेल असा टेलिफोनखात्याचा अंदाज आहे. तो कितपत खरा ठरतो पाहावयाचे.

पण पैसे अडकवून ठेवायला पुणेकरच काय सर्वच मंडळी नाराज असतात हे लक्षात

पृष्ठ ३२ वर

# सोलकढी

## □ चला आता कराडला जाऊ : २

'अध्यक्षा दुर्गाबाई भागवत यांच्याबद्दल विस्ताराने लिहिणे मलासुद्धा अवघड आहे; पण लोकाग्रहास्तव लिहीन; पण ते कधी तरी पुढेमागे. एवढेच म्हणतो की साहित्य, धर्म, मानववंशशास्त्र, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, इतिहास, लोककला, समाजशास्त्र, पु. ल. देशपांडे इत्यादी विषयांवरच्या दुर्गाबाईंच्या अजोड व्यासंगापुढे आम्ही



सफशेल विनम्र आहो.'

–'माणूस'चे अनंतराव

( ४ ऑक्टोबर १९७५ च्या 'सोलकढी'-तल्या 'चला आता कराडला जाऊ' या स्फुटातून )

हा मजकूर आम्ही लिहिला होता तेव्हा दुर्गा भागवत नुसत्या अध्यक्षा होत्या; आत्तापर्यंत त्या रा. अ. अध्यक्षा झाल्या आहेत. या मधल्या काळात जे घडले त्याची माहिति 'माणूस'च्या आणि 'सोलकढी'च्या वाचकांना करून देणे हे प्रस्तुत सदरकर्ता त्याचे कर्तव्य मानतो. आम्ही लहानपणापासूनं कर्तृव्य भावनेपेक्षा मोठे मानलेले आहे.

'पु. ल. देशपांडे' हा दुर्गाबाईंच्या अनेकविध व्यासंगविषयांपैकी एक असल्याचा निर्देश आम्ही करून ठेवला होता. त्याबद्दल काही तरी, संमेलनाचे नियोजित एकावन्नावे अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच आपल्याला ऐकायला मिळेल, असा माझा होरा होता. तो चुकला नाही.

तात्कालिक निमित्त झाले 'महाराष्ट्र टाईम्स'मधल्या 'अहंकारी आणि बेछूट' या अग्रलेखाचे ( २१ ऑक्टोबर १९७५ ) खुद्द या अग्रलेखाला निमित्त झाले ते दुर्गाबाईंच्या एका आठीबाज वक्तव्याचे. मुंबई मराठी पत्रकार संघात पत्रकारांशी गप्पागोष्टी करताना त्या असे म्हणून गेल्या की डॉ. भांडारकरांनी इंग्रजीत संस्कृतचे व्याकरण लिहून संस्कृतचा वट्टाबोळ केला. 'महाराष्ट्र टाईम्स'च्या गोविंदराव तळवलकरांना हे महन झाले नाही. लोकमान्यांसारखा विद्वानही ज्या भांडारकरांच्या विद्वत्तेपुढे लीन होतो तेथे दुर्गाबाई कोण ? टिळक आणि तळवलकर नातेवाईक पत्रकार. तेव्हा तळवलकरांनी दुर्गाबाईंना हटकले. त्यांच्या अहंकारी कर्तृत्वाची प्रकरणशः कहाणी ऐकवली. त्यात पु. ल. आलेच. दुर्गाबाईंच्या एका भाषांतरातल्या असंख्य चुका पु. लं. नी दाखवून दिल्यामुळे दुर्गाबाई पु. ल. वर अशा आणि एवढ्या फिस्कारत असतात, अशी कार्यकारणमीमांसा गोविंदरावांनी केली होती.

अपेक्षेप्रमाणे अग्रलेखाला दुरुत्तर ( २४ ऑक्टोबर १९७५ ) दिलेच. त्यात, परवानायुक्त लेखनावरच प्रपंच भागवणाऱ्या तळवलकरांची आणि आपले समग्र भाषांतर न वाचता काही पृष्ठेच फक्त तपासायचा आव आणणाऱ्या देशपांड्यांची भली संभावना केली होती. एकाला व्याकरणातले काव्य आणि दुसऱ्याला मूळ ग्रंथातले आशयसूत्र कळायची पात्रता नाही, अशी माहितीसुद्धा त्यात दुर्गाबाईंनी नम्रपणे पुरवली होती.

अपेक्षेप्रमाणे पु. लं. चे पुलुत्तर आलेच ( ३ नोव्हेंबर १९७५ ). त्यात दुर्गाबाईंच्या भाषांतराचे काही नमुने त्यांनी पुढे ठेवले. भाषांतर तपासायचा नुसता आव आणणाऱ्याला हे बिलकुल शोभले नाही. मला आपला असा वहीम होता की देशपांडे यात फसणार : चुकीच्या भाषांतराचे म्हणून जे नमुने ते सादर करायला जाणार ते आपले जाणकार दृष्टीला योग्य, उचित, स्वाभाविकच नव्हे तर समर्पक भाषांतर वाटणार. म्हणून मी ते नमुने नीट बारकाईने पाहिले; पुन्हा पुन्हा पाहिले; मला तर ते केवळ चुकीचेच नव्हे तर बेछूटपणाचेही वाटले; अर्थात हा कच्चा खर्डा असल्यामुळे कच्च्या बेछूटपणाचे वाटले, असे म्हणतो.

अपेक्षेप्रमाणे दुर्गाबाईंनी दुरुत्तर दिलेच ( १० नोव्हेंबर १९७५ ). त्यात चुकीच्या भाषांतराबद्दल फारसा खेद नाही. त्याऐवजी, पु. लं. नी काही पृष्ठेच तपासली ( तपासली म्हणजे तपासायचा नुसता आव आणला. ); शासनातल्या अशा गोपनीय गोष्टी अयोग्य तऱ्हेने ( ? ) प्रसिद्ध होणे मुख्य मंत्र्यांना खचितच आवडणार नाही; त्या वेळचे मुख्य सचीव श्री. डी. आर. प्रधान ( आय्. सी. एस्. ! ) यांच्या खास आग्रहामुळे (कपाळा--वरच्या आठ्या पुसून) आपण राजिनामा दिला नाही. (हा गौण–प्रधान विवेक अंगी रा. अ. असल्याशिवाय नाही करता येत) पैसे घेणाऱ्याचे आभार कसले मानायचे ? पु. लं. ना कुठल्याच विषयातले फारसे काही कळत नाही, या आणि इतर मोलाच्या आणि तात्पर्याच्या गोष्टी दुर्गाबाईंनी सांगितल्या आहेत. दुर्गाबाईंच्या सगळ्या गोष्टींचे महाराष्ट्र मनन करतो; याही गोष्टींचे करील.

या पत्राला पु. ल. पुलुत्तर लिहिणार नाहीत अशी अपेक्षा होती. अपेक्षेप्रमाणे झाले; पण या सगळ्या प्रकरणाचा आढावा घेऊन, 'दुर्गा भागवतांच्या विरुद्ध रान उठवायला आरंभ झाला आहे; साहित्यिकांनो, सावधान–' अशा इशारा 'सोबत'च्या २३

नोव्हेंबरच्या अंकातल्या संपादकीयात देण्यात आला आहे. 'सोवत'च्या संपादकांना असे वाटते की गोविंदराव तळवलकर आणि पु. ल. देशपांडे यशवंतरावांचे हुजरे असून दुर्गाबाईंना बदनाम करायचे षडयंत्रच त्यांनी 'महाराष्ट्र टाईम्स'मधून रचले. असेल बाबा, तसेही असेल. सोवतकरांना कळते तसे बाकीच्यांना नाही कळत. हुजरेगिरी त्यांना अचूक दिसते. हुजरेगिरीचा त्यांना पराकाष्ठेचा तिटकारा. 'हुजऱ्या' हा तुच्छ शब्द त्यांच्या तोंडात झकास शोभतो. आणीबाणीच्या काळातही ज्या मिजासमस्तीत आपले स्वत्व त्यांनी टिकवून धरले आहे तिच्यामुळे तो शब्द वापरायचा एक विशेष अधिकार त्यांना प्राप्त झाला आहे. 'हरामखोर' शब्द वापरायचा असाच विशेष अधिकार आचार्य अत्र्यांना प्राप्त झाला होता, असे अनंतरावाला आठवते.

वास्तविक संमेलनाध्यक्षा दुर्गा भागवत, त्यांचा रास्त अभिमान; नम्र पद्मश्री पु. ल. देशपांडे, त्यांचे सर्व विषयातले दरोबस्त अज्ञान; चव्हाण-टाईम्सचे संपादक गोविंदराव तळवलकर; स्वत्वसांभाळू 'सोवत'कार; कै. सर रामकृष्ण भांडारकर; निवृत्त सचीव डी. आर. प्रधान (आय्. सी. एस्.); 'पॅटर्न्स ऑफ कल्चर'; चुकीचे आणि अचुकीचे भाषांतर; खूर आणि पाय; 'अहंकारी आणि वेळूट'; वट्टाचाबोळ आणि बोळातले ब्रॅडमन; हे आणि ते; ते आणि हे, या आणि असल्यातसल्या गोष्टींबद्दल 'माणूस'च्या आणि 'सोलकढी'च्या वाचकांना काही सांगण्याचे विधात्याने आमच्या कपाळी लिहू नये, असेच खरोखर आम्हाला वाटत होते.

पण आमचे कपाळ विस्तृत; विधात्याचे लिहिणेही विस्तृत.

शिवाय कपाळावर आठचा नसल्यामुळे लिहिणे कसे स्वच्छ उमटते.

ते सांगणे आमचे कर्तव्य होते आणि आम्ही लहानपणापासून कर्तव्य भावनेपेक्षा मोठे मानलेले आहे.

चला आता कराडला जाऊ!

—अनंतराव

# अंगोला

## आफ्रिकेतील व्हिएटनाम

वा. दा. रानडे

आफ्रिकेतील पोर्तुगीज वसाहत 'अंगोला' ११ नोव्हेंबरला स्वतंत्र झाली; पण सबंध देशावर नियंत्रण करणारी एकच केंद्रीय सत्ता तेथे स्थापन होऊ शकली नाही. एम. पी. एल. ए. (पीपल्स मुव्हमेंट फॉर दि लिबरेशन ऑफ अंगोला) एफ. एन. एल. ए. (नॅशनल फ्रंट फॉर दि लिबरेशन ऑफ अंगोला) आणि यू. एन. आय. टी. ए. (नॅशनल युनियन फॉर टोटल इंडिपेन्डन्स ऑफ अंगोला) या तीन संघटनात सबंध देशाची सत्ता आपल्या हाती आणण्यासाठी संघर्ष तेथे तीव्र स्वरूप धारण करीत आहे. या तीन संघटनात स्वातंत्र्यापूर्वीपासूनच संघर्ष होता; पण त्याला आता अधिक तीव्र स्वरूप आले आहे आणि तो या तीन संघटनांपुरताच मर्यादित न राहता परकीय सत्तांची त्यांना मदत मिळत आहे.

या तीन संघटनात एकमत व युती घडवून आणण्याचे प्रयत्न अनेकदा झाले; पण त्यात अपयश आले. तिन्ही संघटनात २२ जूनला एक करार झाला होता. पंधरा जूनला निवडणूककायदा जारी करून ऑक्टोबरात निवडणुका घ्यावयाच्या, लोकांजवळची शस्त्रे काढून घ्यावयाची, तिन्ही संघटनांची लष्करी दले एकत्र करून तीस हजार सैनिकांची एकच अंगोला राष्ट्रीय सेना उभारावी असे या करारात ठरले होते; पण एक महिन्यातच तो मोडून स्वातंत्र्यापूर्वी जास्तीत जास्त टापू आपल्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी त्यांच्यात चकमकी सुरू झाल्या.

तिन्ही संघटनातील संघर्ष वांशिक, वैयक्तिक आणि तात्त्विक असा तिहेरी स्वरूपाचा आहे. एम. पी. एल. ए. चे लोक अंगोलाच्या मध्यपट्ट्यातील किमबुडू जमातीचे असून एकूण लोकसंख्येशी त्यांचे प्रमाण २३ टक्के आहे. एफ. एन. एल. ए. चे लोक बाकांगो जमातीचे असून उत्तरेकडील टापूत त्यांचे प्रमाण १३ टक्के आहे. या टापूला लागूनच ब्राझाव्हिल कांगो (पूर्वीचा फ्रेंचनियंत्रित कांगो आणि झायरे (पूर्वीचा बेल्जियन कांगो) असून तेथे सीमाभागात या जमातीचेच लोक आहेत. युनिटा या संघटनेचे लोक ओव्हिमबुंडू जमातीचे असून दक्षिणेकडील भागात त्यांचे प्रमाण ३८ टक्के आहे.

तिन्ही संघटनांच्या नेत्यांत वैयक्तिक संघर्ष आहेतच; पण राजकीय तत्त्वप्रणालींचा संघर्ष अधिक महत्त्वाचा आहे. एम. पी. एल. ए. चे नेते ऑगस्टिनो नेटो कम्युनिस्ट आहेत तर एफ. एन. एल. ए चे नेते होल्डन रॉबर्टो यांनी प्रथमपासून कम्युनिस्टविरोधी भूमिका घेतलेली आहे. युनिटा या तिसऱ्या संघटनेचा कल सर्वसाधारणपणे नेमस्त समाजवादी कार्यक्रमाकडे आहे. एम. पी. एल. ए. संघटनेस रशियाची मदत आहे. नेटो यांच्या नेतृत्वाखालील सरकारला रशिया व पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राष्ट्रांनी लागलीच मान्यता दिली. अकरा नोव्हेंबरला स्वातंत्र्याची घोषणा होण्यापूर्वीच सबंध देश आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचे उद्दिष्ट एम. पी. एल. ए. ने जवळजवळ साध्य केले होते. ऑगस्टअखेर देशातील १६ प्रांतिक राजधान्यांपैकी १२ त्यांनी आपल्या ताब्यात घेतल्या होत्या. 'सोळापैकी बारा प्रांत आमच्या नियंत्रणाखाली असताना आमचे सरकार हेच सबंध देशाचे सरकार आहे असा दावा करण्याचा आम्हाला हक्क आहे' असे नेटो यांनी घोषित केले होते.

काय घडत आहे याची कल्पना आल्यावर एफ. एन. एल. ए. आणि युनिटा या दोन संघटनांनी परिस्थितीचा अंदाज घेऊन एम. पी. एल. ए. विरुद्ध लढण्यासाठी युती केली. आपले बळ एकवटले. या दोन संघटनांना झायरेमधून विमानांनी मोठ्या प्रमाणावर शस्त्रमदत येऊ लागली. झायरेची राजधानी किनशाशाहून एफ. एन. एल. ए. ची राजधानी कार्मोना व युनिटाचे मुख्य ठाणे सिल्हा पोर्टो येथे विमानांनी हजारो टनांची शस्त्रसामुग्री आली. उत्तरेकडून राजधानी लुआंडावर सरळ हल्ला करून एम. पी. एल. ए. ला तेथून हुसकावून लावायचे असा प्रयत्न

एफ. एन. एल. ए. ने केला; पण त्यात अपयश आले. तेव्हा एकाच वेळी अनेक ठिकाणी हल्ले करण्याची योजना त्यांनी आखली. तेवीस ऑक्टोबरला त्यांनी उत्तरेकडच्या तेलसमृद्ध कॅबिन्डा बेटावरील एम. पी. एल. ए. च्या ठाण्यावर हल्ला केला. त्याच वेळी ईशान्य भागात हेनरिक द कार्व्हालो या एम. पी. एल. ए. च्या मोठ्या तळाजवळ आणि पूर्वेस बेंग्वेला रेल्वेवरील पूर्वेकडचे टोक टेक्झेराजवळ हल्ले चढविण्यात आले. यापैकी बहुतेक हल्ले एम. पी. एल. ए. ने परतवून लावले; पण दक्षिण भागात अचानक दोन हजार सैनिकांचे एक पथक आलेले आढळले. चिलखती गाड्या, हेलिकॉप्टर्स व आधुनिक वाहतूक-सामग्रीने हे सैनिक सुसज्ज आहेत. त्यात एकतृतियांश गोरे आहेत. दक्षिण आफ्रिकेने नामिबियामधून हे सैनिक पाठविले असा एम. पी. एल. ए. चा आरोप आहे.

एफ. एन. एल. ए. आणि युनिटा या दोन संघटनांनी गेल्या महिनाअखेर सुरू केलेल्या संयुक्त चढाईतून महत्त्वाची उद्दिष्टे साध्य केली आहेत. लोबिटो हे अंगोलातील सर्वांत मोठे बंदर त्यांनी जिंकले आहे. त्यामुळे आता या बंदरातून दोन्ही संघटनांच्या आघाडीच्या पथकांना रसदपुरवठा करता येईल. दक्षिणेकडील अनेक महत्त्वाच्या शहरांतून त्यांनी एम. पी. एल. ए. ला हुसकावून लावले असून आमचे सरकार हेच सबंध देशाचे सरकार या त्यांच्या दाव्यास आव्हान दिले आहे.

अंगोलातील हे यादवीयुद्ध दीर्घकाळ चालून अंगोला आफ्रिकेतील व्हिटनाम बनण्याची शक्यता दिसत आहे. एम. पी. एल. ए. ची बाजू कमकुवत होऊ लागल्याचे दिसताच रशियाने लष्करी मदत वाढविली. क्यूबातून तीन हजार सैनिक त्यांच्या बाजूने लढण्यासाठी आले. रशियाने पाठविलेल्या लष्करी मदतीत मिग २१ विमाने आहेत. ही विमाने चालवू शकतील असे अधिकारी एम. पी. एल. ए. च्या सेनेजवळ नाहीत. क्यूबाचे वैमानिक ती चालवीत असण्याचा संभव आहे. अंगोलाचा मधला पट्टा, राजधानी लुआंडा आणि उत्तरेकडचे कॅबिन्डो बेट एम. पी. एल. ए. च्या ताब्यात आहे. उत्तरेकडचा टापू एफ. एन. एल. ए. च्या व दक्षिणेकडचा टापू युनिटाच्या ताब्यात आहे. लष्करी बळाच्या दृष्टीने एम. पी. एल. ए. आणि एफ. एन. एल. ए. जवळजवळ तुल्यबळ आहेत. दोन्ही बाजूंस तीस हजार सशस्त्र सैनिक आहेत. युनिटाजवळ पंधरा हजार सशस्त्र सैनिक आहेत. एम. पी. एल. ए. ला रशियाची मदत आहे तर दुसऱ्या दोन संघटनांना अमेरिका व चीनची मदत आहे. अंगोलाबाबत काय धोरण स्वीकारावे याबाबत आफ्रिकन ऐक्यसंघटनेत एकमत नाही. टांझानिया, झांबिया, ब्राझाव्हिल कांगो, मोझांबिक यांचा एम. पी. एल. ए. ला पाठिंबा आहे. रशियाने एम. पी. एल. ए. ला पाठिंबा देऊन लष्करी मदत केल्याबद्दल आफ्रिकन ऐक्यसंघटनेचे अध्यक्ष युगांडाचे इदी अमीन यांनी निषेध प्रदर्शित केला व आफ्रिकन राष्ट्रांनी आपले शांततादल अंगोलात पाठवावे अशी सूचना केली; पण तिला फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. रशियन प्रभावाखाली असलेल्या सरकारच्या नियंत्रणाखाली सबंध अंगोला जाऊ देणे अमेरिकेच्या हिताचे नाही. चीनला आफ्रिकेत रशियाचा प्रभाव वाढू द्यावयाचा नाही हे लक्षात घेता अंगोलातील यादवीयुद्ध म्हणजे बड्यांचाच सत्तासंघर्ष आहे. □

## पहिली ट्यूबरेल्वे

श्रीमती इंदिरा गांधींनी दिनांक २९ डिसेंबर १९७२ रोजी मेट्रोपॉलिटन ट्रान्स्पोर्ट प्रोजेक्टचं कलकत्ता येथे उद्घाटन केले. त्या प्रोजेक्टतर्फे साडेसोळा किलोमीटर, डमडम ते टॉलीगंजपर्यंत भूमिगत रूळ टाकायचे काम (Tube Railway) हाती घेण्यात येणार आहे. एकूण खर्चाचा अंदाज १४० कोटींच्या घरात जाईल. पर्यायानं ही भारतातील पहिली ट्यूबरेल्वे होणार आहे. काम १९७९ पर्यंत आटोपावे असा अंदाज आहे. ह्या ट्यूबरेल्वेत सतरा स्टेशन्स राहतील मॉणि एकूण अंतर कापायला ३० मिनिटं वेळ लागेल.

ह्या कामासाठी भारताला रशिया मदत करणार आहे. रेल्वेमिनिस्ट्री भारत सरकार आणि टेक्नो-एक्सपोर्ट, मास्को ह्यांच्यात तसा एक करार झाला आहे. करारात काही तरतुदी आहेत त्या अशा–

दहा रशियन एक्सपर्टस्चं एक पथक भारतात येईल.

भारतीय इंजिनियर्सना ट्यूबरेल्वेसंबंधीच्या तांत्रिक शिक्षणाची सोय रशियात करण्यात येईल. ह्या प्रोजेक्टला लागणारी यंत्रसामुग्री, सामान आणि स्टोअर्स वगैरे संबंधी आणखी काय मदत करता येण्यासारखी आहे ह्याचा विचार रशियन अधिकारी करीत आहेत. ⌑

प्रख्यात रशियन पेंटर निकोलाई रोईरिच ह्याच्या जन्मशताब्दीनिमित्त ह्या वर्षी रशियाने बरीच पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. लिटररी हेरिटेज, पेजेस फ्रॉम डायरी, सिलेक्टेड एसेज, लेटर्स आदी कला आणि संस्कृतीसंबंधी चित्रकाराच्या टिपणांचे पुस्तक–किंडल् युवर हार्टस् नावाने छापले जात आहे.

ह्या चित्रकाराच्या कवितांचे पुस्तक 'पिस्मेना' त्याच्या चित्रकृतीसहित प्रसिद्ध झालं आहे.

ह्या चित्रकाराने आपले घर भारतात केलं आहे.

प्रख्यात बंगाली अभिनेत्री देविकाराणीने ह्या चित्रकाराशी लग्न केलं.

⌑

# " स्वयंस्फूर्त उत्पन्न – निवेदन योजना "

म्हणजे

आपणहूनच स्वतःचे उत्पन्न जाहीर करण्याची ही योजना, तुम्हांला स्वतःजवळचे, आजवर जाहीर न केलेले, उत्पन्न व संपत्ति ( मिळकत ) प्रकट करण्याची सर्वोत्तम संधी मिळवून देत आहे.

दंड नाही, खटले नाहीत.

कर गोळा करण्याचे दरहि माफक.

## त्वरा करा

ठराविक नमुनापत्रावर तुमच्या उत्पन्नाचा तपशील भरून तो प्राप्तिकर आयुक्त ( कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स ) यांना सादर करा. उत्पन्न जाहीर करण्याची शेवटची तारीख **३१ डिसेंबर १९७५**
तपशील व हे नमुने ( फॉर्म्स ) यांसाठी, कृपया तुमच्या प्राप्तिकर आयुक्तांशी ( कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स ) संपर्क साधा.

## स्वतःला मदत करा : राष्ट्राला साहाय्य करा –

डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन
( पब्लिकेशन अॅण्ड पब्लिक रिलेशन्स )
इन्कमटॅक्स डिपार्टमेंट, न्यू दिल्ली.

( davp 75/366 )

# फ्रॉम रशिया विथ लव्ह

**१९४२.** दुसरे महायुद्ध. हिटलरची जबरदस्त झुंज. रशिया काही शरण येत नाही. मास्को खूप प्रयत्न केले तरी त्यांच्या आधिपत्याखाली येत नाही. काय करावं ह्या विवंचनेत हिटलर असताना त्याच्या विश्वासू सेनापतीनं, हेषरिच् हिमलरनं एक योजना हिटलरला सादर केली. या योजनेच्या अंतर्गत, लोहपुरुष स्टॅलिनला मास्कोपासून वेगळं करता आलं तर मास्कोची स्वारी सफल व्हायची आशा होती. थेट क्रेमलिनमध्ये छत्रीधारी सैनिकांनी उतरून स्टॅलिनला जिवंत पकडायचे आणि एका तयार ठेवलेल्या विमानानं त्याला पळवून आणायचे अशी योजना होती. ५०० छत्रीधारी सैनिक आणि पंधरा विमानं ह्यासाठी पोलंडहून मास्कोला जाणार होती. ह्या गुप्त कटाचं नेतृत्व कॅप्टन ओटो स्कोरसजेनी करणार होते. ह्या वर्षीच ह्या कॅप्टनचं निधन झालं; परंतु ही योजना कार्यान्वित करता आली नाही. कारण त्यांना कुणी रशियन फितुर माणूसच मिळाला नाही. एक जरी फितूर मिळाला असता तरी काम फत्ते झालं असतं. दुसरं कारण म्हणजे जर्मन गुप्तहेरांना स्टॅलिन क्रेमलिनमधल्या बंकरमधे कोणत्या वेळेस राहतो ह्याचा पत्ता लागू शकला नाही.

पुढे ही योजना मुसोलिनीला जेलमधून पळवून आणण्यात सफल झाली. १९४४ मधे ह्या योजनेचे नेतृत्व कॅप्टन ओटो स्कोरसजेनी ह्यांनीच केलं होतं.

ज्या देशात स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी मायभूमीला काळिमा लावतील असे फितूर नसतात तो देश कधीच शरण जात नाही.

ऑन्द्रे साखारॉव्ह ह्या वैज्ञानिकाला ह्या वर्षीच शांततेचं नोबल पारितोषिक देण्यात आलं. साखारॉव्हला सोव्हिएट हैड्रोजनबॉंबचा जनक मानतात. त्याने शांततेसाठी विज्ञानाचा उपयोग व्हावा असे मत पुनःपुनः प्रदर्शित केले. त्याची दाद घेतली जाईना तेव्हा त्याने मानवी हक्कदिनी ५ डिसेंबर १९६६ रोजी मूकनिदर्शन केले. त्यामुळे त्याला त्याच्या पदाला, नोकरीला, अधिकाराला मुकावे लागले. नुकतेच तासवृत्तसंस्थेने हे बक्षीस सोव्हिएट विरोधाला देण्यात येत आहे असे जाहीर केले.

याआधीही सोल्झेनित्सिनला जेव्हा रशिया सोडावा लागला होता तेव्हाच त्यानं ह्या महान् वैज्ञानिकाला रशियात कशा प्रकारची मानहानी सहन करावी लागत आहे हे विशद केले होते.

आतापर्यंत नोबलपारितोषिक ज्यांना ज्यांना (रशियन) देण्यात आले त्यांच्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी, कर्तृत्वाविषयी, देश आणि पक्षनिष्ठेविषयी सोव्हिएट रशियात शंकेचंच वातावरण होतं. ह्याला अपवाद फक्त एकच. मिखाईल शॉलाकॉव्हचा.

जेव्हा जेव्हा याआधी हे पारितोषिक कुणा रशियन व्यक्तीला देण्यात आले तेव्हा तेव्हा एका शीतयुद्धालाच सुरुवात झाली. रशियाने हे पारितोषिक देण्यामागे एक राजकीय डाव आहे असे साऱ्या जगाला आवर्जून सांगितले. रशिया एका तत्त्वप्रणालीला बांधला गेलाय्. त्या प्रणालीपुढे माणूस मोठा नाही. त्या प्रणालीनं प्रत्येक माणसाला मोठेपण बहाल करायचं आहे आणि जिथं त्यांना ह्या मोठेपण बहाल करण्याच्या प्रवृत्तीशी आणि प्रणालीशी प्रतारणा करणारी माणसं दिसली तिथं त्यांची टीका करायला त्यांनी कमी केलं नाही. (क्वचित्) त्याला त्यांच्या लेखकसंघटनेतून वगळण्यात आलं, कुठं तरी दूर अज्ञातवासात त्यांची रवानगी करण्यात आली. काहींनी देशही सोडला वा त्यांना देश सोडायला भाग पाडण्यात आलं.

पहिला रशियन लेखक, ज्याला नोबलपारितोषिक देण्यात आलं, तो म्हणजे इवान् बनिन. १९३३ मधे त्याला हे पारितोषिक देण्यात आलं. कप ऑफ लाइफ, चेंग्ज् ड्रीम्स्, जंटलमन फ्रॉम सॅन फ्रांसिस्को आणि त्याची इतर पुस्तकं १९१२ ते १९१६ साली रशियात प्रसिद्ध झाली. त्याने लॉंगफेलोच्या कवितांचं सुंदर भाषांतरही केलं. रशियन क्रांतीनंतर काही वर्षांतच त्यानं रशिया सोडला. पॅरिसमध्ये तो स्थायिक झाला. त्याच्या लेखात ॲन्टी–कॅम्युनिस्ट–सूर येऊ लागला. रशियाच्या बाहेर असला तरी हृदयात अख्ख्या रशियाचं वातावरण घेऊन तो जगत होता. त्याच्या लेखनातील पात्रे रशियन होती, वातावरण रशियन होतं. तो परत रशियात कधी गेला नाही. आपल्या मातीची ओढ ही भयंकर चीज आहे. देशांतर करूनही त्याचं मन रशियातच गुंतलं होतं. परत जायची इच्छा त्यानं कित्येक पत्रांतून उद्धृत केली होती; पण वय आणि आजार ह्या कारणांमुळं तो गेला नाही. कदाचित त्याला भीतीही वाटत असावी–नवा रशिया माझं स्वागत करील की नाही? साऱ्या जगानं माझा उदोउदो केला, माझा रशिया मला डोक्यावर घेईल की नाही?

त्याला नोबलप्राईझ मिळालं त्याचं रशियाला साहजिकच कौतुक नव्हतं. कारण बनिन् हा 'आउट सायडर' ठरला होता. फक्त जन्मानं तो रशियाच्या मातीशी निगडित होता. नव्या देशाच्या घडणीत त्याचा हातभार लागलाच नव्हता.

तरीही त्याच्या शैलीविषयी रशियनांना आदर होता.

त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या सगळ्याच कृतींचं संकलन दोनदा रशियात प्रसिद्ध झालंय्. नऊ खंडांत त्याच्या कथा, ज्या त्यानं रशिया सोडल्यानंतर लिहिल्या, प्रसिद्ध केल्या जात आहेत.

दुसरा रशियन साहित्यिक, ज्याला नोबल पारितोषिक मिळाल्यामुळे रशियन वादळ उठलं अन् जगभरचे विचारवंत ज्याच्याविषयी सहानुभूतीनं भारावून बोलत होते, तो होता बोरिस पास्टरनॅक. त्याची कादंबरी डॉ. झिव्हॅगो इटलीत प्रसिद्ध झाली. ती कादंबरी रशियाबाहेर प्रसिद्ध करण्यात येऊ नये म्हणून लेखकावर दडपण आणलं गेलं; पण त्या दडपणाला लेखकानं जुमानलं नाही. त्याला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. तरीही तो विचलित झाला नाही. त्याला नोबलपुरस्कार देण्यामुळं रशियात वातावरण क्षुब्ध झालं. परिणती क्रुश्चेव्हनं त्याला सांगितलं,–लेखकानं रशियाबाहेर पारितोषिकं घ्यायला जावं पण परत यायची जरुरी नाही. लेखकसंघातून त्याला वगळण्यात आलं.

पण लेखकाचं धैर्य अन् देशभक्ती त्याने लिहिलेल्या पत्रातील प्रत्येक ओळीत जाणवते. हे पत्र त्याने ६ नोव्हेंबर १९५८ ला प्रावदाच्या संपादकाला लिहिलंय्-जेव्हा राजकीय घोळ माझ्या कादंबरीच्या संबंधात उठवला जात आहे तेव्हा हे स्पष्ट आहे की, माझ्या कृतीला नोबल पारितोषिक देण्यामागे राजकीय डाव आहे. त्याचे भयंकर परिणाम झाले आहेत. म्हणून मी स्वेच्छेने आणि कुणाच्याही दडपणाला बळी न पडता नोबल पारितोषिक नाकारतो आहे. एन्. एस्. क्रुश्चेव्ह ह्यांनी लिहिलेल्या पत्रात मी लिहिलय् की मी जन्म, कर्म आणि नियतीनं रशियाशी निगडित आहे आणि रशियासोडून परक्या देशात राहण्याचा विचारच माझ्या डोक्यात येऊ शकत नाही.

पारितोषिक नाकारून पास्टरनॅकनं रशियन लेखकाची प्रतिमा उजळ केली. आज रशियात पास्टरनॅकला पुनश्च मानाचं स्थान मिळत आहे. त्याच्याविषयी, त्याच्या कवितांविषयी अभिमानानं बोललं जात आहे. His Genius will be remembered for a long time to come असं रशियन समीक्षकच म्हणत आहेत. आता बघायचं, त्याचं डॉक्टर झिव्हॅगो रशियात प्रसिद्ध केव्हा होते ?

मिखाईल् शॉलॉकाव्ह ह्या लेखकाला १९६५ साली साहित्याचं नोबल पारितोषिक मिळालं. रशियानं फक्त ह्या लेखकाच्या बाबतीतच गौरवोद्गार काढलेत. 'अॅन्ड क्वाएट फ्लोज दी डॉन' ही त्याची संस्मरणीय कृती. तिच्यातून त्यानं क्रांतिपूर्व अन् क्रांतीनंतरच्या घटना जिवंत केल्यात. रशियाच्या मते संपूर्ण इमानदारीनं रशियाचं जिवंत चित्रण ह्या लेखकानं केलंय्.

पुनः एकदा सोल्झेनित्सिनला हे पारितोषिक मिळाल्यामुळे वादळ उठलं. एके काळी रशियन राज्यकर्त्यांनी ह्याचा उदोउदो केला. स्टॅलिनच्या पश्चात ह्यानं एक कादंबरी लिहिली, ती त्याच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारली होती. कादंबरीचं नाव 'ए डे इन दी लाइफ ऑफ इवान देनिसोविच' क्रुश्चेव्हला ह्या कादंबरीचं हस्तलिखित दाखवण्यात आलं आणि त्याला ते आवडलं. कारण कादंबरीत स्टॅलिनच्या राजवटीत बुद्धिवंतांना, कलावंतांना दिलेल्या यातनांचा पाढा वाचला गेला होता. स्टॅलिनच्या विरुद्ध प्रसार करता यावा ह्या उद्देशानं ही कादंबरी रशियात 'नोवी मीर' नियतकालिकात प्रसिद्ध झाली अन् सोल्झेनित्सिनचं नाव सर्वांच्या परिचयाच झालं; पण लेखकाला स्वतःला आविष्कृत करायचं होतं. त्यासाठी त्यानं १९३० पासून लिखाण सुरू ठेवलं होतं. त्याचा अनुभव भयंकर होता. वयाच्या २८ व्या वर्षी कैदीनंबर २३२ म्हणून त्याला सैबेरियाला पाठवण्यात आलं. वयाच्या छत्तिसाव्या वर्षी मृत्यूपर्यंत त्याला हद्दपार म्हणजे थेट चीनच्या सरहद्दीवर निर्जन जागी पाठविण्यात आलं. क्रुश्चेव्हच्या अमदानीत त्याची सुटका. थोडी सूट. परत भयंकर यातनांची फेरी; पण ह्या सगळ्या वैयक्तिक अनुभवांची गाथा त्यानं शब्दात गुंफली अन् तो येऊ नये एवढ्या संकटात आला. ज्या रशियात त्याच्या लेखनानं तो हवासा होता तिथं नकोसा झाला. कारण आता त्याला नोबल पारितोषिक जाहीर झालं होतं अन् तेही यातना-शिबिरांची इत्थंभूत माहिती कादंबऱ्यांतून दिल्याबद्दल. त्याचं 'गुलाम आर्चीपिलॅगो' यातनाशिबिरातील चर्चा, गोष्टी, क्रूर वागणूक, अनुभव ह्यांचं चित्रण आहे. हे सगळं करताना त्यानं एका देशाला अन् एका प्रणालीला दूषण लावलं आहे अन् तेवढ्या एका गोष्टीमुळं तो "राष्ट्रद्रोही" ठरला आणि त्याला रशिया सोडायला भाग पाडण्यात आलं.

रशियन टीकाकारांचं म्हणणं त्यानं देशाची प्रतिभा वैयक्तिक स्वार्थासाठी डागळली. आज जे सुख अन् ऐषाराम तो भोगत आहे त्याच्या बदल्यात त्यानं आपला आत्मा गहाण टाकलाय. इमान गहाण टाकलंय. त्यानं स्वतःची 'प्रॉपर्टी' केलीय. खूप धन संग्रहीत केलंय. साठ लाख रुपये बँकबॅलन्स जमा आहे. तीन मोटारी आहेत.

त्याला नोबल पारितोषिक देण्यामागचा उद्देश एक राजकीय कट होता असं जगभरचे प्रगतिशील वाङ्मयाचे समीक्षक म्हणत आहेत. सोव्हिएट जनतेला सोल्झेनित्सिन परका (outsider) वाटतो आहे. अशा प्रवृत्तीच्या लेखकाची स्टॅलिननं कशी वासलात लावली असती ह्याचा नुसता विचारच अंगावर शहारा आणणारा आहे. रशियाने सोल्झेनित्सिनला जायला सुचवलं हे तेथील बदलत्या धोरणाचं सुचिन्हच होय.

—झिरो—झिरो—सेव्हन





# आहुती !

कुं. ल. पुरी

रात्र जसजशी क्षणाक्षणानं वाढत जाते अन् पृथ्वीचा कण न् कण थंड होऊ लागतो तसतशी अस्वस्थता वाढत जाते, मन-सूर्य भडकून उठतो. डोक्यात विचारांचा आगडोंब उसळतोय् ! डोक्याचं कवच फोडून वासनेचा लाव्हा-रस वाहू लागेल की काय असं वाटू लागतं.

नवीनच पकडून आणलेला सिंह जसा संतप्त होऊन पिंजऱ्यात धुमसत फिरू लागतो तसाच तो आपल्या शयनकक्षेत फिरत आहे—झपाटल्यासारखा.

प्रश्नचिन्ह—सापासारखं फणा काढून उभं !

'काय कमी आहे माझ्यात ? मुली माझ्यापासून दूर दूर का पळतात ? एक डोळा आहे म्हणून ? ... छे. माझ्यापेक्षाही जास्त व्यंग असलेली माणसं आहेत या जगात ! नवीन जवळ येत नाहीत अन् जुन्या जवळ येऊ देत नाहीत. असं का ?...'

पाण्यासारखी दारू पिऊन तो खोलीत इकडून तिकडे हिंडत होता.

'अरेच्या ! मी किती बावळट ! मला जे हवं ते माझ्या घरीच आहे की...न मागण्याचा मूर्खपणा केलाय् मी...'

...आणि त्याची पावलं सीतेच्या शयन-कक्षेकडे वळली.

अर्धरात्रीची निरव शांतता. खोलीत निळ-सर मंद प्रकाश आणि पलंगावर पहुडलेली एक मुग्ध मानवी कळी.

'सीता ऽ ए सीता ऽ ऽ !'

त्याला विलक्षण आनंद झाला आणि त्याचा असलेला एकुलता एक डोळा चमकला.

ती घाबरून पलंगावर उठून बसली. अस्ताव्यस्त झालेले कपडे ठीक केले. बावर-लेल्या सीतेला काय करावं ते कळेना.

'सीता ऽ !' घोगरा—अधीर—अवाज.

'काय म्हणतोस ?' आवाजात घाबरट-पणा. हृदयाची धडधड.

'मी उगाच बाहेर भटकलो बघ !'

'म्हणजे ?'

'मला आहे स्त्रीची गरज !' त्यानं सरळ मुद्द्यालाच हात लावला. त्याला लाज, संकोच, भीती काहीच वाटत नसे.

'अन्नपूर्णा घरी असताना मी उगीचच अन्यत्र भीक मागत सुटलो !'

'का ऽ य ? ' ती किंचाळली. कोमल कलिकेवर वज्राघात ! त्याच्याकडून ही

---

**' शरिराचं पावित्र्य मानणाऱ्या या समाजात**
**मला कोण पवित्र मानणार ?**
**बहिणीला भावाशी....शीः**
**तुम्ही शास्त्रज्ञ**
**मी सामान्य.**
**तुमचे प्रयोग माझ्या शरीरावर झाले.**
**मन तर नाही बदललं ?**
**मनानं ढासळलेल्या मुलीनं काय करावं ?**
**कुणाला फसवावं ?**
**तुमचा प्रयोग संपला.**
**उपकरणांचं आता काय काम ?'**

---

अपेक्षा नव्हती...या जन्मात तरी. वय तर नव्हतंच पण नातंही नव्हतं...छे...छे...!'

आधीच ती त्याला घाबरत असे. ती त्याचा तिरस्कार करी. त्याचं वागणंच विचित्र...जगावेगळं. घरादाराला त्याचा ताप ! नेहमी आरडाओरड ! सारे रीतिरिवाजच त्यानं धाब्यावर बसविले होते. पप्पांची आज्ञा, त्याच्यावर प्रेम करा. त्याला दुखवू नका. तिरस्कार करू नका, केल्यास व्यक्त तर मुळीच करू नका. तो असामान्य पुरुष होणार आहे, म्हणून काय झालं...

'होय, मला तू हवी आहेस–आता !'

'तुला काही लाज–मर्यादा?'

'म्हणजे काय ?...जरा तूच सांग !'

'माणुसकी नसलेला हा माणूस. रागावून फायदा नाही. ओरडल्यावरही कुणी सध्या येणार नाही तेव्हा त्याला समजावलं पाहिजे. समजेलही कदाचित !' सीतेच्या मनातील विचार.

'कृष्ण, अरे मी तुझी छोटी बहीण !'

'माहीत आहे !' त्याचा रुक्ष स्वर.

'आयाबहिणींशी असं वागू नये !'

'का ?'

'पाप होतं !'

'पाप म्हणजे काय ग ?'

तिनं कपाळावर हात मारून घेतला.

'...म्हणजे वाईट गोष्ट !'

'वाईट ? याला वाईट म्हणतेस ? अग, तुला म्हाईत नाही म्हणून म्हणतेस ! एकदा अनुभव तर घे ! मी अनुभव घेतलाय. म्हणून म्हणतो की या सुखाइतकं सुख माणसांना कुठंच मिळणार नाही !'

'छीः छीः ! अरे बाबा, तुला कसं सांगू ? माणसांच्या नियमात हे बसत नाही !'

'मग तू मला माणसांचे नियम सांग !'

तिनं विचार केला, याला असंच गप्पात गुंतवावं. दिवस निघाला की सुटले मी. उद्यापासून काही वेगळी व्यवस्था करता येईल.

'पप्पांना सांगून तू लग्न कर !'

'लग्न ? ही काय भानगड आहे बुवा ? काय फायदा ?'

'तुला हवं ते मिळेल !'

'म्हणजे त्या स्त्रीशी...'

'होय !'

'मग पाप नाही का तिथं ?'

'नाही !'

'मग चल आपण लग्न करू !'

'आपल्या दोघांचं कसं लग्न होईल ?'

'का नको ?'

'पाप होतंय !'

उपड्या घागरीवर पाणी ! त्याला कसं हाकलावं हे तिला समजेना.

'तुझ्याशी लग्न करण्यात पाप अन् दुसऱ्या स्त्रीशी...साऱ्या बाया सारख्याच...'

'नाही रे ऽऽ कसं सांगू ? आयाबहिणी ...पवित्र नाती...'

'पवित्र ? साला माणूसच मुळात अपवित्र आहे...तसं असतं तर मला हे कसं सुचलं असतं ?'

'तू जनावर आहेस म्हणून !'

सटाक् ! गुलेलमधून खडा सुटावा तसा वाक्प्रहार !

'मी जनावर ... मी जनावर... !' एक अजब सणक निर्माण झालीय ! झोपलेल्या नागाला डिवचलं जणू. त्याचा चेहरा विकृत झाला. खुनशीपणाची गडदता वाढू लागली.

'कृष्ण, सॉरी हं...चुकले मी. माझा तू कृष्ण दादा आहेस ना ? कित्ती कित्ती छान आहेस तू...!'

'यासाठी लग्नाची काय गरज ?...मला बनवतेस ? मी नाही सोडणार !'

ती रडकुंडीला आली. या अपरात्री कोण मदतीला येणार?

'हे बघ, वाटेल तेवढे पैसे घे. बाजारात जा !...'

'हंः बाजारात ? हातचं सोडून...बाजारातल्या तर माजल्यात. साल्या माझा तिरस्कार करतात !'

तिची सहनशीलता संपली.

'मग मी पण तुझा तिरस्कार करते. तू त्याच लायकीचा आहेस. तू निव्वळ जनावर आहेस. थूः तुझ्या जिनगानीवर !' तिला त्याची किळस आली.

'तिरस्कार ... तिरस्कार ... सगळीकडे तिरस्कार ... का ... मी जनावर...! पुन्हा एकदा विक्षिप्तपणाची लहर. कामवासनेची वावटळ. तो एक एक पाऊल पुढं पुढं सरकू लागला.

'खबरदार, एक पाऊल पुढं टाकशील तर...!' तिचं वाक्य घशातच अडकलं.

त्याच्यातील तडफ विजेला लाजविणारी! वाघानं शेळीला उचललं. तो दणकट शरिराचा–अचाट शक्तीचा ... यौवनानं उमलू पाहणारी एक सुकुमार कलिका...तडफ धडपड...असह्य वेदना... ◻

रामस्वामींच्या कानावर बातमी आदळली, 'सीता–सरकारी हॉस्पिटलमध्ये आहे !'

'अरे, पण तिला झाले तरी काय ?' रामस्वामी आपल्या नोकरास पुनःपुन्हा विचारू लागले. नोकर मुकाच. दिल्लीच्या प्रवासानं थकलेले रामस्वामी आपल्या नोकरावर भयंकर चिडले; पण तो काही केल्या बोलेना. शेवटी ते दवाखान्यात गेले.

'गुड मॉर्निंग सर !' डॉ. कुमार.

रामस्वामींनी त्याच्या अभिवादनाचा स्वीकार केला.

'डॉक्टर, व्हेअर इज माय डॉटर ? कशी आहे ती ?'

'ओ. के. ! घाबरण्याचं कारण नाही !'

'डोन्ट स्पीक यूसलेस ! मला सांगताय तुम्ही ? कुठे आहे ती ?'

'ओह. सॉरी सर ! चला...'

डॉक्टर कुमार रामस्वामींना सीतेकडे घेऊन गेले.

'पप्पा ऽऽ !' म्हणत तिनं हंबरडा फोडला. तिच्या गंगाजमुनांना कसला आहे बंध ? काळानं शब्दतीत क्रूर चेष्टा केलीय !

सुखदुःखाच्या प्रसंगी स्थितप्रज्ञासारखे वागणारे रामस्वामी या क्षणी मात्र गडबडले. एक हात तिच्या पाठीवरून फिरवत असताना त्यांनी आपल्या डोळ्यांतील अश्रू रुमालाने टिपले. डॉ. कुमारांचं सुद्धा हृदय पिळवटून आलं.

डॉ. कुमारांचं ऑफिस.

'डॉक्टर, सीतेला काय झालंय ?'

डॉक्टर जरा संकोचले. 'डॉक्टर, संकोचू नका. काय असेल ते सांगा !'

'सर, ऽऽ' डॉ. कुमार किंचित घुटमळले. 'तो...बलात्काराची शिकार झालीय !'

घण ! डोक्यावर घणांचा निर्घृण प्रहार. अनपेक्षित.

'कोण होता तो नरपशू ?' रामस्वामी संतापून ओरडले.

'मानवी बलात्काराच्या केसेस मी खूप पाहिल्यात; पण...हा कुणी पशूच असला पाहिजे...असं वाटतं की ते अनेक असावेत...'

'कोण होते ते हरामखोर...? ती काही नाही बोलली ?' रामस्वामी दातओठ चावत

म्हणाले. ' कोण...'

' कृष्ण !'

' डॉक्टर !... काय बोलताय तुम्ही ? असंभव...तो...'

' होय सर. सीताच तशी बोलली !'

' नाही ... नाही ... कुमार ... ' रामस्वामीच्या अंगातील शक्ती संपली. डोकं गरगरू लागलं. ' कृष्ण ... कृष्ण...भाऊ... बहीण...सतरा वर्षांचं पोर...बलात्कार... अनेक पुरुषांनी केलेला...'

रामस्वामीच्या मनाची इमारत ढासळली. काही समजेनासं झालं. डोकं बधिर झालंय. बसलेत खुर्चीत–निश्चल. उद्ध्वस्त.

डॉक्टर कुमार आपल्या उघडचा डोळ्यांनी हिंमतीचा मेरुपर्वत ढासळल्याचं बघत आहेत. ते स्वतः गोंधळलेत. ☐

एका सूटकेसमध्ये बसतील तितक्या नोटा कृष्णने भरल्या अन त्याच रात्री, त्याच क्षणी त्यानं तिथून पोबारा केला.

कृष्ण–रामस्वामीचा मुलगा. नव्हे तो एक विद्युतगोल आहे. धूमकेतू ! विक्षिप्त ! अमानवीय वृत्तीचा.

जन्मल्यापासूनच हे पोर कसं विपरीत वागू लागलं. जन्मल्याबरोबर रडलं नाही. मुकं. माकडाच्या पिलासारखं टुकूटुकू बघू लागलं. एकाक्ष. चिमटा घेतल्यावर रडलं. रडणं हे त्याच्या स्वभावातच नव्हतं. दुधासाठी पण रडलं नाही. खेळायचं–खिदळायचं. आरडाओरड, कधी आजारी पडलं नाही. नेहमी उघडं–नागडं, कपडे घातले की बोंब मारायचं. उन्हात–पावसात–थंडीत–उघडं. समोर येईल ते खायचं. गोड खायचं; पण त्याचबरोबर कुणी दिला तर (बचकभर लिंबाचा पाला खायचं. नको नको त्या खोडचा करायचं. पाहून ये म्हटलं तर आग लावून यायचं. टोंगळचाएवढं पोर पण वात्रट भारी ! लोक त्रस्त झाले; पण करणार काय ?

त्याच्या शरिराची वाढ व मनाचा विकास विलक्षण गतीनं होऊ लागला. तो पंधरा वर्षांचा असतानाच पंचवीस वर्षांचा वाटू लागला. त्याला स्वभावतःच स्त्रियांचं फार वेड ! किशोरवयातच एका वयस्क मित्राबरोबर तो एक माडी चढला !

' पोरा, नुसता अंगानं वाढलास ! ओठ पिळले तर दूध निघेल. जा, घरी जा ! मोठा झाल्यावर ये !' एक म्हणाली.

' चूप ! तुला पैशाशी मतलब...'

थोडचाच वेळात ती त्याला शिव्याशाप देऊ लागली.

' ढोर...राक्षस मेला !'

तो हसला–मनातून.

तो निरनिराळ्या स्त्रियांचे उंबरठे झिजवू लागला. त्याच्या पैशाची जादू काही दिवस चालली; पण...त्या साऱ्या त्याचा तिरस्कार करीत. सर्व रस्ते बंद झाले तेव्हा त्याचा कोंडमारा होऊ लागला. याचा परिणाम म्हणून त्याच्या हातून विलक्षण गोष्ट घडली.

रामस्वामीच्या नोकरांनी व भारतसरकारच्या सी. आय. डी. नी भारतातील सर्व प्रमुख शहरं पालथी घातली; पण कृष्णचा पत्ता लागला नाही. कृष्णने मात्र मुंबईपासून बऱ्याच अंतरावर असलेल्या ' किटी ' नामक खेड्याचा आश्रय घेतला. एकटा. सडाफटिंग. रुबाबदार व्यक्तिमत्त्व. गॉगल लावल्यामुळं डोळ्याचा दोष लपत असे. त्यानं त्या गावात पाऊल टाकलं ते सी. आय. डी. इन्स्पेक्टर म्हणून.

तिथल्या म्हाताऱ्या सरपंचाला म्हणाला, ' तुमच्या गावाजवळच्या जंगलातील खोऱ्यात किसनसिंग ठाकूर नावाच्या मध्यप्रदेशातील एका भयंकर डाकूनं आश्रय घेतलाय. मी सी. आय. डी. इन्स्पेक्टर, त्याला पकडण्यासाठी आलो आहे. माझी राहण्याची, खाण्यापिण्याची व्यवस्था कर ! पैसे मिळतील; पण ध्यानात ठेव, तोंडाला कुलूप लाव ! तुझ्या बडबडीनं माझी योजना जर फसली तर फुकट मरशील !', भोळा म्हातारा. त्याने त्याची व्यवस्था केली.

खाणं, झोपणं अन् झाल्या प्रकाराचा विचार करणं, एवढंच काम. त्याच्या नजरेसमोर ते दृश्य नेहमीच तरळते. तिची करुण नजर, तडफड, वेदना, कण्हणं...आपला बेछूटपणा अन् रक्त...

यापूर्वी त्याचा वेळ कसा भुरकन् उडून जायचा. कॉलेजच्या प्रथम वर्षाचा तो विद्यार्थी. मुलखावेगळा. विलक्षण बुद्धिसामर्थ्याचा. एखाद्यानं कथा–कादंबऱ्या जितक्या आवडीनं वाचाव्यात तितक्या आवडीनं त्यानं बी. एस्. सी. पर्यंतची सर्व पाठ्य पुस्तके व संदर्भग्रंथ वाचून काढले. त्याला कुठला विषय जमत नव्हता हे ठरविणं कठीण. ' प्राध्यापकांनी सांगितलेलं उदाहरण मुलांचं लिहून घेणं संपत नाही तोच ह्याचं उत्तर तयार ! त्याची स्मरणशक्ती पण अचाट! टेपरेकॉर्डरनं लाजावं. प्राध्यापकांनी तर त्याचा धसकाच घेतलाय ! फाडफाड बोलायचा मुलांसमोर ! इन्सल्ट !

तो सर्वच क्षेत्रांत आघाडीवर–खेळण्यात, बोलण्यात, वादविवादात. त्याचं मित्रमंडळही मोठं होतं. निर्भीड–चळवळ्या मुलांचा लीडर. मुली मात्र त्याला वचकून असत. एक मुलगी–मीना–अनपेक्षितपणे त्याच्या सान्निध्यात आली अन् नंतर मात्र ती त्याला टाळू लागली, जणू तो एक महारोगी आहे ! इथं मात्र त्याचा वेळ जाईना. जुन्या आठवणींची रवंथ करणे एवढेच त्याचे काम.

काही तरी वाचायला हवं म्हणून मुंबईची वर्तमानपत्रं लावली 'गोपाळ कृष्ण गोकुळकर' या नावानं. वर्तमानपत्रं तर केव्हाच वाचून संपायची; पुढं काय ? त्याला स्वभावतःच सायन्सची आवड. त्यानं हळूहळू जीवशास्त्र, वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्रावरची पुस्तके मागविली. वाचन सुरू झाले. खुफिया पुलिसांचं सोंग टिकविण्यासाठी तो मधून मधून जंगलात हिंडू लागला. लोक काहीही समजोत; पण त्या निमित्ताने तो जंगलातील विविध वनस्पतींचं...त्यावरील कीटकांचं निरीक्षण करू लागला.

सरपंचाला एका अंधाऱ्या रात्री अचानक जाग आली. पावसाळ्याचे दिवस. मुसळधार पाऊस पडून गेला. हवेत भयंकर गारठा. अशा वेळी या भाडेकरूच्या घरासमोरचं गुलाबाचं छोटं झाड चमकत आहे–चमचम ! यात्रेत रोषणाई करतात तसे–काही बल्ब विझतात तर त्याच वेळी काही बल्ब पेटतात. सकाळी त्याला समजलं की ते सारे काजवे होते. या भाडेकरूच्या विक्षिप्तपणाचं त्याला आश्चर्य वाटले. विक्षिप्तपणा म्हणू नये तर काय ? कारण दुसऱ्या दिवशी कृष्णाने ते सारे चमकणारे काजवे मारून टाकले. पोट फाडून पाहिलं की असं कुठलं रसायन त्यांच्या पोटात आहे की ज्यामुळं ते रात्रीच्या वेळी चमकतात. बिचारे काजवे फुकट मारले गेले !

एवढं खरं की आता त्याचा वेळ मजेत चाललाय ! एक वर्ष संपलं.

' दूध घ्या !' एक कोमल स्वर. कृष्णाच्या मनाची तार झंकारली. रोज सकाळी घोगऱ्या आवाजाचा गवळी दूध आणून द्यायचा; पण

तो आजारी असल्यामुळं येऊ शकला नाही. दूध त्याच्या मुलीनं आणलं. घोगरा आवाज ऐकण्याची सवय झालेल्या कृष्णच्या कानांना हा आवाज फार सुखावून गेला. ती गेली तरीही तो उघड्या दाराकडे एकटक बघू लागला. मुलगी सावळी पण आकर्षक. तिचे डोळे विलक्षण बोलके...पुन्हा तो धुंद बनू लागला. त्याच्यासाठी स्त्री म्हणजे लोहचुंबक. एक वर्ष झालं इथं येऊन; पण तो फारसा कुणाकडे गेला नाही, लोकांत मिसळला नाही. त्यामुळं तो स्वस्थ होता; पण आता पिसाट वारं अंगात शिरू लागलं.

दुसऱ्या दिवशीही ती आली. 'चहा घेणार का?' त्यानं विचारलं. तिनं लाजत-मुरकत, मान हलवत नकार दिला. नुकतीच वयात आलेली ती बालिका अल्लडपणे तेथून धूम पळाली.

अलीकडे तीच दूध आणीत असे. तो हटकून 'दूध घे, चहा घे' म्हणायचा. ती हसत 'नाही' म्हणायची.

एका सुप्रभाती तिनं चक्क होकार दिला. त्याला आश्चर्य वाटलं. 'बस तर. मी चहा करतो!' तो म्हणाला.

तो चहा करू लागला. ती त्याच्या हालचाली कुतूहलानं निरखू लागली. त्याचं मन पार भरकटलं; पण मागचा अनुभव त्याला जागचा हलू देईना. पाडाची चिंच हाताला लागण्याइतक्या उंचीवर असावी अन् आपण उगीचच झाडाचे शेंडे बघावे, आहे की नाही मूर्खपणा?

चहा संपला. जाताना तिनं विचारलं, 'एक विचारू का?'

'विचार...'

'उत्तर द्याल?'

'जरूर. विचार...'

'तुम्ही नेहमीच रंगीत चष्मा वापरताना दिसता...'

'होय. माणसं रंगीत दिसतात म्हणून. हेच बघ ना, तू मला खूप सुंदर दिसतेस...' तिच्या गाली गुलाब फुलले. थोड्या वेळानं त्यानं विचारलं, 'माझ्याशी लग्न करशील?' बघ. राणीसारखं राज्य करशील! आज राती ये. मग आपण खूप खूप बोलू!'

अज्ञात सुखाची ओढ लागलेली ती बालिका पऱ्यांचे पंख लावून काही विचार न करता आली; पण...प्रसंग जुनाच. एक पात्र बदललेलं पण दृश्य तसेच.

तिला असीम वेदनांच्या खाईत ढकलून पुन्हा तो पळाला...रस्ता सापडेल तसा.

'स्त्रियांच्या जिवाशी-इज्जतीशी खेळणारा हा नरपशू कोण?' वर्तमानपत्रातील ठळक अक्षरातील बातमी.

बातमी वाचली मात्र, रामस्वामीला आश्चर्याचा धक्काच बसला! त्यातील व्यक्तीचं वर्णन वाचल्यावर त्यांची खात्री पटली की हा नरपशू म्हणजे कृष्णच!

'कृष्ण! कृष्ण!!' रात्रंदिवस त्याचाच विचार करून डोकं पिकलं. पागल व्हायची वेळ आली. काय करावं?

...अखेर त्यांनी निर्णय घेतला. गोंधळलेल्या चेहऱ्यावर आता कठोरपणाच्या छटा दिसू लागल्या. कृष्णचा शोध घेण्यास ते स्वतः घराबाहेर पडले. ¤

रामस्वामी महान संशोधक. भारतरत्न. भारतसरकारनं त्यांच्या कुटुंबाला पोसण्याची जबाबदारी स्वीकारली. त्यांच्या संरक्षणाची तयारी दाखवली. रामस्वामी म्हणाले, 'संरक्षण? कुणाचे? या रामस्वामीचे! कुणापासून? मृत्यूपासून की शत्रुराष्ट्रापासून? मृत्यू-अटळ. तेव्हा संरक्षण काय देणार तुम्ही? अन् या भूतलावर असं कुठलंही राष्ट्र अस्तित्वात नाही की जे माझ्याकडून माझ्या संशोधनाचं सीक्रेट काढून घेईल! संरक्षण म्हणजे पोलिसांचा ताफा...नसतं लचांड...नसता शो. उलट माझं जीवन धोक्यात येईल. मला संरक्षण नको! नाव नको. हारतुरे नको...'

रामस्वामीच्या अशा वृत्तीमुळे त्यांना प्रत्यक्षात फारच कमी लोक ओळखतात. त्यांनाही माहीत नाही की भारतसरकारनं त्यांना 'भारतरत्न!' ही उपाधी का दिली? उलट व्हिक्टोरियारोडवरील त्यांचा दवाखाना 'फडतुस दवाखाना' म्हणून लोक ओळखतात. लहरी डॉक्टर असा नावलौकिक. महिना महिना दवाखाना बंद असायचा. जेव्हा कधी दवाखाना उघडा असायचा, तेव्हा पेशंटची रांग लागायची! औषध फुकट! रोग्यांशी फार चांगलं वागायचे; पण लहर आली की ते साऱ्यांना हाकलून द्यायचे. म्हणून लोक त्यांना 'डॉ. चक्रम' म्हणायचे.

रामस्वामी. कृष्णाचे पिता?? निर्माता? कृष्णजन्म-रहस्य रामस्वामींना माहीत होतं. कृष्णच्या वागण्याचा त्यांनी 'अर्थ' शोधला होता.

कृष्णबद्दलचा निर्णय त्यांनी घेतला. त्याची अंमलबजावणी पण काटेकोरपणे सुरू केली. ¤

'ढोर मेला! तो काय माणूस आहे!' बाई संतापून बोलली. रामस्वामी शांतपणे ऐकत होते. 'मी ही अशी अंगानं...म्हशीसारखी ...चाळिसी गाठलेली धंदेवाईक म्हणून ठीक. नवाडी असती तर दवाखान्यात न्यावं लागलं असतं...'

'म्हणून तर तुझी निवड केली...' रामस्वामी स्मित करीत म्हणाले.

'हो. उपकार झालेत. नमस्कार कोपरापासून! दुष्मनावर असा प्रसंग येऊ नये!'

'बाई, एका रात्रीचे पन्नास रुपये दिलेत!'

'एक रात्र? अहो, ती हजार रात्रींबरोबर होती. त्याचं एकटयाचं येणं म्हणजे दहा माणसं अंगावर घेणं! नुसता भूत आहे तो! चार वेळा चिपकला...एका वेळी पाऊण तास तर घेतोच...'

'पैसे हवेत का आणखी?'

'पाहिजेतच. दान करीत नाही तुम्ही!' बाईचा संताप काही कमी होईना. रामस्वामींनी दोनशे रुपये तिच्या हातावर ठेवले. कोऱ्याकरकरीत नोटा बघून बाई शांत झाली.

'हं, सांगा आता सविस्तर!' रामस्वामींनी स्मित करीत म्हटले. बाईंनी सारं


**मोफत! मोफत! मोफत!**

# पांढरे डाग

आमचे औषधाचा प्रभाव केवळ तीन दिवसातच पांढरे डागावर दिसू लागून त्याचा रंग बदलू लागतो. आमचे औषध अतिप्रभावी असून त्याचा एकवेळ अवश्य अनुभव घ्या. प्रचाराकरता, एक औषधाची कुपी ट्रायलकरता मोफत दिली जाते. रोगाचे सविस्तर वर्णनासहित संपर्क साधून त्वरित औषध मागवा.

**जवाहर चिकित्सा केन्द्र १०५**
**पोष्ट : कतरीसराय (गया)**

पुन्हा सांगितलं.

'मी सकाळचे चारपासून वाट बघतोय.'

'पठ्ठा सोडायलाच तयार होईना!'

'मी दिलेली रबरी पिशवी...'

'आणलीय्. लावायलाच तयार होईना.' पर्स उघडून तिनं एक तोंड बांधलेली रबरी पिशवी दिली.

'बरं. या पुन्हा. आज रात्री!'

बाई दचकलीच. 'पुन्हा...बापरे... डॉक्टर नमस्कार!...' ती बाई झपाट्यानं तिथून निघून गेली.

समोरून 'फडतूस' वाटणाऱ्या दवाखान्याच्या आतल्या एका खोलीत डॉक्टरची प्रयोगशाळा होती. ही लॅबोरेटरी सर्वसामान्य परीक्षणासाठी.

पिशवीतील द्रव त्यांनी परीक्षणासाठी एका प्लॅस्टिकच्याच कटोरीत घेतला. मायक्रोस्कोपखाली ठेवला आणि...रामस्वामी हवेतच उडाले!

कृष्ण असामान्य तर खराच. त्याचं वीर्य? कसं...सांगायला कठीण...रामस्वामीच्या डोक्यात एकच विचार 'कृष्ण म्हणजे विषवृक्ष. फळे येण्यापूर्वीच तो तोडला पाहिजे!' ◘

'बेटी सीताऽ!' झोपण्याच्या तयारीला लागलेल्या आपल्या मुलीस रामस्वामींनी हाक मारली.

'काय पप्पा?'

'माझी प्रयोगशाळा बघायची म्हणतेस ना?' तिने मानेने हो म्हटले.

'भाग्यवान आहेस मुली. माझी प्रयोगशाळा बघण्याचा मान फक्त दोनच व्यक्तींना मिळाला असे म्हणावे लागेल!'

'फक्त दोन? कोण कोण आहेत ते?'

'एक तू आणि भारताचे माजी दिवंगत पंतप्रधान! ते या प्रयोगशाळेचे जन्मदाते म्हणून त्यांना संधी मिळाली. मी या शाळेचा एकमेव विश्वस्त. भारतीय जनतेची ती अनामत. तू माझी विश्वासपात्र अन् प्राणप्रिय मुलगी म्हणून तुला ही संधी...'

'पप्पाऽऽऽ!' म्हणत तिनं त्यांच्याकडे धाव घेतली. त्यांनी तिला पोटाशी धरले. डोक्यावरून हात फिरवू लागले. मनात खळबळ. हृदय भरून आले. डोळ्यांतील अश्रू डाव्या हातानं निपटून काढले. 'दुर्दैवी पोर...' ते मनात म्हणाले.

'चल बेटी, निघू या!'

'आता? इतक्या रात्री?'

'होय!'

'अं... मला झोप...'

'झोप? माझ्या मुलीस हे शोभत नाही... चल...'

रात्रीचा तिसरा प्रहर. रामस्वामींची कार मुंबईपासून खूप दूर आलीय्!

एकाएकी कार रुकली.

'काय झालं पप्पा?'

'बेटी, मला वाटतं आपण जाऊ नये!'

'का?'

'एक तर ती जागा खूप दूर आहे. आणखी दहा तास तरी लागतील... खरं म्हणजे मला काही तरी बोलायचंय् तुझ्याशी. तिथं जाऊन सांगण्यापेक्षा इथंच सांगितलेलं बरं!'

'काय सांगणार आहात?'

'चल. कारबाहेर पडू या!'

विस्तीर्ण माळरान! घोंघावणारा वारा. पश्चिमेकडे कललेला चंद्र. शांत वातावरण.

एका काळ्या खडकावर दोघं बसली. बाप–बेटी. सत्तर वर्षांचे रामस्वामी, सोळा वर्षांची सीता! रामस्वामी शांत वाटत होते; पण मनात उलथापालथ चालू होती. बापाचा विक्षिप्तपणा सीतेला आवडला नव्हता.

'प्रयोगशाळा पुन्हा केव्हा तरी!'

'आपली इच्छा!' रुक्ष आवाज. काही वेळ शांतता.

'बेटीऽ?'

'कायऽ!'

'ऽ... ...'

'बोला. गप का?'

'मला जे काही सांगायचंय् ते कसं सांगू हे मला समजत नाही!' रामस्वामी अडखळत म्हणाले. मनात विचारांची गर्दी. कसं व्यक्त करावं ते सुचेना. जे काही ते सांगणार होते ते काही चांगलं नव्हतं. अव्यवहार्य अन् अनीतिकारक.

'मी... मी कृष्णबद्दल बोलतोय...'

'पप्पा त्याच्याबद्दल एक अक्षर बोलू नका! त्या मेल्याचं नाव नको ऐकायला. पायाची आग मस्तकाला जात्येय्!'

'मला का ते समजत नाही. म्हणूनच त्याची व्यवस्था अन्यत्र केलीय्! पोरी, मी खरा दुर्दैवी. लावला गुलाब, निघाला निवडुंग. मलाच हे झाड...'

'मरू द्या त्याला!'

'मला तेच म्हणायचंय्!'

संतापाची जागा आश्चर्यानं घेतली

'म्हणजे? मला खून करायला सांगणार आहात की काय?'

'छे, छे:!'

'मग?'

क्षणैक शांतता.

'माझे महत्त्वपूर्ण प्रयोग मी घरच्याच माणसावर केलेत. कारण दुसऱ्याच्या शरिरावर प्रयोग करण्याचा मला मुळीच अधिकार नाही. शिवाय हवी तशी गुप्तता दुसरे लोक बाळगू शकत नाहीत. माझ्या एका प्रयोगात तुझ्या आईनं मला साथ दिली. माझ्या स्वत:वर हा प्रयोग करता येणार नाही म्हणून... एका शास्त्रज्ञाची कथा ऐक. एका रोगावर लस शोधून काढायची होती. प्रयोग स्वत:वर केला अन् मेला. शास्त्रज्ञ ध्येयवेडे असतात. त्यांना प्राणाची पर्वा नसते... कुटुंबाची पर्वा नसते... माझा थोडाबहुत अधिकार तुझ्यावर पोहचतो म्हणून...'

दोघंही स्तब्ध. भयानक शांतता.

पुन्हा रामस्वामी बोलायला लागले,... 'ही माझ्या अपयशाची नांदी. मी काय केलं हे फक्त भारतसरकार जाणून आहे. अन्यथा जगातल्या साऱ्या लोकांनी मला अक्षरश: डोक्यावर घेतलं असतं. पण...' शब्दांची जुळवाजुळव–असंबद्ध बडबड ठरू नये म्हणून.

'कृष्ण अद्याप लहान आहे. असामान्य पुरुष होणार. चांगल्या अन् वाईट या दोन्ही गुणांचा त्याच्या ठायी अतिरेक आहे. संजीवन आणि विनाश अशी 'अणुशक्तीची' दोन टोकं. तसं ह्याचं. त्याचं विलक्षण बुद्धिसामर्थ्य बघून माझी अक्कल चक्रावली आहे. त्याची शक्तीही अचाट आहे. आहार-निद्रा-आणि मैथुन या बाबतीत पण तो महाभयंकर आहे!'

'निसर्गाचं बाळ ते. त्याच्यावर मी चांगले संस्कार करण्याचा प्रयत्न केला. म्हणून तो पाळीव सिंहासारखा झालाय्-एवढंच. आतापर्यंत त्यानं दोन अक्षम्य गुन्हे केलेत. तसा अनेक स्त्रियांना त्यानं उपद्रव दिला असेल; पण माझ्या माहितीतील दोन. तो चांगल्या मार्गाकडे वळणं कठीण. कारण माणसं वाईट गोष्टीकडे चटकन् वळतात. गुन्ह्यांची संख्या

वाढेल. पोलिस मागे लागणार. म्हणजे त्याला शेवटी अपराध्याचं जीवन जगावं लागेल. असं जर झालं तर माणसामधून तो दूर फेकला जाईल. प्रतिहिंसेची भावना जागृत होईल. तो सैतान बनेल. कित्येक स्त्रियांचं जीवन अन् अब्रू धोक्यात येईल. मुली, हा एक नवा भस्मासूरच जन्माला आलाय्. सापाचं पिल्लू लहान आहे तेव्हाच ठेचावं...

'पप्पा, कृपा करून भाषण संपवा. मला तुम्ही काय करायला लावणार आहात ते सांगा !' सीता चिडून म्हणाली. रामस्वामीचं बोलणं समजण्याची तिची मनस्थिती नव्हती.

'म्हटलं तर काहीच नाही, म्हटलं तर दिव्य !'

'नक्की काय ते सांगा. मला काही समजेनासं झालंय् !'

'एक मुली...' शब्द घशात अडकू लागले घुटमळले. शेवटी एका वाक्यात सांगितलं,' 'तुला त्याच्याबरोबर काही दिवस एकांतात राहिलं पाहिजे !'

'काऽय ?' ती किंचाळली. एका मृदु कलिकेवर ॲटमबॉम्ब ! 'पप्पा, पप्पा, काय बोलताहात तुम्ही ? बोलवलं कसं तुम्हाला ? नशापाणी तर केलं नाही ?' उध्वस्त... रडका स्वर.

'मुली, शांत हो. तुला हे दिव्य केलंच पाहिजे !'

'तुम्ही माझे वडील आहात की...' चीड. संताप.

'मानवजातीच्या कल्याणासाठी तुला हे करावंच लागणार आहे! मी संशोधनाचा यज्ञ सुरू केलाय्. या यज्ञात पहिली आहुती पडली ती तुझ्या आईची! मी माझ्या आयुष्याची होळी तर केली आहेच. तुमच्या आहुत्या देताना मला का आनंद होतोय् ? पण... माझा नाइलाज आहे. अगणित स्त्रियांची अब्रू वाचवायची, असेल तर...तुला तुझ्या अब्रूची आहुती द्यावी लागेल !'

'उद्या तुम्हीच माझ्याशी...संशोधन म्हणून !'

'सीताऽ मुलीऽ !' वाक्बाण त्यांच्या जिव्हारी बसला.

'अग...मी. मी माणूस आहे !'

'मग मी काय तुम्हाला जनावर वाटले ? भावाशी शीः !' तुम्ही माझे वडील आहात, नाही तर थुंकले असते तोंडावर !...'

रामस्वामींना काय बोलावे ते सुचेना.

'तुम्ही त्याला सरकारच्या ताब्यात द्या. जेलमध्ये डांबा !'

'काही फायदा नाही. जेलमध्ये डांबायला गुन्हा शाबीत व्हावा लागतो. इज्जतदार माणसं सहसा कोर्टकचेऱ्यांच्या भानगडीत पडत नाहीत. म्हणजे याला कुरण मोकळं चरायला...समजा, तो गेला जेलमध्ये. केव्हा न् केव्हा सुटणार अन् मग तो खुनशीपणानं वागणार. त्याचा कामाग्नी इतका भयंकर आहे की हजारो स्त्रियांचं जीवन बर्बाद होईल...अन् या साऱ्या प्रकरणातून त्याचं वीर्य फळाला आलं तर...छेः छेः कल्पना करवत नाही. मी सारं नंतर सांगेन; पण आत्ता...नको.'

'हे घाण काम...'

'घाण नव्हे, हे एक दिव्य !...'

'पण मलाच का ओढता ? पैशाची गंगा वाहू द्या. वाटेल तितक्या स्त्रिया सापडतील! ......'

'हे मला का समजत नाही...त्याच्याशी रत होणाऱ्या स्त्रीवर मी एक प्रयोग करणार आहे. त्या स्त्रीच्या शरिरात इंजेक्शनद्वारे एक रसायन सोडलं जाईल...प्रत्येक सात दिवसांनी. यामुळं स्त्रीशरिरात अद्‌भुत शक्ती निर्माण होईल. त्याला विशेष सुख प्राप्त होईल म्हणून तो जास्तीत जास्त लंपट बनेल अन् त्याचा शक्तिक्षय होईल. या साऱ्या गोष्टीचा स्त्रीशरिरावर काहीच परिणाम होणार नाही. एक मुली, मी हा प्रयोग परस्त्रीवर का करू शकत नाही, याचं कारण. माझा प्रयोग गुप्त राहणार नाही. केव्हा न केव्हा ती स्त्री बडबडणार. याचा परिणाम? हे सिक्रेट विदेशातील संशोधकांना समजेल. ते सरकारच्या धाकाला अथवा प्रलोभनांना बळी पडतील अथवा स्वतःच्या स्वार्थासाठी ते रसायन बाजारात आणतील...व्यभिचार वाढणार. वेश्याव्यवसाय फोफावणार अन् ...सामान्य पुरुषांचं आयुष्य घटणार .. ...कृष्णचा आपणास खून करता येणार नाही. प्रयोगातल्या स्त्रीच्या जिवाला अपाय करता येणार नाही. अन्यथा आपणासच जेलमध्ये जावे लागेल...काय करावं हे मलाच सुचत नाही !'

'वेश्या देखील काही संबंध पवित्र मानतात...'

'जनकल्याणासाठी जहर खावं लागतं !'

'भारतीय स्त्रियांची परंपरा जहर खाणारांची आहे, शील भ्रष्टवून जगणाऱ्यांची नव्हे !'

'निव्वळ भावनांच्या आहारी जाऊन चालत नाही. भूतकाळात काही स्त्रियांनी खाल्लं असेल जहर. गेल्या असतील सती. म्हणून काय साऱ्याच स्त्रियांनी तसं वागावं ? असं म्हणणं शुद्ध वेडेपणा आहे...बेटी, रागावू नकोस, तू जहर खाल्लंस का ? नाही ...म्हणजे...'

'पप्पाऽऽ!' सारा ताठपणा संपला. पायांखालची जमीन दुभंगली. उंच उंच उडणाऱ्या पतंगाची दोरी तुटली !

'या जगात पवित्र–अपवित्र–पाप–पुण्य काही नाही. आपण मानतो, एवढंच...तसं मानत असलीस तर...बुंदसे गयी तो हौदसे नहीं आती...तुझं शरीर त्यानं भ्रष्टविलं




VP-735

आहे ना? एकदा काय अन् अनेकदा काय...'

'पप्पा ऽऽ बोलवतं कसं तुम्हाला? खरंच मला त्या वेळी जहर खायचं का सुचलं नाही?'

आणि सीता मुसमुसून रडू लागली.

आकाशात तांबडं फुटलं.

'चल बेटी, चल परत. उगीचच रडण्याचा काही उपयोग नाही. वेडेपणा करू नकोस. जे व्हायचं ते झालं. जहर खाल्ल्यानं काय होणार? उलट आज तू हजारो स्त्रियांची इज्जत वाचवू शकतेस...कृष्णाचं मरण 'विषात' नसून 'विषयात' आहे...ठीक आहे. चल. शोधीन दुसरा पर्याय. चल...' ¤

रामस्वामीचा महान प्रयोग सुरू झाला. कृष्ण–नुकताच तरुणवयात येणारा. कमी समज असलेला. 'स्त्री'–त्याचा 'वीक' पॉइंट. खाणंपिणं, मजा करणं. मनाचा वारू बेभानपणे धावू लागला. विचार करायला त्याला वेळच कुठंय्!

बिचारी सीता! रामस्वामीच्या प्रभावाखाली आली. यंत्रासारखं वागायची–हसणं, बोलणं, खेळणं उत्स्फूर्त नसे. तिचं स्वतःचं अस्तित्व जणू संपलं होतं. मन मेलं होतं.

एवढं खरं, की तिच्या शरिरात जाणाऱ्या रसायनामुळं तिला थकवा कधी आला नाही. प्रत्येक सात दिवसांनी रामस्वामी तिला कसलं तरी इंजेक्शन देत.

कृष्णचा शक्तिक्षय सुरू झाला. हातपाय ठणकू लागले. थकवा येऊ लागला. रामस्वामीच्या हे लक्षात आल्यावर त्याला मद्यात एक औषध मिसळवून देऊ लागले. परिणामी त्याची कामेच्छा प्रदीप्त होत असे.

क्षयाची लक्षणं दिसू लागली. डॉक्टरची ट्रिटमेंट सुरू झाली; पण काही फायदा झाला नाही.

एक वर्षात कृष्ण संपला. धूमकेतू संपला! शोकसभा झाली. भारतसरकारच्या विविध मंत्र्यांनी, प्रतिष्ठित–प्रसिद्ध व्यक्तींनी शोक प्रगट केला. 'रामस्वामींच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत' असे सारे म्हणाले. रामस्वामी मात्र या साऱ्या प्रकाराकडे अगदी तटस्थपणे बघत होते अगदी शांत जणू कृष्ण त्यांचा कुणीच नव्हता!

कृष्ण सीतेच्या जीवनात वादळ बनूनच आला. स्वतः संपला अन् तिलाही संपविलं.

रामस्वामी मुलीच्या उपकाराच्या ओझ्याखाली पार दबले होते. सीतेची उंची वाढली–हृदयाची विशालता वाढली, आपण एक खुरटे झाड आहोत असं त्यांना वाटू लागलं. त्यांना अपराध्यासारखं वाटू लागलं. सीतेच्या समोर जाण्याची लाज वाटू लागली. एका घरात असूनही कुणी कुणाला बोललं नाही. रामस्वामीचं मन शांत झालं तरी सीतेचं मन अद्यापीही विचारांच्या वावटळीत भरकटत होतं. 'कृष्ण–भाऊ? छे, वैरी! कसला बदला घेतलाय् माझ्यावर मेल्यानं...बाप... शास्त्रज्ञ–हा देखील वैरीच! कसला प्रयोग केलाय् माझ्यावर...मागंच जहर खाल्लं असतं तर...तर मी सुटले असते या नरकातून!' कृष्णच्या मृत्यूनंतर तिला हे विचार असह्य झाले. तो होता तेव्हा एवढे विचार येत नव्हते.

कृष्णच्या मृत्यूनंतरचा चौथा दिवस. वेळ रात्री दहा–साडेदहा. 'सीता ऽ बेटी!' थिजलेल्या नजरेनं कृष्णच्या तस्विरीकडे बघणाऱ्या सीतेला रामस्वामींनी हाक मारली. तिनं त्यांच्याकडेही त्याच नजरेनं पाहिलं.

'वाईट वाटतं?'

ती नुसती बघत राहिली.

'तुला वाईट वाटतं—कारण त्याच्याशी संबंध ठेवल्यामुळं. तो मेल्याचं दुःख नव्हे. माझं कसं? मी लावलेलं रोपटं मलाच खुडावं लागलं याचं मला दुःख वाटतं; पण याच वेळी आनंद देखील होतो. कारण मानवजातीवरलं संकट टळलं. माझ्या या महान यशाचं श्रेय तुलाच आहे!'

'मला? हं! साऱ्या मानवजातीनं माझ्या तोंडावर थुंकलं पाहिजे!'

'मुली, मनाला लावून घेऊ नकोस! तुझ्यासारखी सती तूच! मनाचं पावित्र्य बघायचं असतं, शरिराचं नव्हे!'

'मला असं का वागायला लावलं तुम्ही?' दुःखी आवाज.

'सांगतो!' म्हणत ते तिच्याजवळच्या खुर्चीवर येऊन बसले. तिच्या तोंडाचा भपकारा..., 'सीता ऽऽ तू ऽ मद्य घेतलंस?' संशय येऊन त्यांनी विचारलं.

'हं...घेतलं–थोडंसं. आजच. शेवटचं...!' अडखळत बोलणं.

'म्हणजे?' त्यांनी जरा चमत्कारिक नजरेनं पाहिलं.

'काही नाही पप्पा. तुम्ही बोलत राहा मी ऐकते!'

'ठीक. ऐक......'

रामस्वामींच्या मनश्चक्षूंसमोर त्यांच्या जीवनाच्या डायरीची पाने फडफडू लागली. पान नंबर पन्नास. स्थळ दिल्ली. पंतप्रधानांचं निवासस्थान. वेळ–रात्रीचे दहा.

रामस्वामींनी स्वतःच्या संशोधनासंबंधी कल्पना दिली. पंतप्रधानांनी मोठ्या आश्चर्याने विचारलं, 'इज इट पॉसिबल?'

'व्हॉट इज नॉट पॉसिबल इन धिस वर्ल्ड? एव्हरीथिंग इज पॉसिबल!'

'आईबापाविना मूल? विधाउट फादर अँड मदर?'

'लेट मी करेक्ट युवर स्टेटमेंट! विधाउट फादर. निदान माझ्या संशोधनावरून सांगतो मी. माझी ज्ञान–कक्षा सीमित आहे. मी पुरुष बीज नक्कीच तयार करू शकेन!'

मी महत्प्रयासानं मांजराचं पुंबीज तयार केलं अन् आश्चर्य वाटेल की मांजरीवर केलेल्या प्रयोगातून तिला झालेलं पिल्लू दोन महिने जगलं!'

'वंडरफुल! खरं नाही वाटत!'

'खरं वाटत नाही ना? माझी परीक्षा घे!'

'ती कशी काय?'

'मला मदत कर. मी म्हणतो तशी एक प्रयोगशाळा बांधून दे. तिथेच मी प्रयोग करून शुक्र–कीट निर्माण करीन अन् त्याच्या साह्यान एका स्त्रीवर मी प्रयोग करीन. मला खात्री आहे की तिला मूल होईल!'

'तुला काय करायचं ते कर. मला मात्र गुंतवू नकोस!'

'मित्रा, तू या देशाचा पंतप्रधान आहेस. काही तरी तुझी मला मदत होईल म्हणूनच मी तुझ्याकडे आलो. मला कोटयवधी रुपये खर्चणं कसं शक्य आहे? होती एक लाखाची प्रॉपर्टी, यू नो वेल–या चक्रमपणापायी सारी फुंकलीय मी!'

'विचार करतो...!'

'आश्वासन द्यायला मी काही मतदार नाही. पाहतो–करतो... नक्की सांग. आत्ताच सांग!'

'उगीच लहान मुलासारखा हट्ट करू नकोस! कोटयवधी रुपये केवळ एखाद्या प्रयोगशाळेत गुंतवायचे–मनाला नाही पटत.

प्रयोग फसला तर सगळा पैसा असाच जाणार! शिवाय पैसा जनतेचा आहे...'

'स्पष्टपणे नाही म्हण!' रामस्वामी चिडले.

'रामस्वामी, तुझा गैरसमज होतोय! मला मंत्र्यांना तरी विश्वासात घेतलं पाहिजे!'

'सॉरी! हे मंत्रीसंत्री सोडून दे. तुला वाटली तर मदत कर; पण माझं 'सिक्रेट' फक्त आपणा दोघातच राहावं......चलतो मी...!'

अखेर भारतसरकारनं सह्याद्रीच्या एका घनदाट खोऱ्यात एक छोटीशी प्रयोगशाळा रामस्वामींना हवी तशी बांधून दिली. या प्रयोगशाळेत रामस्वामींनी स्वतःला अक्षरशः एक वर्षभर कोंडून घेतले. जेव्हा त्यांना हवा तसा द्रव पदार्थ तयार झाला—त्यातील शुक्र-कीट वळवळायला लागले तेव्हा रामस्वामी आनंदाने अक्षरशः नाचायला लागले!

आनंदाचा भर ओसरताच त्यांनी मुंबई गाठली. एक वर्षानं पती घरी आला हे बघून त्यांच्या पत्नीच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले.

रात्री एकांतसमयी रामस्वामी आपल्या पत्नीला म्हणाले, 'कल्याणी, आतापर्यंत तू निदान डझन मुलांची आई व्हावयास हवी होतीस; पण... तू मला मूल दिलं नाहीस!'

'आता हे का आपल्या हाती असतं? मला वाटतं माझा जन्म फुकट जाणार! वांझोटी आहे मी!'

'कल्याणी, अभद्र बोलू नये... हे बघ. प्राचीन काळी ऋषी तप करून मुलं प्राप्त करून घेत. वाचलंस ना हे?'

'हं...'

'मग मी देखील एक शक्तिशाली ऋषी आहे. मी देखील असंच मूल पैदा करू शकतो!'

'का माझी थट्टा करता?' एक दीर्घ निश्वास टाकून ती म्हणाली.

'अग, थट्टा नव्हे सत्य! तू फक्त होकार द्यायचा की मी लागलोच प्रयोगाच्या तयारीला!'

'मला काय करावे लागेल?' उत्सुकता.

'प्रजननक्रियेत पत्नी काय करते?'

'इश्श! वयाचा विचार करून बोलावं माणसानं!'

'अग, थट्टा नव्हे ही! मी शोधलेलं द्रव गर्भाशयात सोडलं जाईल!'

'कसं...?'

'आहे की नाही मॅड...'

'बरं, सांगा...'

'अर्थात चार डॉक्टरांच्या समोर हे करावं लागणार...'

'क... क... काय?'

यावर बराच वाद झाला. शेवटी पत्नी म्हणाली, 'माझी अब्रू पणाला लावून जर तुम्हाला यश मिळणार असेल तर ठीक आहे. नाही तरी बायांना प्रसूतिसमयी डॉक्टर-समोर नागवं व्हावंच लागतं!'

'शाबास कल्याणी, माझी बायको नक्कीच शोभतेस! या प्रयोगातून मला यश मिळेल अन् तुला मूल मिळेल. मग ठरलं तर...'

प्रयोगाचा दिवस. एक अलिशान बंगला. उपस्थितांमध्ये— स्वतः पंतप्रधान, संरक्षण-मंत्री, चार डॉक्टर्स, दोन जीवशास्त्रज्ञ. बाकी कुणी नाही.

साऱ्या उपस्थितांसमोर रामस्वामींनी एक चकाकणारी, तोंड बंद नसलेली— बॉटल ठेवली. नुकतीच रामस्वामींनी त्यांच्या प्रयोग-शाळेतून आणली होती. रामस्वामी जीव-शास्त्रज्ञांना म्हणाले, 'या द्रवाचं परीक्षण करा!' त्या बॉटलमधील थोडासा द्रव एका प्लेटमध्ये देण्यात आला. चार डॉक्टर व दोन शास्त्रज्ञ यांनी त्या द्रवाचं परीक्षण केलं. अत्यंत लिबलिबित— काहीसा घट्ट— निळसर असा द्रव परीक्षण करताना ते सारे ताडकन् उडाले. घामाघूम होऊन प्रयोगशाळेतून बाहेर आले. 'डॉक्टर, आपलं काय मत झालं?'

डॉक्टर शर्मा आपल्या टक्कलावरचा घाम पुशीत म्हणाले, 'वंडरफुल रामस्वामी... काय आहे हे?... कसं शोधलं?'

'शर्माजी, नो क्वेश्चन प्लीज! मला हे सांगा, ते कुठल्या प्राण्याचं वीर्य आहे काय?'

'छेः छे.! पृथ्वीतलावरील कुठल्याही प्राण्याचं वीर्य नाही! सर्वांनी आश्चर्यानं तोंडात बोट घातलं. साऱ्यांनी तसं लिहून स्वतःच्या सह्या केल्या. प्रतिज्ञापत्रावर सह्या केल्या.

'मी जे काही पाहिलं आहे, पाहणार आहे, याची वाच्यता कुठेच कधीही करणार नाही! अन्यथा देशद्रोही—मानवद्रोही म्हणून मी दोषी ठरेन! यामुळे मिळणाऱ्या शिक्षेस पात्र ठरेन!' अशा प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर सर्वांच्या सह्या घेतल्या.

दोन डॉक्टर व रामस्वामी यांनी स्वतःला एका खोलीत बंद करून घेतलं. तिथं तो द्रव-पदार्थ रामस्वामींच्या पत्नीच्या गर्भाशयात सोडला.

कल्याणीला त्या क्षणापासून वरील सहा तज्ज्ञ व्यक्तींच्या निगरानीखाली ठेवले. काही दिवसांतच बीज रुजल्याची चिन्हे स्पष्टपणे दिसू लागली. कल्याणी आपल्याच आनंदात होती. 'मी आई होणार!'

रामस्वामींना अपेक्षित असलेल्या वेळीच कृष्णचा जन्म झाला. मुलाला घेऊन कल्याणी एक वर्षभर तज्ज्ञ व्यक्तींच्या देखरेखीखाली राहिली. नंतर कृष्णला त्यांच्याजवळ ठेवून ती घरी परतली. घरी परतल्यावर पुनः एक वर्षात तिला दिवस गेले. सीता जन्मली, आई गेली!

सीता वाढली. रामस्वामींच्या सान्निध्यात तर कृष्ण वाढला. तज्ज्ञांच्या देखरेखीखाली. तज्ज्ञांचे सारे लक्ष झपाट्याने वाढणाऱ्या कृष्णच्या शरीराकडे. मन संस्कारित झालेच नाही. मायेचा हात पाठीवरून फिरलाच नाही. कौटुंबिक वातावरण नाही. वातावरण कसं निर्जीव. यंत्रवत. ठराविक वेळेला त्याला शाळेत टाकले. त्याच्या बुद्धिसामर्थ्याचं कौतुक करीत तज्ज्ञ नोट करू लागले.

तो चौदा वर्षांचा झाला. रामस्वामी त्याला आपल्या घरी घेऊन आले.

रामस्वामी सांगण्यात एवढे मग्न झाले की त्यांचं सीतेच्या चेहऱ्यात होणाऱ्या बदला-

बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये

कडे मुळीच लक्ष नव्हते. डोळे तारवटले होते. हातपाय कसे थंड पडू लागले. शुद्धीवर होती ती.

'बाळ, खरं वाटत नाही ना ?'

'नाही कसं म्हणू ? आपल्या प्रयोगातील एक जिवंत पात्र मी आहे ना ?'

ते उठून येरझारा घालू लागले, 'मी निर्माण केलेलं मूल मलाच मारावं लागलं... त्याच्या वीर्याचं मी परीक्षण केलं अन् हादरलो... ते अमानवीय होतं. मी शोधलेल्या रसायनासारखं शुक्र–कीट तसंच. त्यापासून, अनेक अमानवीय कृष्ण निर्माण झाले असते. स्त्री जन्मली असती. या अमानवीय स्त्री-पुरुषांच्या मीलनातून कदाचित राक्षस जन्मले असते. सारी मानवजात संकटात पडली असती.' ते एका जागी थांबून बोलले, 'बेटी, आईबापाशिवाय 'माणूस' निर्माण करण्याचा वेडेपणा कुणीच करू नये. कारण ते अशक्य ! एखादा जीव जन्मलाच तर त्याचा पृथ्वीतलावरील कुठल्याच प्राण्याशी संबंध असणार नाही. असं जर झालं तर साऱ्या प्राण्यांवरच संकट. ...उगीच मनाला लावून घेऊ नकोस मुली, तू अग्नीसमान पवित्र आहेस !'

'शरिराचं पावित्र्य मानणाऱ्या या समाजात मला कोण पवित्र मानणार ? बहिणीला भावाशी... शीः तुम्ही शास्त्रज्ञ. मी सामान्य. तुमचे प्रयोग माझ्या शरिरावर झाले. मन तर नाही बदललं. मनानं ढासळलेल्या मुलीनं काय करावं ? कुणाला फसवावं ? तुमचा प्रयोग संपला. उपकरणाचं आता काय काम ?'

तिचा आवाज फार दुरून आल्यासारखा वाटला. जीभ उचलेना जणू. रामस्वामीनं, चमकून तिच्याकडे पाहिलं मात्र, हादरलेच !

'एऽऽ काय बोलतेस तू ?' ते झटपट तिच्या जवळ गेले. हातात हात घेतले. 'दारू माणसाचं शरीर थंड करते काय ?' मनाला प्रश्न.

'संपलं सारं... तुमचं सारं काम 'सीक्रेट' राहील आता !' सीतेचं थंड होणारं शरीर...

निसर्गाच्या चक्राला थोपवू पहाणारे सामर्थ्यशाली शास्त्रज्ञ रामस्वामी... जागच्या जागी खिळले !

वादळात उन्मळून पडणाऱ्या वृक्षासारखे रामस्वामी जागच्या जागी कोसळले. 'सीताऽऽ बेटी... !' अनावर हुंदका ! ☐ ☐

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### दि. २९।११।७५ ते ५।१२।७५

### काँग्रेस पक्षात अंतर्गत असंतोषाचा उद्रेक संभवतो

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची सिक्कीम-भेट ही जरी एका राज्याला भेट असली तरी सिक्कीमचे भौगोलिक स्थान लक्षात घेता या भेटीचे परिणाम व त्याचे सादपडसाद जागतिक राजकारणात उठण्याची दाट शक्यता आहे चीन, अमेरिका व पाकिस्तान यांना भारताचे सामर्थ्य जाणवणार असून जागतिक रंगमंचावर त्याचा प्रत्ययही दिसू लागणार आहे. बांगला देशात कमी-जास्त प्रमाणात उद्रेक सुरू राहणार असून तेथील जनता भारताकडे आकृष्ट होण्याची शक्यता आहे. काँग्रेसपक्ष हा सत्तारूढ पक्ष आहे. वरवर जरी त्यात एकोपा दिसत असला तरी अंतर्गत असंतोष खदखदत आहे. त्याचा उद्रेक/उघड अगर गुप्तपणे या आठवड्यात होऊ लागणार आहे. काँग्रेसमधे संघटनात्मक बदलहि होण्याची शक्यता आहे. कांग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांत काही मतभेद संभवतात. हे मतभेद धोरणात्मक असण्याची शक्यता आहे. वृश्चिकेचा रवि मुंबई व महाराष्ट्र यांतील दरी जास्त वाढवील. बेळगाव सीमाप्रश्नाला फारसा वेग येण्याची शक्यता नाही.

**मेष :** नोकरीत प्रतिष्ठा उंचावेल

जोपर्यंत राशिस्वामी मंगळ तिसरा आहे तोपर्यंत तुम्हाला कोणीहि हात लावू शकणार नाही. तिसरा मंगळ कर्तबगारीसाठी सामर्थ्य वाढवतो. या वेळी तुमची नोकरीतील शान वाढणार आहे. बढतीच्या बाबतीत मागे पडलेले तुमचे नाव आता एकदम पुढे येईल. जबाबदारी व अधिकार वाढेल. सोमवार ते बुधवार तुम्ही एखाद्या नव्या उद्योगाची सुरुवात करू शकाल. पत्रव्यवहारात यश मिळून तुमचे काम यशस्वी होईल. स्थावराच्या बाबतीत वारसदारीने काही पदरात पडू शकेल. तुमच्यापैकी ज्यांना शेती अगर बागायती किंवा स्टेशनरीचा उद्योग करायचा असेल तर त्याला अनुकूलता आहे. लॉटरीचे तिकिट घ्यावे. मात्र अकल्पित धनाच्या मागे लागू नका. बेकारांना आता फार काळ तिष्ठत राहावे लागणार नाही. मनस्थिती सुधारेल महिलांना नोकरीत मोठा अधिकार मिळणार आहे. सार्वजनिक कामात देखील मान मिळेल. विद्यार्थ्यांना प्रवास घडेल.

**वृषभ :** अचानक वदल

कलाक्षेत्रात तुमचे मन रमते हे खरे. तुमच्यापैकी जर कुणी सिनेकलावंत, नाट्यकलावंत, गायक अगर चित्रकार असेल तर या आठवड्यात त्यांचे भाग्य अचानक फळफळून येणार आहे. चालू नोकरीतील तुमच्या आशाआकांक्षांना योग्य प्रतिसाद मिळेल. वरिष्ठांचा गैरसमज दूर होऊन त्यांचे मन तुमच्यासाठी काही करावे असे म्हणू लागेल. तुम्हाला बाराव्या केतूचा त्रास होत असेल तर त्यातही सुधारणा होऊ लागणार आहे. कर्जाचा बोजा असेल तर तो कमी होऊ लागेल. राजकारणात काही त्रास तुमच्या पाठीमागे लागला असेल तर त्यालाही कलाटणी मिळणार आहे. कृषिपदवीधर, विज्ञानपदवीधर या वेळी संशोधनक्षेत्रात चमकणार आहेत. रविवार, बुधवार व शुक्रवार हे दिवस लक्षात ठेवा. नोकरी व व्यवसायाच्या क्षेत्रात महत्त्वाच्या घटना घडतील. महिलांना सेवेच्या व नोकरीच्या क्षेत्रात एखादी संधी चालून येईल. विद्यार्थ्यांना प्रवासात भाग्य उजळता येईल.

**मिथुन :** त्रास कमी होईल

नुकत्याच होऊन गेलेल्या ग्रहणाने खरे म्हणजे काही बाबतीत तुमचा फायदाच होणार आहे. विशेषकरून आर्थिक बाजू बरीच भक्कम होईल. येण्यादेण्यासाठी बरेच दिवस चाललेला तंटा तुमच्या बाजूने निकाली निघेल. बुडणारे येणे वसूल होऊ शकेल. नोकरीत तुम्हाला जी भीती वाटत आहे ती उगाच आहे हे आता तुम्हाला पटेल. वरिष्ठांबरोबर जवळचे संबंध जुळून येतील. खाजगी नोकरीत

मालकांची मर्जी राहील. तुम्ही जर लेखक असाल तर या वेळी तुमची प्रतिभा जागी होऊन तुमच्या हातून परिणामकारक असे लिखाण होऊ शकेल. रविवार, बुधवार व गुरुवार या दिवशी महत्त्वाची पत्रे येतील व अनपेक्षितअ शा महत्त्वाच्या व्यक्ती भेटतील. महिलांकडून या वेळी शिक्षणक्षेत्रात मोठे कार्य घडणार असून त्यांचा गौरवहि होणार आहे. विद्यार्थ्यांनी संयमाने वागण्याची गरज आहे.

**कर्क** : कल्पकतेने वागा

शनीमुळे तुमचे व्यक्तिमत्त्व आधीच प्रभावी बनले आहे. त्यातच आता शनिदेखील अनुकूल झाला आहे. त्यामुळे या वेळी तुम्ही सर्वच बाबतीत आघाडीवर राहाणार आहात. तुमच्या स्पर्धकांना व विरोधकांना तुम्ही चांगलेच पाणी पाजू शकाल. या वेळी अचानकपणे तुम्हाला प्रवासाचा योगदेखील येण्याची शक्यता आहे. राजकारणातील तुमचे कौशल्य अनेकांचे डोळे दिपवून टाकील. तुमचे निर्णय अचूक ठरल्याचे समाधान तुम्हाला मिळेल. कोर्टकचेरीची कामे वेग घेऊ लागतील. आर्थिक क्षेत्रात मात्र काही काळजी घेणे आवश्यक आहे. भलत्या भिडेला बळी पडू नका. खर्च आटोक्यात राहाणे अशक्य आहे. मोहासाठी तुमच्या हातून खर्च होईल म्हणून काळजी घ्या. सोमवार व शुक्रवार उच्चपदस्थ लोकांबरोबर तुमचा संबंध येईल. नोकरीत फारसा त्रास नाही; पण अधिकाराचा वापर मात्र जरा जपूनच करा. कुणाला दुखवू नका. महिलांना नोकरीत मान व अधिकार मिळेल. विद्यार्थ्यांना जरा श्रम करावे लागतील व त्रासही सहन करावा लागेल.

**सिंह** : चुका करू नका

तुम्हाला साडेसाती सुरू आहे. त्यातच आता राहू-केतू थोडेफार वरचढ झाले आहेत. त्यामुळे तुम्ही कोणत्याही क्षेत्रात काम करीत असलात तरी चुका टाळणे आवश्यक आहे. राजकारणात तुम्हाला शत्रू निर्माण होण्याची शक्यता आहे. जे तुमची स्तुति करीत होते तेच आता तुमची पाठ फिरताच तुमची निंदा करू लागतील. नोकरीत अतिशय काळजीपूर्वक वागा. रोजची कामे रोज करा. वरिष्ठांच्या तंत्राने वागा. ज्यांच्याकडे प्रत्यक्ष पैशाचा संबंध आहे त्यांनी काटेकोर राहाणे आवश्यक आहे. सोमवार व गुरुवार अविस्मरणीय घटना घडतील. व्यापारीक्षेत्रात थोडाफार त्रास जाणवतो असे दिसेल. महिलांनी इतरांच्या भांडणात व मध्यस्थीत भाग घेऊ नये. नोकरी करीत असल्यास त्यात जास्त लक्ष द्यावे. विद्यार्थीवर्गाला बेदरकार होऊन चालणार नाही.

**कन्या** : आशादायक वातावरण

दहाव्या मंगळाची जोपर्यंत तुमच्यावर कृपा आहे तोपर्यंत तुमच्याबाबतीत काहीही प्रतिकूल घडणार नाही. चार मित्र स्तुति करतील. तुमच्या कर्तृत्वाला नवे क्षेत्र उपलब्ध होईल. लेखन व काव्य याला बहर येईल. लोकप्रियतेचे नवे मजले तुम्ही या वेळी चढू शकाल. तुमच्यापैकी कुणी जर विवाहाचा विचार करीत असेल तर त्याला या वेळी विवाह ठरवायला अनुकूलता आहे. शनिवार, सोमवार व शुक्रवार महत्त्वाच्या वाटाघाटी किंवा महत्त्वाच्या व्यक्तीला भेटायला अनुकूल आहेत. चालू नोकरीत त्रास नाही. तुमची कामे वरिष्ठांच्या नजरेत भरतील. बेकारांना या आठवड्यात काही निश्चित काम मिळू शकेल. तब्येतीची काळजी घ्या. महिलांना या वेळी प्रसिद्धीचा योग आहे. त्यांना नोकरीत मानाचे स्थान मिळेल. विद्यार्थ्यांना आठवडा उत्तम आहे.

**तूळ** : यश मिळणार आहे

आज ज्या काही व्यक्ती सर्वच बाबतीत आघाडीवर आहेत, त्यात तुमची रास आहे. भाग्यस्थानी मंगळ, दुसरा शनि असा फार छान योग आहे. या वेळी तुमच्या आशा-आकांक्षा पुऱ्या होणार आहेत. तुम्ही म्हणाल ते खरे मानले जाईल. राजकारणात तुमचे कर्तृत्व या वेळी तेजाळणार आहे. भावी काळात त्याचा उपयोग होणार आहे. चालू नोकरीत तुम्हाला एखादी नवी संधी मिळून तुमच्या बुद्धीला नवे क्षेत्र उपलब्ध होणार आहे. कला, साहित्य, संगीत या क्षेत्रात तुमचे स्थान उंचावणार आहे. नोकरी करणाऱ्यांना याच प्रकारे फायदा मिळणार असून वरिष्ठांच्या मनात त्यांच्याविषयी आदर व प्रेम निर्माण होईल. रविवारी व बुधवारी महत्त्वाची व्यक्ती भेटेल. महिलांना कलाक्षेत्रात कर्तृत्व गाजवायला संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी चार पैसे उपलब्ध होतील.

**वृश्चिक** : नव्या योजना आखाल

मित्रहो, रवी राशीत असताना तुम्ही जे जे काही कराल त्याला यश मिळणार आहे. तुम्हाला जर या आठवड्यात राजकारणात काही साधावयाचे असेल तर तशी पावले टाका. वरिष्ठ वा उच्चपदस्थ व्यक्तीबरोबर तुमचे संबंध जुळून तुमच्या हिताची घटना घडेल. नोकरीत हा काळ फार छान आहे. तुम्हाला जर नोकरीत कसली भीती वाटत असेल तर ती या वेळी फोल ठरलेली असेल. तुम्ही सेवानिवृत्त होणार असाल तर तुम्हाला मुदतवाढ मिळेल. काही अनपेक्षित घटना घडतील. मात्र तुमच्या हाती अधिकार असतील तर त्याचा वापर फार जपून करा. मोहाला बळी पडू नका. एरवी नोकरीत हा



आठवडा अनुकूल आहे. सोमवार ते बुधवार बकारांना कामधंदा, नोकरी मिळेल. खर्चावर बंधन ठेवा. चैनीच्या खर्चाला बळी पडू नका. महिलांना उंची वस्त्रे मिळतील. विद्यार्थ्यांचा अनावश्यक खर्च होईल.

**धनू : अडचणीवर मात**

तुम्ही आता मंगळाच्या धमकीला भीक घालू नका. तुम्हाला संसारात कोणताच त्रास होणार नाही. पति-पत्नीतील प्रेम वाढते राहील. विवाहेच्छू लोकांना मात्र अजून काही काळ तरी विवाह लांबणीवर टाकणे आवश्यक आहे. रविवारी महत्त्वाची बोलणी होतील. सोमवार ते गुरुवार बेकारांना काम व नोकरी मिळेल. चालू नोकरीत महत्त्वाचे बदल घडण्याची शक्यता आहे. तुमचा अधिकार वाढेल. एखादी महत्त्वाची जबाबदारी तुमच्यावर सोपवण्याची शक्यता आहे. प्रवासात महत्त्वाची कामे होतील. परदेश व अंतर्गत प्रवास घडेल. साहित्य, शास्त्र व कला या क्षेत्रात तुमच्या प्रक्रियेला स्थान मिळेल. चालू नोकरीत पगारवाढीचा विचार केला जाईल. मित्राचे उत्तम सहकार्य मिळेल. तुम्ही जर दर वेळी लॉटरीचे तिकीट घेतले तर तुम्हाला बक्षीस मिळेल. महिलांनी आळस टाकून सार्वजनिक कार्य व नोकरी करावी. यश मिळेल. विद्यार्थ्यांनी नवे काही तरी करावे. उद्योगात लक्ष घालावे.


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख आहे.

आनंदाच्या
दाही
दिशा

रवींद्र पिंगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

किंमत : दहा रुपये


**मकर : सामर्थ्याचा साक्षात्कार**

मकरराशीचा मित्र मंगळ शत्रुस्थानी आहे ही घटना इतकी अनुकूल आहे की या वेळी तुम्ही कोणत्याही विरोधाला व संकटाला जुमानणार नाही. नोकरी, राजकारण, सत्ता या बाबतीत तुमची कार्यक्षमता वाढणार असून तुमच्या कामाच्या झपाट्याने विरोधक देखील चकित होतील. चालू नोकरीत मग ती खाजगी क्षेत्रातील असो की सरकारी क्षेत्रातील असो तुमची जबाबदारी वाढणार आहे व तुमच्या अधिकारात भरपूर वाढ होणार आहे. जे तुमचे निंदक होते ते आता तुमचे 'वंदक' होतील. ज्यांनी तुमच्याविरुद्ध कारवाया केल्या तेच आता तुम्हाला सहकार्याचा हात पुढे करणार आहेत. राजकारणात तुमचे पाऊल पुढे पडणार आहे. आर्थिक बाजू भक्कम होईल. अचानक धनलाभाचा योग आहे. बेकारांच्या मनातील शंका व अनिश्चितता दूर होऊन त्यांना निश्चित असे काही तरी मिळेल. मंगळवारी एक महत्त्वाची व्यक्ती तुमच्या सहवासात येईल. उद्योगधंद्याच्या प्रगतीच्या योजना त्याच्या सहाय्याने तुम्ही आखू शकाल. महिलांनी स्वतःचा स्वतंत्र उद्योग सुरू करावा. नोकरीही मिळू शकेल. विद्यार्थ्यांनी स्वतःची गुणवत्ता वाढवावी. बुद्धीचे तेज पडेल.

**कुंभ : राजकारणात मोठे स्थान**

एकटा मंगळ जरी तुमच्यावर खूष झाला तरी तुमचे सार्वजनिक जीवनातील स्थान तुम्हाला सहज मिळू शकेल आणि मंगळ तसा तुमच्यावर सध्या खूष आहे. या वेळी प्राध्यान्येकरून तुम्ही राजकारणात मोठा इतिहास घडवू शकाल. तुम्ही आजवर उराशी बाळगलेली स्वप्ने या वेळीं साकार होतील. तुमच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या अडचणी सहजपणे दूर फेकल्या जातील. नोकरीत तुम्हाला असे स्थान मिळणार आहे की कुणालाही हेवा वाटावा. या वेळी तुम्हाला कुणीही अडवू शकणार नाही. व्यापारी लोकांनी प्रामाणिकपणे व्यापार करावा.त्यांना नफा तर मिळेलच; पण त्यांची प्रतिष्ठाही वाढेल. खते, लोखंडी अवजारे, जमिनीची खरेदी-विक्री इत्यादी व्यवसाय तेजीत येतील. शेअर्सचे वायदे मात्र जरा जपूनच करा. बेकारांना खाजगी क्षेत्रात चांगली नोकरी मिळू शकेल. इंजिनियर्स, वकील यांना सरकारी नोकरीत बोलावणे येईल. शनिवार व सोमवार आर्थिक दृष्ट्या उत्तम. महिलांनी काही तरी मनात ठरवून करावे. स्वतंत्र नवे उद्योग सुरू करायला हरकत नाही. विद्यार्थ्यांना प्रवासाचा योग आहे.

**मीन : अकल्पित धनलाभ**

मंगळ जरी मनःस्थिती फारशी अनुकूल ठेवणार नसला तरी तुमची राहण्याची जागा, बंगला, स्थावर याबाबतीत काही तरी अनुकूल व हिताचे असे तो घडवणार आहे. परिस्थितीनुरूप बंगला अगर लहानशी का होईना राहाण्याची जागा या वेळी तुम्हाला मिळून तुम्हाला लाभ होणार आहे. नोकरीच्या दृष्टीने थोडा चढ-उतार संभवतो. वरिष्ठांच्या मनात थोडाफार गैरसमजही असू शकेल. तो या आठवड्यापासून कमी होऊ लागेल. संशोधक, विज्ञानपदवीधर, शेतीपदवीधर, इंजिनियर्स यांना या आठवड्यापासून बेकार राहावे लागणार नाही. इंजिनियर्सना अशा प्रकारे काम मिळू शकेल की त्या कामामुळे त्यांचे नाव होईल. सरकारी नोकरीतील लोकांना फारसा त्रास होणार नाही. सेवानिवृत्तीचे वय असले तरी त्यांना मुदतवाढ मिळू शकेल. त्यांनी प्रयत्न करावा. महिलांनी चाकोरी सोडून नोकरीची नवी क्षेत्रे शोधावीत. प्रशासनात त्यांना मोठा मान व अधिकार मिळू शकेल. विद्यार्थ्यांनी स्वतःला एखाद्या संशोधनात गुंतवून घ्यावे. त्यांना चार पैसे मिळतील.

□



# मुसाफिर जायेगा कहाँ

दिलीप कुलकर्णी

तो आला, त्यानं पाहिलं आणि त्यानं जिकलं......

असंच काहीसं सिकंदरचं वर्णन केलं जातं. बर्मनदा, तुमच्या संगीतजीवनाची झलक एकाच वाक्यात सांगायची झाल्यास अशीच काहीशी सांगावी लागेल. थोडंसं विस्तारानं सांगायचं झाल्यास बरंच काही सांगता येईल...

सिने-संगीतात संगीतकारच खऱ्या अर्थानं 'डॉमिनन्ट' असतो असं ठामपणं आणि ठाशीवपणं पटवून देणारा संगीतकार...

सिनेमाचं संपूर्ण कथानक आणि संवेदनाक्षम नायकाची व्यक्तिरेखा केवळ संगीताच्या माध्यमातून 'प्यासा' मधून तुम्ही सांगितलीत...

लोकांच्या आवडीनुसार गाणी देण्यापेक्षा चांगल्या अभिरुचीची गाणी देऊन लोकांचीच आवड उंचवायची हा प्रयत्न शेवटपर्यंत करणारे तुम्हीच एकुलते एक संगीतकार...

किशोरकुमार आणि आशा भोसलेसारखे गाण्याला वेगळं वळण देणारे गायक-गायिका सुद्धा तुमची संगीतशैली 'सुपरसीड' करू शकले नाहीत...

तुमच्या संगीतात upper limits ना मर्यादाच नाहीत; परंतु lower limits ना मात्र निश्चित मर्यादा आहेत-बर्मनदा वाईट देऊन देऊन किती देऊ शकतील? आणि बर्मनदा चांगलं मात्र पुष्कळ देऊ शकतील...

कलेशी प्रामाणिक राहून व्यवसाय आणि लोकप्रियता साधण्याची कसरत, किमया बर्मनदा तुम्हाला बरोबर जमलेली दिसते. म्हणूनच आपल्याबरोबर आणि नंतरही आलेले रथी-महारथी संगीतकार एका-मागून एक मागं पडत असता ३० वर्षांनंतरही या क्षेत्रात तुम्ही टिकून, नव्हे पक्के पाय रोवून होता...

प्रत्येक गायक–गायिकेतील चांगलं वेचून काढून प्रत्येकासाठी त्याच्या संगीतकारकीर्दीत उच्चतम गाणी देऊ शकणारा संगीतकार म्हणून बर्मनदा फक्त तुमचंच नाव पुन्हा घ्यावं लागेल...

हिंदी सिने–संगीतात खऱ्या अर्थानं जबरदस्त contribution केलेल्या संगीतकारांची नावं तशी ५–६ च निघतील; परंतु बर्मनदा त्यात तुमचं नाव नक्कीच घ्यावं लागतं...

बर्मनदा, तुमची गाणी म्हणजे किमान दर्जा असलेल्या कविताच आहेत. साहीर, शैलेन्द्र आणि नीरजसारख्यांच्या काही कविताच जणू तुम्ही स्वरबद्ध केलेल्या आहेत...

गेल्या ३०–३५ वर्षांतल्या तुमच्या संगीताची तोंडओळख अशा तऱ्हेनं मांडता येऊ शकेल.

सचिनदा, राजेशाही कुटुंबाची परंपरा सांगणाऱ्या तुम्ही ' रोंगीला रोंगीला रोंगीला रे ' ह्या एका शेतकऱ्याच्या तोंडच्या गाण्यामुळं स्फूर्ती घेतलीत आणि हिन्दी–बंगाली संगीतात एक मन्वन्तर घडवून आणलंत.

१९३०–३२ च्या सुमारास एका बंगाली साप्ताहिकातील चांगल्या कवितेच्या ओळींनी तुमचं लक्ष वेधलं आणि त्यांनी तुम्ही एवढं झपाटून गेलात की, चाल लावून एका मित्राला ते गाणं लगेच गाऊन दाखविलंत–आपल्यात संगीतकाराची निशाणी असल्याची पहिली ग्वाही, झलक तुम्हाला सापडली...

त्या आधी लहानपणापासून बंगालचं लोकसंगीत तुम्ही पुरेपूर प्यायलेलं होतं. त्यातील मधुरतेनं तुमच्या मनावर इतका परिणाम केला होता की, हिन्दी संगीतात त्याचा जास्तीत जास्त उपयोग करण्याचा मोह तुम्हाला टाळता आला नाही. वडिलांच्या मृत्यूनंतर संगीताला तुम्ही पूर्णपणे वाहून घेतलं...अशातच अलाहाबादच्या 'ऑल इंडिया म्युझिकल कॉन्फरन्स ' मध्ये गायलेल्या 'धीरेसे जाना बगियनमे रे भवरा ' ह्या हिन्दी गाण्यानं तुम्हाला हिंदुस्थानभर प्रसिद्धी मिळाली. त्यापूर्वी बंगाली संगीतापुरतंच तुमचं क्षेत्र मर्यादित होतं. बिहार आणि उत्तर प्रदेशचं लोकसंगीत शिकून शास्त्रीय संगीत आणि लोकसंगीत ह्यांचे वेगवेगळे प्रयोग तुम्ही बंगाली संगीतात केले होते. न्यू थिएटर्सचे मालक बी. एन. सरकार तुमच्या संगीताचे चाहते होते; परंतु काही बंगाली चित्रपटांचे संगीतनियोजन करून सुद्धा न्यू थिएटर्सच्या सिनेमाला संगीत देण्याची संधी मिळाली नाही ह्याची रुखरुख शेवट-पर्यंत तुम्हाला लागली होती.

तोपर्यंत तुमच्या संगीताची महती मुंबईपर्यंत येऊन पोचली होती. बॉम्बे टॉकीजमधून फुटून निघून काहींनी फिल्मिस्तानची स्थापना केली होती. रायबहादूर चुनीलाल आणि शशिधर मुखर्जींनी तुम्हाला १९४५ मध्ये मुंबईला बोलावलं आणि ' शिकारी ' संगीताची जबाब-दारी तुमच्यावर सोपविली.

प्रत्येकाला आपल्या आयुष्यातील प्रत्येक ' पहिल्या ' गोष्टीची नवलाई वाटत असेल तर संगीतकार त्याला अपवाद कसे असतील ? शंकर–जयकिशन सुद्धा आपल्या पहिल्या ' बरसात 'च्या यशानं बेहोष होऊन गेले असल्यास नवल नाही; परंतु तुमच्या पहिल्या हिन्दी चित्रपट–संगीताला ते भाग्य नव्हतं ! आणि त्यातील अशोककुमारने गायलेल्या आणि गाजलेल्या ' डोल रही नैय्या मेरी ' ह्या चांगल्या गाण्याची चालही तुमची नव्हती.

१९४६ ते १९५१ पर्यंत १२ सिनेमांपैकी ' दो भाई ', 'आठ दिन', ' अफसर ', ' शबनम ' विद्या सारख्या ५–६ सिनेमांना चांगलं संगीत देऊन सुद्धा सचिनदा, खऱ्या अर्थानं तुम्हाला जिवंत संगीत सापडलं नव्हतं. १९५१ च्या ' बाजी 'मुळं तुमच्या संगीताला नवीन दिशा मिळाली. कलकत्त्यात एकदा मासेमारीच्या वेळी ५–६ कॉलेजची मुलं आनंदाच्या भरात चक्क ' बाजी 'च्या ' तदबीर बिगडी हुई तकदीर बना ले 'मध्ये मग्न झालेली तुम्ही पाहिलीत आणि आश्चर्यानं स्तब्ध झालात ! जणू त्या गाण्याच्या निर्माणकर्त्यालाच ती मुलं ' अपनेपे भरोसा है तो ये दांव ( मासेमारीचा ) लगा ले ' म्हणून खिजवत होती आणि खरोखरच तेव्हापासून (मासेमारीत नसेल कदाचित परंतु) संगीतात मात्र बर्मनदा, तुम्ही ' बाजी ' मारलीत.

' बाजी 'मुळे तुमच्या संगीताला दिशा मिळाली आणि काल-परवाच्या ' हरे राम हरे कृष्ण 'मुळे राहुलदेवच्या संगीताला पण दिशा मिळाली. तरी पण दोन्हीतील फरक ठळकपणे जाणवतो. त्यावेळे-प्रमाणे आजही ' बाजी 'च्या गाण्यामधला ' स्पार्क ' जाणवतो; परंतु ' हरे राम 'च्या संगीताचं उद्याचं भवितव्य काय ? असा प्रश्न पडतो. ' दम मारो दम ऽऽ ' लोकांनी कितीही डोक्यावर घेतलं तरी राहुल-देवचं ते गाणं शेवटी ' मोनोटोनस 'च ठरतं, उलट ' सुनो गजर क्या गाये ' आणि ' ये कौन आया ' सारखी तुमची ' बाजी 'ची गाणी तुमच्या संगीतातील उत्कृष्ट नमुना म्हणून आजही दाखविता येतात. संगीत देणाऱ्याच्या मनोवृत्तीला हा फरक इथं स्पष्ट दिसतो. संवेदना-क्षम गाणी देणारा संगीतकार स्वतः संवेदनाक्षम असायला हवा ही महत्त्वाची गोष्ट सचिनदा, तुम्ही आपल्या संगीतद्वारा आम्हाला दाख-वून दिलीत. ' अबके बरस ' (बंदिनी) ' तुम ना जाने किस जहामें ' (सजा) ' काली घटा छाये मोरा ' (सुजाता) ' मेरा सुंदर सपना टूट गया ' ( दो भाई ) ' नैन दिवानी एक नहीं माने ' ( अफसर ) सारखी संवेदनाक्षम गाणी त्यामुळे आजही आम्हाला अपीलिंग वाटत असल्यास नवल नाही !

गेल्या ३०–४० वर्षांत हिंदी संगीतात तसं पाहायला गेलं तर प्रतिभावान संगीतकार पुष्कळ होऊन गेले; परंतु स्वतःची निश्चित शैली ( definite style ) असलेले संगीतकार थोडेच. नौशाद, सी. रामचंद्र, खेमचंद, मदनमोहन, अनिल विश्वास, रोशन, जयकिशन, वसंत देसाईसारख्या प्रतिभावान संगीतकारात कुठे ना कुठे सारखे-पणा जाणवतो; परंतु सलिल चौधरीप्रमाणेच पूर्णपणे Identification असलेलं बर्मनदा, तुमचं संगीत अगदी वेगळं आहे. निराळं आहे–किंबहुना ते केवळ तुमचंच आहे !

नौशादप्रमाणेच संगीताची परंपरा असल्यामुळे बर्मनदा, तुमच्या संगीतातून एक सलग व्यक्तिमत्त्व उभं राहतं. तुमची गाणी इतर काही संगीतकारांप्रमाणे केवळ आकर्षक ठरत नाहीत, तर हिंदी

सिनेसंगीतात ४५ व्या वर्षी आल्यामुळं कदाचित असेल; परंतु ती मॅच्युअर्ड वाटतात. संगीताची वैशिष्टयपूर्ण शैली विस्कटू न देता कालमानानुसार अनेक संगीतकारांच्या 'ट्रेन्डस 'मध्ये वावरून संगीत देणारे बर्मनदा, तुम्ही शेवटी conservative असल्याचं तुमच्या गेल्या ३० वर्षांच्या संगीतावरून जाणवतं. अशा तुमच्या संगीताचे साधारणत: तीन भाग पाडता येतील. गुरुदत्त–बिमलदासारख्या कल्पक निर्माता–दिग्दर्शकांच्या सिनेमांचा एक भाग, नवकेतन किंवा नवकेतन छापाच्या सिनेमांच्या संगीताचा दुसरा भाग आणि शिल्लक असलेल्या इतर सिनेमांचा तिसरा भाग.

सचिनदा, तुमच्या संगीताचा एकत्र विचार केला तर नवकेतनसाठी दिलेलं तुमचं संगीत at ease दिलेलं संगीत आहे. ('गाईड' अपवाद) 'अफसर 'चं क्लिष्ट संगीत 'बाजी 'पासून at ease बनलेलं दिसतं. तुमच्या संगीतातील इतरत्र आढळणारी 'हम जैसे बरबाद दिलों का जीना क्या और मरना क्या ,, 'वक्तने किया क्या हसी सीतम', 'जाने वो कैसे लोग थे जिनके 'सारखी व्याकुळ, जबरदस्त निराशावादी किंवा 'जिसे तू कबूल कर ले' 'काली घटा छाये मोरा' सारखी नाजुक, मधुर गाणी नवकेतनच्या संगीतात सहसा आढळायची नाहीत; परंतु हेही तितकंच खरं की नवकेतनचं तुमचं संगीत at esse वाटत असलं तरी जाता जाता देऊन गेलेलं cheap संगीत अजिबात वाटत नाही, तर त्यात Originality चाही भाग आहे. खेळकर, रंगतदार, सोपं वाटणारं 'नौ दो ग्यारह 'चं संगीत निश्चितपणे Graceful आहे. अगदी 'प्यासा', 'देवदास' 'सुजाता', 'चलतीका नाम गाडी.' 'बंदिनी 'च्या संगीताला जशी ग्रेस होती तशीच ग्रेस ! –फक्त ती ग्रेस वेगळी होती एवढंच !

नवकेतनच्या संगीतात बर्मनदा, तुम्हाला पुरेपूर स्वातंत्र्य आणि भरपूर वाव होता. त्यामुळे तुमच्या संगीतातील एक महत्त्वाचा गुणधर्म बघायला मिळतो–स्वच्छंदीपणा ! 'बाजी 'चं संगीत गीतारॉयच्या तालसुरात झोकून दिलेलं वाटतं, 'दिलसे मिलाके दिल प्यार 'मधील लताच्या आवाजातील बेहोषीचा नमुना 'टॅक्सी ड्रायव्हर 'मध्ये दिसतो. आशाच्या आवाजाला तुम्ही 'झिकझिकायला' लावलंय 'सच हुए सपने मेरे' ( काला बाजार ) मध्ये तर साध्या टोपीसाठी बिचाऱ्या किशोरकुमाराला आर्जवं करायला लावलीत 'ऐ मेरी टोपी पलटके आ' ( फन्टूश ) मध्ये.

कोणत्याही सिनेमाच्या संगीतावर चांगल्या दिग्दर्शकांचा चांगला प्रभाव होऊ शकतो. त्या संगीतातून त्यांचं स्वतःचं व्यक्तिमत्त्व दिसत असून सुद्धा संगीताची एकूण घडण वेगळीच बनते–काहीशी चांगली 'प्यासा' 'कागजके फूल', 'देवदास' 'गाईड' 'सुजाता' 'बंदिनी' 'चलतीका नाम गाडी 'सारख्या सिनेमाच्या संगीतात बर्मनदा, तुम्ही आपलं कसब पणाला लावलेलं दिसतं. 'प्यासा', 'कागजके फूल 'चं संगीत गुरुदत्त–मूडी बनलेलं असलं तरी बिमलदा आणि गुरुदत्त ह्यांच्यात बिमलदाचा संगीतकारावर control असल्याचं दिसतं. गुरुदत्त त्यामानानं संगीतकाराला बरंच स्वातंत्र्य देत असावा. गुरुदत्तचा स्वतःचा भावनिक दृष्टिकोन 'प्यासा', 'कागजके फूल 'च्या संगीतातून प्रकट झाल्यामुळे त्यांचे संगीत पूर्णपणे गुरुदत्त–मूडचंच भासतं. बिमलदा त्यामानाने जास्त निसर्गप्रेमी आणि 'एस्थेटिक सेन्स 'चा दिग्दर्शक असल्यामुळे त्याची 'आर्टिस्टिक ब्यूटी 'ची छाप त्याच्या सिनेमासंगीतावर पूर्णपणे पडल्याचे जाणवते. त्यामुळेच 'देवदास' 'सुजाता' आणि 'बंदिनी' ह्या 'आर्टिस्टिक ब्यूटी' असलेल्या संगीतात बर्मनदा, तुमचं एकही गाणं Out of the way दिसत नाही. प्रत्येक गाणं–वेलप्लेस्ड आहे. उलट प्यासा आणि 'कागजके फूल' मधील 'सर जो तेरा चकराये' आणि 'हम तुम जिसको कहते हैं शादी 'सारखी तुमची चांगली गाणी सुद्धा एकूण सिनेमात अनाश्यक वाटू शकतात. त्यामुळे तुलनेच्या दृष्टिकोनातून विचार करता 'देवदास' 'सुजाता' 'बंदिनी 'चं तुमचं संगीत उजवं ठरावं.

कलात्मक सिनेमांना संगीत देण्याची परंपरा नवकेतनमध्ये तुम्ही जोपासली ती नवकेतनच्या एकुलत्या एक क्लासिक सिनेमा 'गाईड '-मध्ये. लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीतावरचं मनापासून असलेलं तुमचं प्रेम 'गाईड 'च्या संगीतात पुन्हा एकदा अनुभवायला मिळतं. शास्त्रीय संगीत आणि लोकसंगीत ह्यांचा वापर करताना एखाद्या चिजेत अगर लोकधुनेत केवळ शब्द बसविणं हीच तुमची केवळ कल्पना नाही, तर शास्त्रीय संगीत आणि लोकसंगीतावरचं तुमचं गाणं शेवटी तुमचंच ठरतं. 'गाईड 'चं संगीत हा त्याचा एक तंतोतंत नमुना ! 'गाईड 'मध्ये कथानकाचं बंधन आहे, घटनांचं भान आहे. प्रासंगिक बंधन आहे– त्या बंधनातसुद्धा सचिनदा, तुम्ही संगीत फुलवलं– इथं खऱ्या अर्थानं नवकेतनसाठी तुम्ही कष्ट घेतलेत.

'गाईड' प्रमाणेच त्यापूर्वीही लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीताचा– त्यातही लोकसंगीताचा जास्त– वापर तुमच्या एकूण संगीतात जागोजागी दिसत असला तरी तुमची अशा पद्धतीची गाणी Applied संगीतात मोडतात. त्यातील originality चा भाग शेवटी तुमचाच. 'रंगीला रंगीला रंगीला रे...'ह्या शेतकऱ्याच्या तोंडच्या गाण्याचा वापर केलेल्या 'आन मिलो आन मिलो श्याम सावरे 'सारखं सुरेख गाणं हे शेवटी तुमचंच creation असल्याचं पदोपदी जाणवेल इतकं त्या गाण्याच्या बारीकसारीक गोष्टीत तुम्ही लक्ष दिलं आहे. फैय्याजखान ह्यांनी गायलेल्या शास्त्रीय गाण्याच्या आधारावर तुमचं 'बुझदिल 'चं 'झनझन झन पायल बाजे' गाणं बेतलेलं असलं तरी लताच्या त्या गाण्याच्या कॉम्पोझिशनचं श्रेय आणि श्रम तुमचेच आहेत. थोडक्यात, इतर काही संगीतकारांप्रमाणे लोकसंगीत किंवा शास्त्रीय संगीत जसंच्या तसं हिंदी संगीतात घुसडण्याचा प्रयत्न तुम्ही बिलकुल केला नाहीत. त्यांचं application तेवढंच तुमच्या गाण्यात आढळतं.

सचिनदा, लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीत ह्यांचा आधार घेऊन केलेल्या तुमच्या रचना इतर संगीतकारांपेक्षा पूर्णपणे वेगळ्या वाटण्याचं कारण, इतर संगीतकार ज्या गोष्टी सहसा करत नाही त्या तुम्ही करून दाखविल्यात. गाण्यांच्या ओळी सारख्या लांबीच्या ठेवण्याऐवजी लहानमोठ्या करणं, छोट्या चालीत खूप शब्द आणि लांब चालीत थोडेच शब्द बसवणं हा तुमचा खास प्रकार. कित्येक वेळी चालीचा 'कन्टेन' मर्यादितच असतो; परंतु सोप्या आणि गोड चालींच्या छोट्या तुकड्यावर सबंध गाणं रचलेलं असतं. अशी सोपी चाल गाण्यात पुन्हा पुन्हा वापरून किंवा त्याची व्हेरिएशन्स घेऊन, कौशल्यानं शब्द बसविणं किंवा विचित्र जागी शब्द तोडणं ह्यात बर्मनदा, तुमचा हातखंडा होता. स्वरांचं आणि तालांचं एकच 'कॉम्बिनेशन' करून वेगवेगळ्या सुरांमध्ये फिरवून सोपी चाल रंजक करण

हाही एक विशेष गुण तुमच्या संगीतात दिसतो: पकड घेणारी सुरुवात, सोप्या गाण्यात व्हेरिएशन्स, मधलं संगीत किंवा कडव्याची एखादी ओळ कितीही भरकटत गेली तरी ध्रुपदाला बरोबर नेमकं येणं वगैरे गोष्टींमुळं बर्मनदा, तुमची गाणी कधीही एकसुरी किंवा मेकॅनिकल, मोनोटोनस वाटत नाहीत तर गाण्यातल्या अगदी बारीकसारीक गोष्टीही वेगळ्या करता येत नाहीत इतक्या त्या गाण्याशी एकजीव, एकरूप झालेल्या असल्यामुळं गाण्यांमध्ये 'इन्टिग्रेशन'/ असल्याचं अनुभवायला येतं. अगदी खास सचिनदेवी-रचना नमुन्यादाखल सांगायची झाल्यास 'जोगी जबसे तू आया मेरे द्वारे' ह्या गाण्यातील एक कडवं सांगता येईल–

मीठी मीठी अगन ये सह ना सकूँगी
मै तो छुईमुई अबला रे, और निकट मत आ रे'
ओ जोगी जबसे...

ह्या ओळी तुमच्या संगीतात मात्र अशा बसतात–

मीठी मीठी अगन ये सह ना सकूँगी
मीठी मीठी अगन...
मै तो छुईमुई अबला रे
सह ना सकूँगी
मेरे और निकट मत आ रे
ओ जोगी ऽ जबसे तू आया...

त्यातील ओळींचा क्रम बघण्याजोगा आहे. ध्रुपदाच्या पहिल्या ओळीला एक, दुसऱ्या ओळीला दुसरा, कडव्याला तिसराच आणि मधल्या संगीतात वेगळाच ठेका वापरूनसुद्धा गाण्याचं सिन्क्रोनायझिंग सांभाळायचं हे बर्मनदा तुमच्या संगीत शैलीचं महत्त्वाचं वैशिष्ट्य ह्याही गाण्यात दिसतं.

संगीतशैलीवरून आठवण झाली. बर्मनदा, तुमची शैली शंकर जयकिशन किंवा इतर काही संगीतकारांप्रमाणं केवळ आर्केस्ट्रेशनमुळं निर्माण झाली नाहीं तर काम्पोझिशन पद्धतीमुळे ती स्पष्ट होते. तुमच्या संगीतात Identification आहे ते तुमच्या काम्पोझिशन पद्धतीमुळं, आर्केस्ट्रेशन पद्धतीमुळं नव्हे! तुमच्या संगीतात आर्केस्ट्रेशन न्हीदम म्हणून, पूरक म्हणून अंतर्भूत असते. केवळ हौस म्हणून नसते. आवश्यक वाद्यांचा कुशलतेनं उपयोग केल्यामुळं तुमची गाणी अनेक पदरी जाणवतात. जितक्या वेळा एखादं गाणं ऐकावं तितक्या वेळा गायक–गायिकांच्या आवाजामागं वाजणारी वाद्यं लक्षात येतात आणि गाण्याची खोली (depth) जाणवते.मुख्य गायकांच्या मागं येणाऱ्या वाद्यांनी– मुख्यता व्हायोलिन्स आणि बासऱ्या–गाण्यातले पॉझेस भरलेले असतात. गाण्यातून येणाऱ्या, बासऱ्या, पिकोलो गाण्याची 'रेंज' वाढवतातच. शिवाय गाण्याच्या ओळी जोडण्याचंही काम करतात. अगदीच जेव्हा जरूरी वाटली तेव्हा तुम्ही काही विशिष्ट चित्रपटांत वाद्यवृन्दांचे प्रचंड ताफेच्या ताफे सफाईदारपणे वापरलेले दिसतात. लताची 'ज्युवेल थीफ'ची गाणी त्याचा उत्कृष्ट नमुना आहे. मॉडर्न संगीताच्या प्रवाहात बर्मनदा, जेव्हा तुम्ही आलात तेव्हा सतारीचा वापर चक्क गिटारसारखा करून आर्केस्ट्रेशनचा अजब नमुना दाखवून दिलात. संगीतातील पुरेपूर व्हीजन असलेल्या तुमच्यासारख्या संगीतकारालाच हे शक्य आहे. 'गाईड'सारख्या सिनेमात चाली जुन्या वळणाच्या आहेत; परंतु आर्केस्ट्रेशनपद्धती मात्र पूर्णपणे नवीन आहे. 'पिया तोसे नैना लागे रे'सारख्या गाण्यात जुन्या नेहमीच्या वाद्यांनी 'परिणाम' मात्र संपूर्णपणे नवीन बनविलात. 'फास्ट टेम्पो' असलेल्या 'ज्युवेल थीफ'ला तितकंच वेगवान संगीत देऊन बर्मनदा, तुम्ही दाखवून दिलंत– लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीताचा भोक्ता संगीतकार नवीन ट्रेन्डमध्ये मॉडर्न संगीताचा परिणामसुद्धा किती सरसपणे साधू शकतो.

बर्मनदा, ह्या सगळ्या गोष्टींचं मर्म एकाच वाक्यात सांगता येईल. तुमचं संगीत जितकं Conservative आहे तितकंच ते प्रयोगशील पण आहे–इतकी लवचिकता तुमच्या एकूण संगीतात आहे. वेगवेगळ्या पद्धतीच्या रचना ठेवून सातत्य, सहजपणा आणि विविधता ही तुमच्या संगीताची अंगीभूत लक्षणं बनलेली दिसतात. किंबहुना ह्या विविधतेमुळेच गेली ३० वर्षे अनेक हुकमी संगीतकार एकामागून एक मागं पडत असताना बर्मनदा, तुम्ही मात्र विराजमान झालेले होता. सातत्याने ३० वर्षे संगीत देत राहूनहि तुमच्या चालींमध्ये पुनरावृत्ती झालेली सहसा दिसत नाही. इतर कित्येक संगीतकारांप्रमाणे तुमच्या चालींचा कधीहि 'टाइप' झाला नाही. 'एक सुंदर गाणं' हाच खरा तुमच्या संगीताचा टाईप! 'दिल पुकारे आरे आरे' आणि 'कोरा कागजका था मन मेरा' त्याचप्रमाणे 'सो जा पंछी अकेला है' सारख्या गाण्यात चालींमध्ये पूर्णपणे साम्य आढळलं तरी इतर संगीतकारांप्रमाणे उगीचच जुन्या चालीत नावापुरते थोडेफार फेरबदल करून 'नवीन गाणे पाडण्याचा' अयशस्वी प्रयत्न तुम्ही केला नाहीत, तर आपल्या जुन्या कामात तुम्ही मुळातच Perfect असल्यामुळे त्या चाली जशाच्या तशा तुम्ही पुन्हा वापरल्यात. अपवादात्मक पुनरावृत्तीमध्येहि तुम्ही पूर्ण विश्वासानं चालींचा उपयोग केला–त्याच चालीचं गाणं वेगळ्या गायकांकडून गाऊन घेऊन! कित्येक वेळा तर एकाच प्रकारच्या मूडची गाणी वेगवेगळ्या चालींच्या जोरावर त्यातील भावांची अर्थपूर्णता कायम ठेवून तुम्ही दिलेली आहेत. शांत गंभीर मूडच्या गाण्यातलं तुमचं संगीत गाण्याच्या त्या त्या मूडला पार्श्वभूमी देतंच; पण त्यामुळं गाण्याला श्राव्य आणि मानसिक असा दोन्ही प्रकारचा 'बॅलन्स' येतो. शांत गंभीर गाण्यातल्या शब्दामध्ये दडलेला आशय तुम्ही संगीतानं ऐकणाऱ्यांपुढं उभा करता. 'तुम ना जाने किस जहामे' 'जीवनके सफरमे राही' ही दोन्ही लताची आणि 'वक्तने किया क्या हसी सीतम' सारखे गीतादत्तचं गाणं नमुन्यादाखल सांगता येतील.

नेहमीच नवीन चाली देत राहणारे आणि प्रयोगशीलतेसाठी धडपडणारे बर्मनदा, तुम्ही आपल्या संगीतात युगलगीतांचा एक न्याराच प्रांत निर्माण केला आहे. अशा युगलगीतात तुमच्यातला 'गेयी' आणि प्रसन्न दृष्टिकोन आढळतो. छोटे छोटे प्रश्न आणि मिस्किल उत्तरं अशा स्वरूपाची रंगतदार आणि खेळकर युगलगीतं सरसपणे देणं जणू काय तुमच्या संगीतपूर्ण रक्तातच भिनलेलं असावं. 'हम आपकी आँखोंमें इस दिलको बसा दें तो', 'हाल कैसा है जनाबका', 'आँखोमें क्या जी', 'लिखा है तेरी आँखोंमें' सारखी प्रियकरप्रेयसींची युगलगीतं त्यामुळंच रंगतात. मिस्किल आणि नखरेल गाण्यात आशा भोसलेची आणि त्या मानाने 'सोज्वळ' गाण्यात लता

मंगेशकरची तुमची निवड अगदी अर्थपूर्ण आहे. प्रियकर-प्रेयसीचं युगलगीत आणि पतिपत्नीचं युगलगीत यातला फरक केवळ चालीच्या जोरावर तुम्ही ' जीवनकी बगिया महके गी ' आणि ' तेरे मेरे मिलनकी ये रैना ' ह्या गाण्यातून दाखवून दिलात. तुमच्या अशा युगलगीता-मधली प्रेमिक संभाषणं चतुर असतात. दोन प्रेमिकांच्या गप्पा असंच साधारणतः त्यांच स्वरूप असतं. ' प्यासा 'च्या युगलगीतात ' इन जुल्फोंमे गूंधेंगे दो फूल मोहब्बतके ' ला तितकंच मिस्किल उत्तर मिळतं–' जुल्फोंको झटककर हम ये फूल गिरा दे तो.' तुमच्या युगल-गीतातील गायकगायिका जणू काही गप्पाच मारीत असतात, बोलत असतात. ' बोलणं आणि गाणं ह्या दोन्ही गोष्टी मूलभूतपणे एक-मेकांपासून फारशा वेगळ्या नाहीत. बोलण्यात जे जे सांगता येतं ते ते सारं तितक्याच स्पष्टपणे, परिणामकारकपणे संगीतातून प्रगट करता आलं पाहिजे. एखाद्या प्रामाणिक आणि भावनोत्कट भाषणातून जी तीव्रता, आनंद, गांभीर्य प्रकट होऊ शकतं ते सारं संगीतातून तसंच, किंबहुना अधिक प्रामाणिकपणे प्रकट होऊ शकेल आणि शेवटी उत्तम काव्य हे संगीतापासून कधीच दूर नसतं,असंच काहीसं सलिल चौधरी म्हणाला होता. त्याची योग्य प्रचीती बर्मनदा, तुमच्या संगीतातून दिसून येते– मग ते युगलगीत असो, सोलो असो, नाही तर सहगान असो.

सोलो, युगलगीतं, सहगानंसारखे गाण्याचे प्रकार आणि वेग-वेगळ्या मूडस्‌ची गाणी नवीन नवीन चालींमधून लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीताच्या आधारावर गेले ३० वर्षे मांडत आल्यामुळे तुमच्या संगीतात बर्मनदा, विविधता इतकी भरलेली आहे की गाणी ' मोनोटोनस ' किंवा ' मेकॅनिकल ' बनण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही इतकी व्यापकता तुमच्या संगीतात आहे किंवा ह्या विविधता-व्यापकतामुळेच तुमचं संगीत एकसुरी. एकाच पट्टीतून धावणारं किंवा lopsided झालेलं अजिबात वाटत नाही. तुमच्या संगीताचा ' टाइप ' झालेला नसल्यामुळं अमुक एका चांगल्या सिनेमा-संगीता-पेक्षा सचिनदेव बर्मन वेगळं काय देऊ शकतील असा प्रश्नच उद्‌भवत नाही. कोणत्याहि ' प्रकारात ' न अडकता किती तरी वेगवेगळं संगीत देता येऊ शकतं हे तुम्ही दाखवून दिलं आहे. नवकेतनमध्ये तुमच्या उत्कृष्ट संगीताचा आविष्कार पाहायला मिळतो; पण नवकेतनचं संगीत म्हणजे तुमच्या संगीतातला महत्वाचा हिस्सा असला तरी एक हिस्सा आहे. नवकेतनपेक्षा वेगळं चांगलं संगीत इतरत्रहि पाहा-यला मिळतं. राजकपूरच्या सिनेमापेक्षा वेगळं संगीत शंकर जय-किशनचं असू शकेल काय असा प्रश्न पडतो. बर्मनदा, तुमच्या बाबतीत असला प्रश्न उद्‌भवतच नाही. १९५७ मध्ये ' प्यासा ' सारखं ' सीरीयस ' संगीत दिल्यानंतर लगेच १९५८ मध्ये ' चलतीका नाम गाडी ' चं पूर्णपणे विनोदी ढंगाचं संगीत देण्याची करामत तुम्ही केली आहे, तर १९६५ मध्ये ' गाईड ' सारख्या शास्त्रीय आणि लोकसंगीतावर आधारलेल्या संगीतानंतर पुढच्याच वर्षी ' ज्युवेल थीफ ' चं अगदी वेगळ्या ढंगाचं मॉडर्न संगीत बर्मनदा, तुम्ही देऊन गेलात.

सातत्यानं तीस वर्षेपर्यंत ' शिकारी 'पासून ' मिली 'पर्यंत तुमच्या संगीतआलेखावरून नजर टाकली की एक विचार येतो तुमच्या महत्त्वाच्या सगळ्या सिनेमांनी नेहमीच ' अबव्ह द लेव्हल 'चंच संगीत अनुभवलं. ' कमल ', ' प्यार ', ' एक नजर ', ' शहेनशहा ', ' राधाकृष्ण ', ' सोसायटी ', ' नॉटी बॉय 'सारखे १०-२० सिनेमे तुमच्या यादीतून वेचून काढता येतील–त्यांचं संगीत अत्यंत फालतू वगैरे असं जरी मानलं तरी आजपर्यंतच्या एकूण संगीतक्षेत्रातच तुमच्या इतर सिनेमांचं contribution इतकं जबरदस्त आहे की तुमच्या त्या काही फालतू संगीताकडे कुणाचं लक्षही जाऊ शकणार नाही. तुमच्या संगीताची ' अपर लिमिट्स ' नेहमीच तुम्ही ' सेट ' केलीत; ' लोअर लिमिट्स ' मात्र आम्ही सेट केली. लोअर लिमिट्सना निश्चित मर्यादा आहेत तर अपर लिमिट्सना मर्यादाच नाहीत. अगदी तुमच्या ऐन बहारीच्या काळात ' बाजी ', ' बहार ', ' नौजवान ', ' टॅक्सीड्रायव्हर ', ' जाल 'पासून संगीताची एक एक पायरी चढत असताना बर्मनदा, तुम्ही ' देवदास ', ' नौ दो ग्यारह ', ' पेईंग गेस्ट ' ' प्यासा ' आणि ' चलतीका नाम गाडी ' सारख्या संगीतकलाकृती दिल्यात आणि ह्या गाण्यांची गोडी घेता घेताच पुन्हा ' सुजाता ', ' लाजवंती ', ' कागजके फूल ', ' डॉ. विद्या ', ' इन्सान जाग उठा ', ' काला पानी ', ' काला बाजार ',ची लाजवाब गाणी तुम्ही देतच राहिलात. ' बंदिनी 'सारख्या सुरेख संगीत कलाकृतीपेक्षा बर्मनदा आता ह्यापेक्षा जास्त चांगले काय देतील आणि आता तर आजारीपणामुळे ते थकले असा विचार १९६४–६५ मध्ये संगीतप्रेमींच्या मनात येतो न येतो तोच १९६५ मध्ये ' गाईड 'चं अजरामर संगीत तुम्ही घेऊन आलात आणि पुन्हा सगळ्यांना आश्चर्याचा गोड धक्का दिलात ! तुमच्या संगीताला ' अपर लिमिट्स 'ची मर्यादा नव्हती असं आम्ही म्हणतो ते ह्या-साठी......' गाईड 'नंतर तरी तुम्ही कुठं थांबलात ? अजून एक मोठा ' रॅडिकल चेंज ' तुम्हाला संगीतात घडवून आणायचा होता. पूर्णपणे नवीन संगीतकारांच्या जीवघेण्या चढाओढीत तुम्ही ' आराधना 'चं संगीत पेश केलंत आणि सगळ्या मी मी म्हणणाऱ्या संगीतकारांना कुठच्या कुठं मागं लोटून दिलंत . आणि किशोर-कुमार...किशोरकुमारच्या संगीतजीवनात ' मिरॅकल ' घडवून त्याला पुन्हा नवीन वाट करून दिलीत.

' मिरॅकल 'वरून आठवण झाली बर्मनदा, १९४६ ते १९५९ पर्यंत ' मेरा सुंदर सपना बीत गया 'पासून ' वक्तने किया क्या हसी सीतम ' पर्यंत गीतादत्तसाठी एकापेक्षा एक चाली देऊन गेलात आणि १९६५ नंतर ' पुन्हा एकदा गाण्याची संधी द्या ' म्हणून गीतादत्त तुमच्या मागं लागली होती; परंतु तो योग पुन्हा जमलाच नाही आणि जमला असता तर...तर कुणी सांगावं ? किशोरप्रमाणे गीता-च्याही संगीत-जीवनात ' मिरॅकल ' घडून आलं असतं...

किशोरप्रमाणेच कित्येक गायक-गायिकांच्या संगीत-जीवनात बर्मनदा, तुमचं नाव अबाधित आहे. मन्ना डे कुणीही नव्हता तेव्हा ' उपर गगन विशाल ' (मशाल)नी त्याला तुम्ही पुढं आणलंत. हेमंतकुमार बंगाली गाण्यात चाचपडत असताना ' ये रात ये चाँदनी फिर कहाँ ' (जाल)नं त्याच्या हिंदी संगीताची सुरुवात करून दिलीत. ' दो भाई 'पासून रडकी गाणारी गीतादत्त ' सुनो गजर क्या गाये ' थाटात ' बाजी ' मध्ये अवखळ गाणी गाऊन गेली आणि जणू काय तो पुढं तिचा स्थायीभाव बनला. तलत महमूद... केवळ नाजुक मुलायम आवाजापेक्षा कातरपणा हा जर त्याच्या आवाजाचा गुणविशेष मानला तर ' देवदास 'च्या ' मितवा ' आणि ' हम जैसे बरबाद दिलोंका जीना क्या ' ह्या दोन्हींना त्याच्या गाण्यात महत्त्वाचं स्थान आहे असंच म्हणावं लागेल. (बर्मनदा, तो तुमचं ' जलते है जिसके लिए ' सारखं ' नॉर्मल ' गाणंच केवळ कवटाळून बसतो आणि ही दोन्ही गाणी सोयिस्करपणे विसरतो हा मुद्दा वेगळा) आणि आशा भोसले...किशोरकुमारप्रमाणेच तिच्या

आवाजाचे अचूक अवलोकन तुम्ही आपल्या गाण्यातून असं काही दाखवून दिलंत की आशा भोसलेची चांगली चांगली गाणी शोधून काढली की लक्षात येतं त्यातील पुष्कळ गाण्यांच्या चाली सचिनदेव बर्मनच्याच आहेत.

लता मंगेशकर...लता तुमच्या संगीतात कशी आली ? 'शिकारीच्या' आसपासच लता 'अब डरनेकी कोई बात नहीं' (मजबूर) 'चंदा रे जा रे जा रे' (जिद्दी) वगैरे गाणी आळवीत होती आणि गुलाम हैदरनी 'मजबूर'मध्ये आपल्याला एका नव्या चांगल्या गायिकेचा शोध लागल्याची कबुली तुमच्याजवळ बर्मनदा, दिली होती आणि अखेर 'बुझदिल'मध्ये लता तुमच्या संगीतात मिसळली. बर्मनदा, तुमच्या संगीताची सर्व वैशिष्ट्ये एका बाजूला आणि लता दुसऱ्या बाजूला हे दोन्ही लक्षात घेऊन सुद्धा लताच्या आवाजाच्या आहारी तुम्ही गेला नाहीत, असंच म्हणावं किंबहुना कोणत्याच गायक-गायिकेला आपल्या संगीतात महत्त्वाचे स्थान तुम्ही बनू दिले नाहीत. काही विशिष्ट गाण्यांसाठी मात्र तुम्ही लताचा आवाज वापरलात. शास्त्रीय ढंगाची गाणी आणि शांत गाणी तुम्ही लताकडून गाऊन घेतलेली दिसतात. 'किती तरी असाधारण सुंदर स्वर माझ्या कानात घुमत आहेत; पण लताच्या आवाजाचा गोडवा, त्याचा लवचिकपणा केवळ अतुलनीय आहे. स्वतःशी अशी खास शैली असलेल्या श्रेष्ठ दिग्दर्शकांच्या आणि गीतकारांच्या रचनांना लताइतका योग्य न्याय क्वचितच कोणी दिला असेल' असं लताविषयी आदरानं बोलताना बर्मनदा, तुम्ही लताचा मोठेपणा मान्य करता आणि हेही तितकंच खरं की स्वतःच्या संगीतात लताच्या आवाजाला स्थान विशिष्ट मर्यादेपर्यंतच देता...फक्त गोडवा असलेल्या नाजुक लवचिक गाण्यासाठीच 'मोरा गोरा अंग लै ले', 'होले होले ऽ जिया डोले ऽऽ' 'पियातोसे नैना लागे रे' 'जिसे तू कबूल कर ले' सारख्या गाण्यासाठी !' त्याहीपेक्षा विशेष म्हणजे १९५५ ते १९६३ पर्यंत खऱ्या अर्थानं 'बर्मनी टप्पा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या २०-२५ सिनेमात लताचा आवाज होता फक्त तीन सिनेमांसाठी—'देवदास', 'डॉ. विद्या' आणि 'बंदिनी'—तिन्हीही चांगल्या संगीतामध्ये ! किती काटेकोरपणे लताच्या आवाजाची निवड बर्मनदा, तुम्ही केलेली दिसते. लता मंगेशकरची चांगली गाणी निवडताना बर्मनदा, तुमची 'ठंडी हवाए' (नौजवान) 'तुम ना जाने' (सजा) 'झनझन पायल बाजे' (बुझदिल) आणि 'जोगी जबसे तू आया' (बंदिनी)सारखी गाणी डावलता येणं शक्य नाही.

१९४३ पासून हजारोंनी गाणी गाऊन गेलेला महंमद रफी... 'हम बेखुदीमें तुमको पुकारे' (काला पानी), 'दिन ढल जाये' (गाईड), 'उपरवाला जानकर अनजान है' (काला बाजार)सारख्या गाण्यांसाठी तुमची नक्की आठवण ठेवील. महंमद रफीच काय तुमच्या केवळ ३–४ सिनेमांत गाण्याची संधी मिळालेला मुकेशसुद्धा 'ओ जानेवाले हो सके तो' (बंदिनी) गाणं कधीही विसरणार नाही. तीच गोष्ट मीना कपूर (किसीसे मेरी चोट लगी अब क्या करू—आठ दिन) आणि सुरैय्याची ('नैन दिवानी', 'मनमोर हुआ मतवाला'—अफसर) 'मनमोर हुआ मतवाला'च्या तुमच्या कम्पोझिशनबद्दल तर सुरैय्या इतकं बहारीचं बोलत असते आणि जाता जाता एक किस्साही सांगून जाते...त्या गाण्याची चाल तुम्ही सुरैय्याला गाऊन दाखविली आणि ती इतकी मोहून गेली की तुमच्या गळचातील उतरणाऱ्या त्या गाण्याच्या सुंदर चालीवरचं ते गाणं तुम्हीच गावं म्हणून हट्ट धरून बसली. देव आनंदला पण आग्रह करू लागली की ते गाणं गायकाच्या तोंडी टाक! तसं झालं नाही ती गोष्ट वेगळी; पण झालं असतं तर...तर 'धीरेसे जाना बगियनमें रे भवरा' नंतर खूप दिवसांनी ऐकायला मिळालेल्या 'आठ दिन'च्या 'उम्मीद भरा पंछी, था खोज रहा सजनी'च्या पाठोपाठ 'मनमोर हुआ मतवाला' तुमच्या तोंडून आम्हाला ऐकायला मिळालं असतं.

गायकगायिकांवर पूर्णपणे Control असलेल्या तुमच्या संगीताचे बर्मनदा, तुम्ही खरेखुरे 'मास्टर' होतात ह्याची प्रचीती नेहमीच येते. टी. व्ही. वर हेमंतकुमार जेव्हा तुमचं 'ये रात ये चाँदनी फिर कहा' सादर करतो तेव्हा बिचाऱ्याची कीव येते. एकाही ओळीचे accents त्याला आज नीट जमत नाहीत. स्वतःचं आवडीचं गाणं म्हणून 'पूछो ना कैसे मैंने रैन बिताई' गाणं टी. व्ही. वर गाताना आजही मन्ना डे ची तीच गत होते. हे गाणं अजून एकदाही जसच्या तसं अजून एकदाही त्याला गाता आलेलं नाही. फार कशाला तलतला चॅलेंज आहे त्याने 'देवदास'ची दोन्ही अवघड गाणी आज जशीच्या तशी म्हणून दाखवावीत. बर्मनदा, गायक-गायिकांकडून तुम्ही गाणी कशी 'ठोकून' घेत होतात त्याचं प्रत्यंतर येतं.

...तर बर्मनदा, गेल्या ३०–३५ वर्षांच्या तुमच्या संगीत कारकीर्दीची उजळणी घेतली तर The Great Personality म्हणूनच तुमची ओळख पटते. आपल्या संगीतात लवचिकता ठेवल्यामुळं संगीतातील सर्व थरांतील लोकांचं तुम्ही समाधान करू शकलात आणि स्वतःच्या कलाजीवनाबद्दलही तुम्ही असावेत तितके समाधानी होता म्हणूनच शेवटपर्यंत प्रयोगशीलतेमध्ये तुम्ही धन्यता मानलीत. केवळ लोकांच्या आवडीनुसार गाणी देण्यापेक्षा चांगल्या अभिरुचीची गाणी देऊन लोकांची आवड उंचावयाची असाच प्रयत्न तुम्ही केलात.

गुरुदत्त म्हणतो—'कलात्मक आणि ध्येयवादी चित्रपट काढणं तसं सोपं आहे, अवघड आहे असले चित्रपट काढणं आणि ते देखील गल्ल्यावर चालवून दाखविणं.'

त्याप्रमाणेच चांगलं संगीत देणं कदाचित सोपं आहे, अवघड आहे ते आपलं संगीत चांगलं आहे हे लोकांना पटवून देण आणि बर्मनदा, तुम्ही ते पटवून दिलंत—कोणत्याही इतर गैरवाजवी बाबींचा आधार न घेता !

गेल्या ३० वर्षांत, हिंदी सिनेमा-संगीतात जे जे द्यायचं होतं ते ते तुम्ही देऊन गेलात. आपल्या कलाजीवनाबद्दलही असावे तेवढे समाधानी तुम्ही होता. संगीताबद्दल प्रयत्नवादी, आशावादी होता. पराभव, दुःख तुमच्या संगीतातून जाणवतं; परंतु तिथंच तुम्ही थांबला नाहीत, निराश झाला नाहीत; तर पराभव, दुःख तुम्ही खिलाडूपणे स्वीकारलंत म्हणून तर आजच्या ह्या वेड्यावाकड्या स्पर्धेला तुम्ही यशस्वीपणे तोंड देऊ शकलात. अगदी 'आराधना'च्या मिरॅकलनंतरही १५–१६ सिनेमांना तुम्ही यशस्वी संगीत देऊन गेलात आणि कदाचित अजूनही देऊ शकला असता! ...परंतु तुमच्या संगीत-जीवनात तसं पाहायला गेलं तर Incomplete काहीच राहिलं नाही. 'हम है राही प्यारके' सारख्या गाण्यातला केअरफ्रीनेस, दिलदारपणा, तुमच्या एकूण संगीतातच आढळतो. प्रेमातली फमगत खिलाडूपणे स्वीकारणाऱ्या आनंदी, समंजस माणसाचं व्यक्तिमत्त्व किशोरकुमारने तुमच्या 'जीवनके सफरमें राही'मध्ये पेश केलं आहे; परंतु आज तुम्ही निघून गेल्यानंतर त्याचं किशोरकुमारला तेच गाणं लताच्या आवाजाच्या ढंगात म्हणावंसं वाटत असल्यास नवल नाही.

जीवनके सफरमें राही मिलते है बिछड जानेको  
और दे जाते हैं यादें तनहाईमें तडपाडनेको

तुमच्यानंतर आज जरी 'तुम ना जाने किस जहांमें खो गये'-सारखी अवस्था झाली असली तरी त्याला उत्तर आहे—

हम आपके गीतोंको इस दिलमें बसा दे तो...

☐ ☐

# 'वॉरंट'

## मसाला नसलेली मुर्गी

देवला पडद्यावर वावरताना; कमरेंत वाकून मान वेळावत जसबाती डायलॉग टाकताना पहाण्यात एक मजा असतो आणि त्यासाठी देवचे पिक्चर बघण्यासारखी शिक्षा सुद्धा आपण हसतमुखानं स्वीकारतो. माझा एक मित्र म्हणतो त्याप्रमाणे–देवचं पिक्चर बघायला जाताना ते कसं असेल असा खुळचट विचार करायचा नाही. ( कारण ते बंडलच असणार ! ) पण आपला देववरचा विश्वास दांडगा–म्हणूनच मी प्रेमशास्त्र बघतो, हिरापन्ना बघतो, इश्क इश्क इश्क बघतो–आणि हळहळतो; पण मध्येच एखादा 'अमीर-गरीब' समाधान देऊन जातो म्हणून 'वॉरंट'कडेही अपेक्षेने बघतो.

तर 'देव आनंद–झिनत अमान' तशी फ्लॉप पेअर ! त्यामुळे चक्रवर्तीचे दिग्दर्शन हेच वॉरंटचे 'मेन ॲसेट !' कथाविषयही तसा जुनाच–अगदी बाबुराव अर्नाळकरांच्या रहस्यकथेत शोभण्यासारखा–शास्त्रज्ञाची पळवापळवी, खून इ. इ. सतीश कौल हा मदनपुरीसारख्या देशभक्त वगैरे शास्त्रज्ञाकडे नोकरीला. मदनपुरीचा खून होतो व सतीश कौलवर आरोप ठेवून पोलीस त्याला पकडतात. फाशीची शिक्षाही ठोठावून मोकळे होतात; पण प्राणसारखा कायदेकानू जाणणारा कर्तव्यदक्ष पोलीसप्रमुख बाप असलेल्या जेलर देवला मात्र हे सगळ झूठ वाटतं. सतीश कौलसारखा शामळू माणूस खून करू शकणार नाही ह्याची खात्री असल्याने देव त्याला घेऊन जेलमधून फरार होतो. आता झिनतही मदनपुरीसारख्या शास्त्रज्ञाची पोरगीही ह्या दो फरारींच्या मागावर असते. आणि असली कातील अजीत आपल्या 'कुत्त्यां-कमिन्यांसह' ह्या दोघांना उडवायला बसलेलाच असतो; पण देव त्याचा बाप ! सतीश कौलसारख्या बच्च्याला दारासिंगाच्या ताब्यात देऊन हा झिनतबरोबर वेष बदलून रोमान्स करता करता असली कातीलचा पता लावत असतो. मध्येच देवच्या छोटचा पुतण्याला आजारी पाडून हॉस्पिटलमध्ये वगैरे ठेवून प्राण देवला पकडण्याचा एक जसबाती ट्रॅप लावतो. त्यानिमित्ताने देवची फिल्मी माँ–सुलोचना–दोन–चार दर्दभरे डायलॉग बोलून जाते; पण देव मात्र बिनधास्त डॉक्टरचा वेष घेऊन पोलीसपहाऱ्यांत पुतण्याची भेट घेऊन येतो. तसेच प्राणच्या देखतच दारासिंगाच्या बहिणीच्या लग्नात दाढी वगैरे लावून झिनतबरोबर भांगडाही करतो. शेवटी झिनतला पळवून नेल्यावर तलावाच्या पाण्याखाली असलेल्या अजीतच्या प्रयोगशाळेत अकेलाच जाऊन थडकतो व ढिश्यॉंव ढिश्यॉंव करत त्याचा खेल खतम् करतो.

तर अशा प्रकारची ही जेम्स बॉन्ड टाइपची स्टोरी ! ती पेश करताना डायरेक्टर प्रमोद चक्रवर्तीनीसुद्धा मॉडर्न टच् देऊन देवला इमारतीच्या गच्चीवरून जुगनुस्टाइल उड्या मारावयास लावल्या आहेत. जमिनीवर आडवेतिडवे पडून गोळीबारही करावयास लावला आहे. ( चक्रीला आजकाल झालंय तरी काय ? नया जमानासारखं मतलबवालं पिक्चर देणाऱ्या चक्रीने जुगनु, वॉरंटसारखे पिक्चर डायरेक्ट करावेतच का ? ) विजय आनंदच्या 'ज्वेल थीफ' व 'जॉनी' पासून देवच्या चित्रपटांचा एक ठराविक साचा बनून गेला होता. त्याच्या प्रत्येक चित्रपटाचा शेवट उत्कंठापूर्ण असायचा. शेवटी एखादे 'ट्रम्प कार्ड' हातात ठेवून देव काही तरी आयडियाबाजी करत असायचा. (आठवा अमीर-गरीब) पण वॉरंटमध्ये मात्र असा एकही प्रसंग नाही. त्यामुळे चित्रपट वेगवान झाला असला तरी उत्कंठावर्धक वाटत नाही.

जेलरची भूमिका देवने आपल्या नेहमीच्या स्टाइलने पार पाडली आहे. ह्या चित्रपटात त्याला बरीच वेषांतरे करायची संधी मिळाली आहे. त्यापैकी डॉक्टरच्या वेषात व ख्रिश्चन जोडप्याच्या वेषात झिनतबरोबर गाणे म्हणताना (सुनो भाई बाराती : किशोरकुमार) त्याने धमाल ॲक्टिंग केली आहे. झिनतला देवबरोबर गाणी म्हणायचे सोडून इतर काही काम नाही. फक्त देव व सतीश कौलच्या मागावर निघताना जानकीदास तिला एक लोड केलेलं पिस्तूल देतो तेव्हा 'दो दुष्मनों के लिये दो गोलियाँ काफी हैं' असे म्हणत ती पिस्तुलातील गोळ्यांनी मोटारीत बसून बंगल्याचे गेट उघडते ते ग्रेट ! अजित मात्र आपली 'जंजीर-स्टाइल' सोडायला तयार नाही. त्याच्या ॲक्टिंगमध्ये आता 'रिपिटेशन' व्हायला लागलंय तर प्राण नेहमीच्या सफाईनं काम करून जातो. हिंदी चित्रपटात नेहमी आढळणाऱ्या हिरोच्या तथाकथित 'इनोदी मित्रा'च्या जागी दारासिंगला घेतल्यामुळे वेगळेपणा जाणवतो. इतर कलाकारांपैकी सुलोचना, मदनपुरी व सुजीतकुमार ठीक.

पण आपण मानलं आर. डी. च्या अदाकारीला. किशोरने गायलेलं 'रुक जाना ओ जाना' व किशोर-लताचे द्वंद्वगीत 'लडी नजरिया' ही त्याची दोन्ही गाणी झकास उतरली आहेतच; शिवाय किशोरचे सोलो 'सुनो भाई बाराती' व लताचे सोलो 'मैं तुमसे मुहब्बत करती हूँ' ही दोन्ही गाणीही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्याशिवाय रहाणार नाहीत.

मात्र ह्या चित्रपटात निराशा केली ती प्रमोद चक्रवर्तींनी. चक्रीचे दिग्दर्शन म्हणजे काही तरी 'मसालेदार' पहावयास मिळणार ही अपेक्षा; पण चित्रपटास वेग देण्यापलीकडे ते काही करू शकले नाहीत; पण कुणी सांगावे ? जुगनुसारख्या 'रॉबिनहूड' पिक्चरला ५० आठवडे उचलून धरणारं पब्लिक 'वॉरंट'ही डोक्यावर घेईल !

**–शरद कामत**



# थिएटर स्टार्टस् विथ टू पर्सन्स्....

## दिलीप कोल्हटकर

सुभाष सोनवणे

आजच्या व्यावसायिक आणि अव्यावसायिक मराठी रंगभूमीवर दिलीप कोल्हटकर ह्या नावाला निर्विवादपणे महत्त्वाचे स्थान आहे. व्यावसायिक रंगभूमीबाबत सांगता येत नाही; परंतु हौशी रंगभूमीला मात्र त्याच्यासारख्या सतत धडपड्या कलाकाराची नितांत गरज आहे. किंबहुना मला असे वाटते की हौशी रंगभूमीवरच अशा कलाकारांमधली नवनिर्मितीची प्रेरणा सदैव जागृत राहू शकते. एकदा व्यावसायिक रंगमंचावर गेला की, त्या कलाकाराला–कोणाहीविषयी अनादर न दाखवता स्पष्टच बोलायचं तर घाण्याच्या बैलाचे किंवा पाट्या टाकणाऱ्या मजुराचे स्वरूप येते ! ह्याच भूमिकेतून मी दिलीपला विचारलं– 'तू व्यावसायिक नाटकांतून भूमिका करतोस त्या कशासाठी?'

–'पैशांसाठी ! मला माझ्या बँकेतल्या नोकरीच्या पगाराव्यतिरिक्त आणखी जास्त पैसा माझ्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक वाटतो आणि हा जादा पैसा कमावण्याचा चांगला मार्ग नाटकांच्या रूपाने मला मिळाला–' दिलीप.

–'केवळ पैशांसाठीच ? कलाकाराला केवळ पैसाच हवा असतो ?' माझा प्रश्न.

–'पैशाबरोबरच आपल्या पाठीवर शाबासकीची थाप मिळावी हीसुद्धा अर्थातच प्रत्येक कलाकाराची अपेक्षा असतेच. आपले काम, आपले नाटक लोकांना आवडावे हीसुद्धा प्रत्येकाची इच्छा असते–'

–'लोकांना आवडेल तेच त्यांच्यासमोर सादर करताना मग तुझ्यासारख्या स्वतःची प्रतिभा, स्वतःची कल्पनाशक्ती असलेल्या कलाकाराला मुस्कटदाबी होत असल्यासारखं वाटत असेल ?'

–'काही प्रमाणात वाटतं, पूर्णतः नाही. मी माझ्या व्यावसायिक नाटकांतून 'आपलेपण' राखण्याचा प्रयत्न नेहमीच करत असतो. अर्थात हे 'आपलेपण' अव्यावसायिक किंवा प्रायोगिक रंगभूमीवर जास्त प्रमाणात, अधिक सार्थपणे, अधिक स्वैरपणे दाखवता येते–' इति दिलीप.

–'प्रायोगिक–प्रायोगिक नाटक म्हणजे तुझ्या मते नेमकं काय ?'

नेमक्या शब्दांची जुळवाजुळव मनातल्या मनात काही वेळ करून दिलीप उत्तरला– 'वस्तुतः स्टेजवर प्रयोगरूपात सादर होणारं प्रत्येक नाटक हे प्रायोगिकच नाटक असतं. तथापि 'प्रायोगिक' ह्या नावाखाली जी परंपरा सुरू झालेली आहे, त्या प्रायोगिक नाटकांची व्याख्याही करता येईल. सगळ्या चौकटींचा जाणीवपूर्वक विचार करून आणि त्या चौकटी मोडण्याचा धोका पत्करूनही– आपल्याला जे अभिव्यक्त करायचंय, ते आपल्या पद्धतीने निर्भीडपणे मांडणारे नाटक म्हणजे प्रायोगिक नाटक !'

–'पण त्या चौकटी ठरवणार कोण ? बाळ कोल्हटकरांना जी चौकट किंवा जी चाकोरी वाटेल ती खानोलकरांना वाटेलच कशावरून ? त्यामुळे अमुक एक जण चाकोरीच्या किंवा मर्यादेच्या बाहेर गेलाय असं कशावरून म्हणायचं ?' मी विचारतो.

–'बरोबर बोललास. चौकट ही एक सापेक्ष कल्पना आहे. निर्भीड अभिव्यक्तीसाठी एखाद्या नाटककाराला आपल्या नाटकातल्या एखाद्या पात्राने दर अंकात नवी बाई बदलणे आवश्यक वाटत असेल तर दुसऱ्या नाटककाराला कदाचित आपल्या स्त्रीपात्राने लग्नाच्या नवऱ्याला केवळ साधा स्पर्श करणे हीच अभिव्यक्तीची परिसीमा वाटत असेल–' दिलीप.

–'अरे बाबा, पण कल्पना व विचार ह्यांच्या ह्या सापेक्षतेमुळे तेंडुलकरांचा निर्भीडपणा काही मंडळींना मुळीच मंजूर होत नाही आणि मग तथाकथित संस्कृतिसंरक्षक ओरडा करतात की अमका नाटककार सामाजिक नीतिमत्ता रसातळाला नेतोय, त्याचा धिक्कार करा ! ह्या तथाकथित संस्कृतिसंरक्षकांच्या मते नाटके ही समाजावर इष्ट–अनिष्ट वगैरे परिणाम घडवून आणू शकतात. ह्या बाबतीत तुझं मत काय ?' मी.

–'तसा काही परिणाम होत नसावा असा माझा अंदाज आहे. माझ्या मते, खऱ्या अर्थाने मॅच्युअर–पक्व–प्रेक्षकांवर नाटकांचा परिणाम होऊ शकत नाही–' दिलीप.

–'मॅच्युअर किंवा पक्व प्रेक्षक म्हणजे काय ?'–मी.

–'जेवढा वेळ लोक नाटक बघत असतात, तेवढा वेळ नाटकाच्या 'नाटकपणा'चे भान ठेवणारे प्रेक्षक म्हणजे 'मॅच्युअर' प्रेक्षक. असे प्रेक्षक नाटकांमुळे होणाऱ्या कोणत्याही परिणामांच्या अतीत असतात–' दिलीप.

—' म्हणजे नाटक पहाताना प्रेक्षकांनी जसं नाटकाकडे नाटक म्हणून पहायला हवं, त्याप्रमाणे नाटकवाल्यांनीसुद्धा नाटकाचं नाटकपण अबाधित ठेवायला हवं–नाही का? मग सध्याची जी तथाकथित वास्तववादी नाटकं असतात, त्यांचं काय ?' माझी शंका.

—' बापरे, नाटक हे ' नाटक ' असतं, मग ते ' वास्तव ' कसं असणार ? ' वास्तववादी नाटक ' हे सुद्धा कुठे तरी ' नाटक ' असतंच! नाटकामध्ये वास्तवाचा जास्तीत जास्त आभास असू शकतो; पण पूर्ण वास्तव नाही. आता इथे पुन्हा वास्तव किंवा अवास्तव ह्यासुद्धा सापेक्षच कल्पना आहेत.' दिलीप.

—' पण ह्या सापेक्षतेच्या लफड्यात, नाटकाचं मूळ स्थान काय आहे ?'

—' थिएटरची माझी कन्सेप्ट अशी की थिएटर स्टार्टस् विथ् टू पर्सन्स्– एक म्हणजे नाटक करणारा आणि दुसरा नाटक पहाणारा, म्हणजेच प्रेक्षक. ही नाटकाबाबतची मूलभूत बाब दुर्लक्षून, नाकारून चालणारच नाही !–' दिलीप.

—' ह्याचा अर्थ नाटक करणारा आणि नाटक पहाणारा ह्यांच्यामध्ये एक संवाद, किंबहुना सुसंवाद असणे अगत्याचे ठरते–'

—' नक्कीच '– दिलीप.

—' मग ' वासनाकांड ' प्रकरणाबद्दल काय म्हणशील ?'– मध्यंतरी ' वासनाकांड ' निमित्ताने अमोल पालेकर व पुणेकर प्रेक्षक ह्यांच्यात झालेल्या विसंवादाच्या अर्थात बेबनावाच्या संदर्भात मी विचारतो.

—' पुण्याचा प्रकार हा पूर्णतः वेगळा आहे. ' वासनाकांड ' मनापासून आवडलेले लोक मला माहीत आहेत–' दिलीप.

—' नाट्यकला ही एक निखळ कला आहे. कलेचा ' व्यवसाय ' व्हावा; पण धंदा मुळीच होऊ नये. काही लोक हा ' धंदा ' करू पाहतात. मग त्यासाठी येनकेनप्रकारेणं सनसनाटीपूर्ण वातावरण निर्माण करायचं आणि त्या तापल्या तव्यावर आपली पोळी खरपूस भाजून घेऊन यथेच्छ हादडायची ! – हे कितपत योग्य आहे ?' मी विचारतो.

—' कलेचा धंदा होत असला, तर त्याहून मोठं दुर्दैव नाही. मी माझ्या परीने अशा वेळी निश्चितच निषेध नोंदवतो. ' अवध्य ' हे नाटक व्यावसायिक किंवा धंदेवाईक रंगमंचावर आलं तेव्हा त्यामागील पूर्णतः धंदेवाईक प्रवृत्तीचा निषेध म्हणून त्या नाटकातली भूमिका मी नाकारली होती.

—' सारे प्रवासी तिमिराचे ह्या नाटकामुळे तू व्यावसायिक दिग्दर्शक बनलास. ह्या तुझ्या पहिल्या व्यावसायिक दिग्दर्शनातले काही विशेष अनुभव ?–'

—' प्रत्येकजण ' पहिली ' गोष्ट अगदी जीव लावून करत असतो. माणूस पहिलं प्रेम अगदी उत्कटपणे करतो. पहिला इंटरव्ह्यू खूप उत्सुकतेनं देतो. मी माझं हे पहिलं व्यावसायिक नाटक अत्यंत आत्मीयतेनं दिग्दर्शित केलं होतं. पंचवीस दिवसांत नाटक उभं करून देईन असं मी तोंडवळकरांना म्हटलं होतं. त्याप्रमाणे सव्विसाव्या दिवशी शुभारंभाचा प्रयोग झाला. माझ्या कुवतीप्रमाणे जास्तीत जास्त बांधीव व रेखीव असं मी ते नाटक बसवलं होतं. साऱ्या सहकारी कलाकारांनीही मला चांगली साथ दिली. प्रयोगाबद्दल मी पूर्णतः समाधानी झालो. एवढंच काय; पण माझ्या कामगिरीबद्दल इतर अधिकारी व्यक्तीसुद्धा खूष होत्या–' दिलीप.

—' तुला ' जास्वंदी 'च्या निमित्ताने विजया मेहतांच्या दिग्दर्शनाखाली व त्यांच्याबरोबर काम करायची संधी मिळाली. तू दिग्दर्शिका विजयाबाईंविषयी काय सांगशील ?'

—' नाटक बसवताना बाई प्रत्येक गोष्टीत अगदी बारीक लक्ष घालतात. प्रत्येक गोष्ट आपल्याला हवी तशी अगदी पिनपॉइंटेडली एक्झिक्यूट करून घ्यावी ती विजयाबाईंनीच–' दिलीप.

—' हे झालं तुझ्या व्यावसायिक नाटकांबद्दल. तू हौशी रंगभूमीवरदेखील नेहेमीच कसल्याकसल्या गडबडीत असतोस. ' बहुरूपी ' च्या ' राजाचा खेळ 'चा प्रयोग आज, तर उद्या ' उन्मेष 'च्या ' सोफा कम् बेड 'ची ' रंगीत तालीम. ' अरे हो, रंगीत तालीम हा प्रकार सेन्सॉरबोर्डाच्या कचाट्यातून सुटण्यासाठी तुम्ही शोधून काढला, नाही का ? सेन्सॉरबोर्डाविषयी तुझं काय म्हणणं आहे ?'

—' नाट्यगृहातल्या पहिल्या रांगेपासून शेवटच्या रांगेपर्यंतचा सगळा प्रेक्षकवर्ग हे मी सेन्सॉरबोर्ड मानतो. पाच किंवा सात माणसांना सेन्सॉरबोर्डाच्या नावाने आपली मते इतरांवर लादण्याचा काहीच हक्क नाही–' दिलीप.

—' पण तरी सेन्सॉर बोर्ड, त्याचा निर्णय आपल्याला मान्य करावा लागतोच ना ? सेन्सॉरची परवानगी नाही म्हणूनच तुम्हाला ' सोफा कम् बेड 'चे खुल्ले प्रयोग करता येत नाहीत ना ?'

—' पण त्यातूनही काही तरी मार्ग निघतोच. ' सोफा कम् बेड 'ला आधी सेन्सॉरबोर्डाने छत्तीस कट्स् सांगितले होते. ते कमी कमी होत गेले. आजपर्यंत मी कधीच सेन्सॉरबोर्डाचे कट्स् स्वीकारलेले नाहीयेत. प्रत्येक वेळी त्या त्या आक्षेपार्ह मुद्द्यांचं योग्य ते स्पष्टीकरण मी सेन्सॉरबोर्डाला देऊ शकलो आहे.' दिलीप.

—' पण हे एकंदरीत सरळ साधं प्रकरण नाहीच. हौशी रंगभूमीवर आणखी काय काय अडचणी येतात, त्यांची पुनरावृत्ती करायची गरज नाही. अखेरचा एक प्रश्न विचारावासा वाटतो की ह्या सगळ्या वैतागवाडीला सामोरे जावे लागत असून सुद्धा तू किंवा तुझे मित्र नाटकांचा-अव्यावसायिक नाटकांचा–अट्टाहास करता, तो कशासाठी ?'

—' जे जेन्युइनली एक्स्प्रेस करावंसं वाटतं, ते एक्स्प्रेस केल्यावाचून राहवतच नाही अशी एक मानसिक अवस्था निर्माण होते. आमच्या अच्युत वझेला काही तरी मनापासून सांगावंसं वाटतं, तो ' सोफा कम् बेड ' लिहितो, बसवतो. त्याला–आम्हा साऱ्यांना वाटतं की ते नाटक जास्तीत जास्त लोकांपर्यंत जाऊन पोहोचावं...आणि मग सारे अडथळे, साऱ्या अडचणी, सारी प्रतिकूलता ह्यांना तोंड देण्याची मनाची तयारी होते...' ☐

---


मराठी कवितेचा नवा आविष्कार

**।। अरण्यरुदन आणि पालखीची गाणी ।।**

**कर्ता : दिलीप धोंडो कुलकर्णी**

मूल्य रु. ४/–

संपर्क : ' लृ ' प्रकाशन, द्वारा चंद्रकांत कल्लोळी

३०५ डी, पोतनीस वाडा, गंगावेस,

कोल्हापूर

पुणे वार्ता....पृष्ठ ५ वरून

घ्यायला हवे. कलकत्त्याचेच उदाहरण घ्या. अवघे दहा रुपये डिपॉझिट सक्तीचे केल्यावर तेथील अर्जदारांची संख्या एकदम ७० टक्क्यांनी घटली.

लोकांच्या तक्रारी असतात तरी कोणत्या?

टेलिफोनऑपरेटर लवकर ट्रंककॉल देत नाही, लाइन आउट ऑफ ऑर्डर हे त्यांचे नेहमीचे उत्तर. चुकीचे बील, रॉंग नंबर व डेड फोन्स या सर्वसामान्य तक्रारी.

पण लोक अडचणी समजावून घेत नाहीत असा टेलिफोनखात्याचा दावा. टेलिफोनखाते लोकांसाठी काय काय करते, किती अडचणी येतात हे समजावून देण्यासाठी पुणे टेलिफोन्सने बाजीरावरोडवरील एक्स्चेंजमध्ये प्रदर्शन भरविले. त्यात माहितीबरोबरच अनेक उपयुक्त सूचना केलेल्या आहेत.

फोनचा शोध लावणारा ग्रॅहम बेल, त्याचे फोनवरील पहिले वाक्य, टेलिफोनमध्ये होत गेलेल्या सुधारणा, ट्रंककॉलबोर्ड, कॉसबार व स्टोंगर अशा कितीतरी गोष्टी प्रदर्शनात पाहायला मिळाल्या. तुम्ही घरी नसल्यास फोन करणाऱ्या व्यक्तीचा निरोप उतरवून घेणारा व तुमचा निरोप त्याच्यापर्यंत पोहोचविणारा रेकॉर्डिंग्रही येथेच पहायला मिळतो.

तेव्हा पुणे टेलिफोन्सची प्रतिक्षायादी बघून निम्मे पुणे हार्ट पेशंट व निम्मे पुणे सार्वजनिक कार्यकर्त्यांनी भरले आहे असे समजू नका.

## ☐ अध्यक्षमहाराज

अध्यक्षांचं पुणेकरांना भयंकर आकर्षण. पूर्वी पुण्याचं अध्यक्षपद अलिखितपणे ज्येष्ठ व्यक्तींना बहाल केलेलं असायचं. न. चिं. केळकर, म. म. द. वा. पोतदार यांच्यासारख्या भारदस्त व्यक्तींनी ते भूषविलेलं; पण सध्या विकेंद्रीकरणाचा जमाना आहे. त्यामुळे मक्तेदारी आता संपलीय एवढंच.

कुणीही कुठलाही अध्यक्ष होवो त्याचा पुण्यात सत्कार झाल्याशिवाय अध्यक्षपदावर शिक्कामोर्तब होत नाही. पुणेकरही लगेचच त्याचा सत्कार उरकून मोकळे होतात. पुण्यात वक्त्यांना तोटा नाही. श्रोत्यांची वाण नाही. तुम्ही टाचा वर करून बोलायला लागलात की दहा लोक गोळा होतील.

तर अशा अध्यक्षवेड्या पुणेकरांनी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदीं विराजमान झालेल्या भालचंद्र पेंढारकरांचा, ऐन दिवाळीत यथासांग सत्कार केला. भरतनाट्यमंदिरात झालेल्या या समारंभाच्या निमित्ताने भालचंद्र पेंढारकरांना पुन्हा एकदा स्वतःच लिहिलेले आत्मचरित्र इतरांकडून ऐकून घ्यावे लागले; पण करणार काय? हनुवटीवर हात ठेवून खुर्चीत बसून राहण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

बाबूराव गोखल्यांनी त्यांना पहिल्यांदाच पुणेरी हिसका दाखविला. आपल्या भाषणात त्यांनी पेंढारकरांच्या तोंडावर पेंढारकर नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष कशाबद्दल? अशा स्वरूपाचे उद्गार दुसऱ्या एकाने काढल्याचे सांगितले. दुसऱ्याच्या नावावर खरं बोलायची ही आयडिया आहे की काय कोणास ठाऊक.

त्यानंतर डॉ. बापट, डॉ. पु. शं. पतके, बाबूराव विजापुरे, वसंत देसाई यांची भाषणे झाली. प्रा. भालबा केळकर प्रायोगिक व अन्य रंगभूमी यावर बोलले. थाट अर्थात प्राध्यापकी.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी खा. जयंतराव टिळक होते. त्यांच्या हस्ते पेंढारकरांना नटराजाची मूर्ती सत्कारसमितीतर्फे भेट देण्यात आली. श्री. टिळकांनी लोकमान्य टिळकांनासुद्धा नाटकाची आवड कशा प्रकारे होती हे सांगितले.

सत्कार म्हटला की त्याला उत्तर आलेच. पेंढारकर म्हणाले, 'मी नाटकासाठी काही केले आहे असे मानीत नाही. माझ्याकडून ते करवून घेतले गेले व करवून घेतले जात आहे.' दिल्लीतील राष्ट्रीय नाट्यमहोत्सवात ५४ साली शारदानाटकातील कोदंडाची भूमिका पाहून पंडित जवाहरलाल नेहरूंनी पाठ थोपटली. स्वतःच्या कोटावरील गुलाबाचे फूल काढून माझ्या अंगरख्याला लावले तो दिवस माझ्या भाग्याचा!'

साऱ्या नाट्यरसिक पुणेकरांच्या वतीने पेंढारकरांना हार घालण्यात आला; पण हार गळ्यात पूर्णपणे पडतोय न पडतो तोच त्या हाराचा जाहीर हिशोब, काहींची हाराच्या वाट्यातील बाकी ऐकावी लागली. ☐

---

# पॅपिलॉन पुस्तक योजना

पॅपिलॉन पुस्तक योजनेतील दुसरे पुस्तक 'हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा' हे तयार झाले असून सभासदांनी २९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर १९७५ या मुदतीत ते कार्यालयातून घेऊन जावे. ज्यांनी पुस्तक व्ही. पी. ने मागवले आहे त्यांना पुढील आठवड्यात व्ही. पी. केली जाईल.

दहा रुपये मनीऑर्डरने वा चेकने पाठवून सभासद होणाऱ्या काही सभासदांनी पुस्तके समक्ष नेणार किंवा व्ही. पी. ने पाठवावी हा खुलासा केला नसल्याने त्यांची पुस्तके पाठवता आली नाहीत. या सभासदांनी पत्र पाठवून कृपया वरील खुलासा करावा. पत्रात संपूर्ण नाव, पत्ता, पैसे केव्हा, कसे पाठवले याचा उल्लेख असावा.